सालअखेर ,, ७ ,, १ ८
किरकोळ अंकास .... .... .... ४

नोटिशी बद्दल.
१० ओळींचे आंत रु० १
दर ओळीस .... ० १ ६
दुसरे खेपेस .... .... ० १

Six monthly ... ... ... 3 ,, 8 as.
Single copy ... ... ... ... ... 4 as.

Advertisement.
Below 10 lines ... 2 Rs.
Per line over 10 ... 4 as.
Repetition Per line 3 as.

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXIX AKOLA MONDAY 4 NOVEMBER 1895 NO 42

वर्ष २९ आकोला सोमवार तारीख ४ माहे नोव्हेंबर सन १८९५ इ० अंक ४२


नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकिट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहिरांत

सन १८८९ चा अक्ट ७, कलम ६ प्रमाणें.

दिवाणी क्लास १९ मिसल नंबर ७

१८९५

विद्यमान सिव्हिल जज्ज साहेब जिल्हा अकोला यांचे कोर्टांत.

नांव— भानुदास
बापाचें नांव— काशिनाथ
राहणार— पातुर्डा तालुके जळगांव जिल्हा अकोला यांस मयत.

चिमाबाई जवजे जानकीराम राहणार पातुर्डा तालुके जळगांव जिल्हा अकोला. यांचें कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटिफिकीट मिळावें ह्मणून सदर्हू अर्जदार यानें अर्ज केला आहे. त्याज करितां सदर्हू मयत मनुष्याचे मालमिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्यांचा दावा असेल त्यांस जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं, त्यांनीं तारीख ७ माहे नवंबर सन १८९५ इ० रोजीं सदर्हू अर्जाची चौकशी होईल त्या वेळीं या कोर्टांत हजर होऊन आपापले हक्का विषयीं लेखी हकीकत दाखल करावी.

तारीख २६ माहे अक्टोबर सन १८९५ इ०

V. N. Dandekar.
सिव्हिल जज्ज.

वऱ्हाडसमाचार

मिती कार्तिक वद्य २ शके १८१७

विषारी पदार्थांच्या सेवनानें इंडियांत खून व आत्महत्या फार वडतात; आणि या देशांतलि पुष्कळ प्रांतीं गुरांस विष घालून मारण्याचा उद्योग कारणारे बहुत दुष्ट लोक आढळतात. सोमल, बचनाग, कुचला इत्यादि विषें बाजारांत बहुत करून सर्वत्र आणि बिनतक्रार मिळतात आणि असले प्राणघातक पदार्थ सरळ व सोप्या मार्गानें उपलब्ध असल्या कारणानें अपराधी लोकांचा पत्ताही लवकर लागत नाहीं आणि गुन्हे बरोबर तपासांत येण्यासही अनेक अडचणी येतात. या सर्व गोष्टी लक्ष्यांत घेऊन हिंदुस्थान सरकारनें विषाच्या विक्री संबंधानें एक कायदा करण्याचा विचार केला आणि निरनिराळ्या प्रांतिक सरकारांस या प्रश्नावर अभिप्राय विचारले आहेत.

पंधरा वर्षांपूर्वीं विषारी पदार्थां संबंधानें कांहीं कायदा करावा आणि सरकारची परवानगी घेतल्या शिवाय ते कोणी जवळ बाळगूं नयेत आणि परवाना घेतल्या नंतर देखिल त्या परवान्यांत घालून दिलेल्या नियमा प्रमाणें विषांचा क्रयविक्रय करावा. पण त्या वेळीं सरकारला वाटलें कीं असा कायदा केला तरी त्याची योग्य अंमलबारी होण्यास मोठी अडचण पडेल व कित्येक प्रसंगीं तर कायदा अगदीं निरुपयोगी व व्यर्थ होईल. विषारी झाडपाला किंवा वल्ली असतील त्याच्यावर सरकारची पैरवी राहूं शकणार नाहीं; आणि ज्याला विष पाहिजे तो चटकन व निमूटपणें रानांतून हा झाडपाला किंवा वल्ली आणून आपला बरा वाईट कार्यभाग उरकून घेईल. खनिज पदार्थां पैकीं जे विषारी पदार्थ व्यापारी लोक बाळगतात व ज्यावर व्यापार करितात त्यांच्या देवघेवी विषयीं कायद्यानें सरकारी परवान्या शिवाय बंदी केली तर जंगली विषारी वनस्पती लोकांच्या हाताशीं जवळ असल्या मुळें लोक खनिज विषारी द्रव्या संबंधानें फारशी फिकीर करणार नाहींत.

पण गेल्या पंधरा वर्षांच्या अनुभवानें असें ठरतें कीं बहुतकरून मनुष्यांचा किंवा गुरांचा प्राण घेण्यांत (आरसेनिक) सोमलाचा उपयोग फार होत असतो आणि निदान सोमला संबंधानें तरी कायदा झाला पाहिजे असा इंडिया सरकारचा विचार ठरला आहे. सोमल हा पदार्थ बाह्य प्रांतांतून पुष्कळ येतो आणि कायदेशीर व उपयुक्त कामाकडे त्याचा उपयोग बंद करणें हें चुकीचें होईल ह्मणून ज्या सरळ मार्गांनीं त्याचा दुरुपयोग बंद होईल अशा रीतीनें कायदा रचण्याचा बेत सरकारनें दर्शविला आहे.

सोमल या विषा संबंधानें जो बंदोबस्त तो सामान्यकरून सर्व विषा संबंधानें करणें चुकीचें होईल आणि तसा योग्य बंदोबस्त होणेंही थोडेबहुत दुरापास्तच आहे. तथापि ज्या ज्या ठिकाणीं मुनिसिपाल कमिट्या स्थापित केल्या आहे तेथें तेथें विषारी पदार्थ विकणाऱ्यास हल्लीं प्रमाणें सदर मोकळीक नसावी. त्यांनीं सरकारांतून विषारी वस्तूंची दुकान चालविण्याची परवानगी घ्यावी आणि वैद्यांच्या औषधींच्या यादींत विष लागत असेल तर तें विकावें किंवा ज्या मनुष्यास विष विकावयाचें असेल त्याचें नांव, गांव, हुद्दा धंदा इत्यादी गोष्टींची नोंद करून नंतर त्याच्या नांवानें विषारी पदार्थांची विक्री होत जावी. आरंभीं ही योंजना फक्त मुननिसिपल हद्दींतच चालूं होईल आणि इतर हद्दींतून कांहींच विषाविषयीं प्रतिबंधक कायदा नसल्या मुळें वरील योजनेचा चांगलासा फायदा दिसून येणार नाहीं तथापि थोडथोडा फायदा होत गेल्याचें प्रत्ययास येत गेलें तरी तोच कायदा खेड्यापाड्यांसही पुढें मागें लागूं करण्यांत येईल एकंदरीनें विषारी द्रव्या संबंधानें कायदा करण्याचा जो सरकारचा विचार ठरत आहे तो सर्वत्र लोकमतास अनुसरूनच आहे; आणि या कायद्यामुळें परवान्याचें उत्पन्न सरकारास मिळेल तथापि या बाबतींत उत्पन्नाकडे दृष्टी नसून लोकहिताकडे सरकारची नजर आहे अशा विषयीं सरकारनें निराळें लिहून कळविण्याची जरूर नव्हती पण सरकारनें या दोषारोपांतून सुटण्या विषयीं यत्न केला आहे आणि तो सफल आहे असें आह्मी अगोदरच कळवूं इच्छितों.

नामदार भावनगरी आपल्या कर्तव्याला जागले आणि आपल्या कानसरव्हेटिव पक्षाच्या लोकांस न जुमानता धडाक्यानें आपलें स्वतंत्र मत त्यांनीं प्रदर्शित केलें ही मोठी आनंदाची गोष्ट होय. पार्लमेंटांत चित्रळ संबंधानें प्रश्न निघाला होता तेव्हां मि० म्याकलीन यांनीं सूचना केली कीं चित्रळचा पहाडी प्रदेश काबीज करण्यापासून किंवा त्या सरहद्दीवरील प्रदेशांत लष्करी ठाणें बसविल्यापासून इंडियाचा कांहीं फायदा नसून प्रजेवर मात्र विनाकारण खर्चाचा बोजा जबरदस्त लादला जात आहे. मि० म्याकलीन पुढें डगमगले पण या सुचनेवर अनुमोदन देते वेळीं नामदार भावनगरी यांनीं खुलावटीनें व जोरदार भाषणानें राज्यकर्त्यांची चित्राळ संबंधानें होत असलेली चुक व्यक्त केली. आणि स्वकीय पक्ष कानसरव्हेटिव वरिल सुचनेला प्रतिकूळ होता तथापि जी गोष्ट यथार्थ दिसली ती त्यांनीं लपविली नाहीं. नामदार भावनगरी यांचें विचार स्वातंत्र्य व स्वमतस्थापन हीं खरोखर वर्णनीय दिसलीं त्यांच्या पार्लमेंटरी कारकीर्दीस हा प्रारंभ जसा उत्कृष्ठ झाला तसाच अभिनंदनीय प्रकार शेवटपर्यंत घडेल अशी आह्मांस आशा लागली आहे. जय असो किंवा अपजय असो मनुष्यानें स्वतां बळकट चिकाटीं धरून आपल्या विवेकबुद्धीचा आश्रय सोडता कामा नये ह्मणजे यश कांहीं लांब नाहीं. आणि खरोखर पाहिलें असतां इंडिया विषयीचे प्रश्न कानसरव्हेटिव किंवा लिबरल या पक्षांच्या प्रतिस्पर्धेवर उलटसुलट निकालास लागूं नयेत; पण वस्तुस्थिति शोधून खरा मार्ग कोण धरितो! सर फौलर यांनीं हुकूम करावा कीं चित्रळ प्रांत सोडून द्यावा आणि लार्ड हामिल्टन यांनीं याच्या उलट हुकूम देऊन अधिकारबलानें तो अमलांत आणावा हें नवल नव्हें तर अप्रतिम राज्यकार्य धुरंधरता असेल !

इंडियांतल्या शेतकऱ्या प्रमाणेंच विलायतेंतल्या शेतकऱ्यांची स्थिती माठी कष्टप्रद झाली आहे आणि शेतकऱ्यांच्या हितासाठीं कांहीं कायदा केला पाहिजे अशी जरूरी अलिकडे फार वाटूं लागली आहे. विलायतचे शेतकऱ्यांचा शेतीधंदा अगदीं ठार बुडाला आहे. विलायत सारख्या श्रीमान देशांत शास्त्रीय प्रयोगानें व यंत्रसामर्थ्यानें शेतीचीं कामें होत असतात तरी देखील शेतकऱ्यांचा निभाव लागत नाहीं हें विसरतां कामा नये. जो कांहीं माल लागतो तो विलायतेंत उत्पन्न केला असतां ज्या भावानें पडतो त्यापेक्षां कमी भावानें अमेरिका, आस्ट्रेलिया, इंडिया वगैरे द्वीपान्तराहून आणलेला माल विलायतेंत विकला जातो. परकीय देशाचा माल अती स्वस्त खपूं लागला आणि स्वदेशी माल उत्पन्न करून त्या भावानें विकण्यांत शेतकरी लोकांची सोय नाहींशीं झाली. सर्व धान्यें बाहेरून येऊं लागलीं आणि हा व्यापार इतका फैलावला आहे कीं इंग्लंडची शेती बंद पडली व शेतकरी त्यामुळें निरुद्योगी होऊन निरुपायास्तव उदरचरितार्थासाठिं दुसरे धंदे देखील शोधूं लागले. विलायेंतत शेती खेरीज बहुत धंदे आहेत ह्मणून या वेळपर्यंत कसा तरी टिकाव धरला. उपजीविकेचे बहुतेक पदार्थ बाहेरून विलायतेंत येऊं लागले आणि गहूं, तांदूळ, इत्यादिकांची गोष्ट निराळीच धरली तरी खाण्याचें मांस व मांसाचे पदार्थ बाहेरून येतात इतकेंच नाहीं तर दुधा सारखा जलदी नासणारा पदार्थ देखील नार्वे व स्वीडन या देशांतून येऊं लागला आहे. अशी स्थिती उत्तरोत्तर अधिक होत चालल्यामुळें शेतकरी लोकांच्या सोयीसाठीं व स्वदेशाच्या शेतीच्या उन्नती साठीं विलायत सरकार कांहीं महत्वाचा कायदा करण्याच्या विचारांत आहे.

इंडिया देशाची स्थिति विलायतच्या पेक्षां अधिक भयंकर आहे विलायतची शेतीच बुडाली पण यांत्रिक कलाकौशल्याचे कारखाने बहुत वाढले आणि यांचा विस्तार इतका आहे कीं सर्व जगांतल्या संपत्तीची लूट या यांत्रिक गिरण्यांच्या द्वारें ब्रिटिश लोकांनीं चालविली आहे. आमच्या देशचे शेती खेरीज इतर धंदे सर्व बुडाले आणि एवढा प्रचंड देश निव्वळ शेतकऱ्यांचा बनला आहे ह्मटलें तरी चालेल. इंडियाच्या शेतीची स्थिती देखील समाधान कारक नाहीं. इंडियांतली गहू वगैरे धान्यें विलायतेंत जातात खरीं पण त्यांस पूर्वी प्रमाणें चांगला भाव येत नाहीं. अमेरिकेनें या देशाला अगदी मागें टाकलें. इंडियाच्या गव्हाला पूर्वीं सारखी चणचण विलायतच्या बाजारांत नाहीं.

या देशांत शेतींचें उत्पन्न उत्तरोत्तर कमी होत चाललें आहे. अर्थशास्त्रदृष्ट्या कोणत्याही पदार्थाची किंमत ह्मटली ह्मणजे तो पदार्थ अगदीं भिकार प्रतीच्या जमिनींत उत्पन्न करण्याचा खर्च

होय. परंतु इंडियाची वस्तुस्थिति अगदीं चमत्कीरिक आहे त्यामुळें वरील सिद्धांत बरोबर लागू पडत नाहीं. इतर द्वीपांतला माल स्वस्त पडूं लागला, या देशचा माल कमी किंमतीनें विकण्याची पाळी येऊं लागली, व बाजारांतल्या कमी किंमतीमुळें या देशच्या शेतीचें उत्पन्न अलिकडे कमी झालें आहे. शेतीहून अन्य धनोत्पादक धंदा आमच्या लोकांस नसल्यामुळें शेतीचा धंदा सोडतां येत नाहीं. जो आलाकोरडा चरितार्थ चालेल तो शेतीच्याच धंद्यावर चालेल अशी आमच्या लोकांची दुर्दशा उडाली आहे.

आमच्या देशांतला शेतीच्या उत्पन्नाचा विनियोग मुख्य तीन गोष्टीकडे होत असतो. सरकार सारा धान्याच्या रूपानें नसल्यामुळें भाव बरा वाईट कसलाही असला तरी सरकारचें देणें देण्यासाठीं प्रथम शेतीचें उत्पन्न विकावें लागतें. उदरनिर्वाहासाठीं कांहीं धान्य राखून ठेवावें लागतें. आणि संसारांतल्या इतर चीजवस्तु बहुतेक विलायतेहून येतात व त्यांच्या खरेदीसाठीं आपल्या देशाचें धान्य विलायतेस धाडावें लागतें. आमच्या देशांत इतर धंदे सर्व बुडाल्यामुळें शेती हाच काय तो या देशचा धनोत्पादक धंदा होय. आमची जमीन हीच आमच्या साम्पत्तिक वैभवाचे आदिस्थान होय. आमच्या जमिनीच्या उत्पन्नाचा व्यय पाटापाण्यासाठीं, सरकारी सारा देण्यासाठीं आणि इतर आवश्यक व चैनबाजीच्या पदार्थासाठीं करावा लागतो. या तीन द्वारा पैकीं सरकारी साऱ्याचें द्वार मोठें आहे. जमीन दिवसें दिवस निकस होत चालली, प्रजावृद्धि झपाट्यानें चालू आहे ह्मणून खाणारे तोंडाची रेलचेल उडाली आहे, सर्व जमिनी लागवडींत आल्यामुळें शेतीचा फैलाव होऊं शकत नाहीं, इत्यादि कारणामुळें आमचा शेतीचा धंदा देखील खालावत चालला आहे आणि सारा भागविण्याचीच प्रजेला मारामार पडत. परिणाम असा कष्टमय होत आहे कीं सरकारी साऱ्याखालींच शेतीच्या उत्पन्नापैकीं पुष्कळ मोठ्या भागाचा चक्काचूर होत गेल्या मुळें इंडियन प्रजा अन्नाला देखील महाग होत चालली आहे. पोटाची नीट सोय होत नसल्यामुळें इतर कपड्यालत्याचीं सुखें बहुतेक लोक विसरल्याप्रमाणेंच आहे. इतर धंदे नसल्यामुळें शेती सोडतां येत नाहीं. अलिकडील पिढ्या कलाकौशल्यशून्य आहेत व त्यांच्या संसर्गानें लोकांचें अंगभूत कौशल्य विलयास पोचलें; यांत्रिक ज्ञानाच्या अभावामुळें त्यांना नांगर धरण्या खेरीज दुसरा कांहीं धंदा देखील येत नाहीं. अशा अनन्यगतिक इंडियन शेतकऱ्यास दुसरा मोह त्याच्या जमिनीचा पडतो. त्याला वाटते कीं तो जी जमीन वाहतो ती त्याच्या मालकीची आहे. पण हा निव्वळ भ्रम आहे. ब्रिटिश सरकार सर्व जमिनीचे मुख्य मालक आहे आणि इंडियन प्रजा जमिनीचे वहितदार आहेत. वहितदारांस खरा हक्क कांहीं नाहीं. सारा केव्हांही व कितीही वाढविला तरी तो दिलाच पाहिजे. वाढलेला सारा कबूल नसल्यास जमीन सोडावी किंवा अशा अनन्यगतिक स्थितींत उदरनिर्वाहासाठीं फायद्याकडे न पाहतां शेती वहित करावी. इंडियांतला जीवनकलह असा संकटमय झाला आहे आणि परकी राष्ट्राच्या राज्यकारभारामुळें तो अति भयंकर व दुस्तर होत आहे. अशा स्थितींत सरकारनें पूर्वीप्रमाणेंच डोळे झांक केली तर चांगला परिणाम होणार नाहीं! विलायतच्या शेतकऱ्यासाठीं कायदा होत आहे तर इंडियन शेतकऱ्यांसाठीं हितावह कायदा होण्याची जरूरी शतावधी पटींनें अधिक आहे.

---

"अव्यवस्थितचित्तस्य प्रसादोऽपि भयंकर:" असें ह्मणतात तें कांहीं खोटें नाहीं. चांगली गोष्ट घडली ह्मणजे आनंदानें हंसावें आणि विपरीत प्रकार घडला ह्मणजे दुःखानें रडावें एवढेंच काय तें सरकारी नेमणूका संबंधानें आपल्या हातांत शस्त्र आहे. नामदार बद्रुद्दिन तय्यबजी यांची मुंबई हायकोर्टांतली न्यायाधिशाची जागा गेली व बारिस्टर आरथर स्ट्रेची यांला स्टेट सेक्रेटरी यांनीं ती दिली असा अशुभ विद्युत्संदेश येऊन थडकला होता पण तो खोटा ठरला आणि नामदार स्टार्लिंग यांची नेमणूक रद्द झाली आणि त्यांच्या जागीं बारिस्टर स्ट्रेची हे नेमण्यांत आले. हिंदुस्थानच्या कारभारांत सर्व गोष्टी संभवतात तेव्हां नामदार बद्रुद्दीन व स्टर्लींग हे उभयतां एकाच जहाजांत होते. मि० आरथर स्ट्रेची स्टेट सेक्रेटरीच्या कुलूपी गोळ्यांनें जहाज फोडणार होतेच आणि जहाज फुटल्यावर दोघा पैकीं एक जण बुडाला व दुसरा निव्वळ अवान्तर व अचिंत्य कारणांनीं बंदरांत सुरक्षित पोचला! ही सुखदुःखमिश्रित गोष्ट घडली खरी पण यांतील सुखाच्या भागा बद्दल कोणाचे आभार मानावे हेंही आह्मांस कळत नाहीं! तुकारामाचा बोध परिणामावर दृष्टी ठेऊन विशेष आहे तोच आपण स्मरून निमूटपणें होईल तें पहावें आणि आनंद शोकादि मनोविकार आपापलीं कार्यें आपल्या मनावर आपल्या परवानगी शिवायच घडवून आणितील! असो, ठीक झालें कीं न्यायासनावर नामदार बद्रुद्दीन कायम झाले.

—०*०—

पुणे शहरीं राष्ट्रीय गोष्टींत फार बखेडा माजला आहे आणि वार्षिकी राजकीय व सामाजिक सभा कशा निभावतात याची मोठी काळजी पडली आहे. पण या दोन्ही संस्था राष्ट्रीय आहेत तेव्हां त्या चालू ठेवणें किंवा मोडणें राष्ट्राच्या हातीं आहे आणि ह्मणूनच त्या सुयंत्र व चिरकाळ चालतील अशी आमची पक्की खात्री आहे. विशिष्ट व्यक्तींच्या किंवा लोकांच्या या संस्था नाहींत. सर्वच राष्ट्रवाले लोक या संस्थाचे संस्थापक आहेत. यंदा त्यांच्या बैठकी पुण्यास एका मंडपांत भरूं नयेत ह्मणून पुणेकरां पैकीं कांहीं लोकांनीं राजश्री टिळक, नामजोशी आदिकरून पुढाऱ्यांच्या बाहुव्या खालीं अनेक संग्राम केले पण श्रेष्ठ बहुमताच्या वजनदारीमुळें या मंडळीचे उपाय हरले व प्राण वांचविण्याच्या आशेनें ज्यांला जो सुगम मार्ग वाटला तो त्यांनीं पतकरला. वादसमुद्र बहुत खवळला होता पण तो शांत होत होत आतां अगदीं राष्ट्रीय सफरीला अनुकूळ होऊन नवीन कप्तानांनीं मोठ्या खंबीरपणानें, चातुर्यानें व सलोख्यानें आपलें जहाज चालविण्याची सिद्धता केली आहे. थोडी बहुत काळजी निमाली आहे तरी संकट पार पडलें असें मानण्यास कांहीं हरकत नाहीं.

—:०*०:—

येत्या बैटकीच्या व्यवस्थापक मंडळीमध्यें नवीन उत्तम उत्तम लोकांचा भरणा झाला आहे. पुण्यांतील व मुंबईतील पुढारी मंडळी पुढें सरसावली आणि तिनें सर्व कार्यभार आपल्या शिरावर घेतला आहे. या व्यवस्थापक मंडळीचे मुख्य अध्यक्ष रावबहादूर श्रीराम भिकाजी जठार बी. ए. सी आय. इ. हे आहेत. आणि नामदार खरे, सेटलवाड वाचा, गाडगीळ, गोखले इत्यादिकांस सेक्रेटरी नेमण्यांत आले आहेत. नामदार टिळक यांस सेक्रेटरीच्या कामावरून जाऊं द्यावयाचें नाहीं असें ही ठरलें आहे. अशी एक जोरदार, वजनदार व मक्कम काम करणारी मंडळी तयार असल्यावर मग कांहीं चिंता राहिली नाहीं.

---

वेळ घेतल्या शिवाय मनुष्य पुढें येत नाहीं. पुण्याच्या चळवळीच्या वेळीं माजी डायरेक्टर रावबहादूर नारायणभाई दांडेकर व रावबहादूर श्रीराम भिकाजी जठार हे उभयतां राष्ट्रीय सभेच्या कार्यासाठीं ऐन वेळेवर उद्युक्त झाले आणि त्यांनीं आपल्या अंगावर कांहीं कामगिरीही घेतली आहे हें कळविण्यास आनंद वाटतो. सरकारी नोकरींत पुष्कळ वर्षें घालविलेल्या लोकांमध्यें सार्वजनिक कामासंबंधानें मोठासा दम नसतो असा आमचा अनुभव आहे पण रावबहादूर दांडेकर व विशेषें करून रावबहादूर जठार यांनीं तो सर्व साधारण अनुभव खोटा केला ही बहुत संतोषाची गोष्ट होय. स्वागत कमिटीचा अध्यक्षपणा रावबहादूर जठाराकड येईल असा रंग दिसतो आणि तसाच योग आल्यास रावबहादूर आपल्या नैसर्गिक पण गुप्त राहिलेल्या गुणसमुच्चयानें सर्व राष्ट्रास चकित करितील अशी आह्मास उमेद आहे.

---

सामाजिक परिषदे निमित्त पुण्यांतील लोकांच्या तीन फळ्या झाल्या आहेत. राष्ट्रीय सभेच्या मंडपांत ही परिषद भरू द्यावी असें ह्मणणाऱ्यांचा एक पक्ष व ती सभा तेथें भरूं नये असें ह्मणणाऱ्यांचा दुसरा पक्ष तिसरा पक्ष. उदासीन लोकांचा आहे. या तीरस्थ लोकांचा ओढा सर्व दुसऱ्या पक्षाकडे आहे पण तसें स्पष्टपणें कबूल करण्या इतकें त्यांच्या अंगीं धैर्य नाहीं ह्मणून हा लपंडाव त्यांनीं अंगिकरिला आहे. तेव्हां खरे पक्ष दोन असून त्या उभयतांचीं परस्परांवर शस्त्रास्त्रें चालूं आहेत. पुण्यांतील वर्तमानपत्रें या अस्त्रप्रयोगांच्या कथनानें तुडुंब भरलेलीं आहेत. सारांश इतकाच कीं वादाला गोष्ट पोंचली आणि मनुष्य शहाला पेटला ह्मणजे निकराच्या समयीं हरतऱ्हा करून जो तो आपापल्या पक्षांचें मंडण व प्रतिपक्ष्यांचें खंडण करितो. मग ती गोष्ट खोट्या नाट्या प्रकारांनीं करण्यास मनुष्य मागें पुढें पहात नाहीं. तेव्हां अशा बिथरलेल्या दुफळी कडील लोकांनीं केलेल्या गोष्टींतील सत्याविष्करण, सत्यलोप किंवा सत्यासत्यमिश्रण आह्मी शोधीत बसत नाहीं. नामदार टिळकांनीं विनंतीपत्र सादर केलें व त्याची खोड तोड दुसऱ्या पक्षानें नवीन विनंतीपत्रांत केली. पण न्यायविवेचन करण्याची जरूरी आतां राहिली नाहीं व अखेर सर्वे राष्ट्रीय सभेचें काम सुरळींत चालूं लागलें ही गोष्ट आह्मास पुरी आहे.

---

राष्ट्रीय सभेची रचना कायद्याच्या दृष्टीनें सशास्त्र आहे आणि तिचे सर्व सभासद लोकनियुक्त प्रतीनिधी आहेत. तथापि यापेक्षांही अधिक शिस्तवार व पद्धतशीर रचना करण्याची वेळ आतां आली आहे. राष्ट्रीय सभेचा कायमचा फंड उभारला पाहिजे ह्मणजे ही सभा चिरस्थायी होईल. तिच्या सभासदांच्या आंगीं कोणकोणते गुण पाहिजेत, त्यांची संख्या किती असावी, सभासदांच्या निवडणुकींत मत देण्याचा अधिकार कोणास असावा, राष्ट्रीय सभेच्या स्थानिक कमिट्या कशा व किती सभासदांच्या असाव्या, त्या कमिट्यांची कार्यमाला कोणती असावी इत्यादि गोष्टी कायद्या प्रमाणें ठरविल्या पाहिजेत पार्लमेंट सारख्या लोकसंस्थेच्या नियमाला अनुसरूनच आमच्या राष्ट्रीय सभेचीं कार्यें होत असतात पण अशा प्रतिनिधि तत्वावर उभारलेल्या राष्ट्रसंस्थमध्यें दोष अद्याप बहुत आहेत ते यथाक्रम दूर करण्याच्या प्रयत्नासलागलें पाहिजे.

'नेटिव ओपिनियन'मध्यें दुसरी एक उत्तम सूचना आली आहे कीं पुष्कळ विषय येत्या बैठकीच्या वेळीं निरनिराळे विचारांत घेऊं नयेत. कांहीं ठळक विषय मुख्यत्वेंकरून विचारासाठीं घ्यावे आणि इतर ज्या विषया संबंधानें राष्ट्रीय सभेची मतें ठाम झालीं आहेत त्यांचे ठराव एकंदर गोळा बेरजेनें एका कंठाळी ठरावांत पुन्हा घालून आपलें मत पूर्वीं प्रमाणें कायम असल्याविषयीं राष्ट्रीय सभेनें जाहिर करावें. सांप्रतची इंडियाच्या खजिन्याची स्थिती कशी आहे व ती कशी पाहिजे. अशाबद्दल विशेष खल झाला पाहिजे. तसेंच ब्रिटिश सरकारच्या राज्यतृष्णेला कांहीं प्रतिबंध असणें किती जरूरीचें आहे आणि देश घोर दारिद्र्यांत घोरत असल्यामुळें ही राज्यतृष्णा तशीच राहूं देणें राष्ट्रास किती अनर्थावह आहे या प्रश्नाचा विचार चांगला झाला पाहिजे. तिसरा प्रश्न सरकारी साऱ्या संबंधानें आहे. सारा अतोनात वाढत गेल्यामुळें लोक अगदीं त्रस्त व निराश झाले आहेत. चवथा प्रश्न शेतकऱ्यांच्या कर्जेबाजारी पणा बद्दल आहे. त्या व अशाच विषयावर विशेष करून भवतिनभवती होईल. असा आमचा विचार आहे.

---

वऱ्हाडच्या स्टांडींग कांग्रेस कमिटीनें पुण्याच्या बखेडाचा सर्व निकाल नामदार फेरोजशहा मेथा यांजकडे सोंपविला आहे. या ठरावा पूर्वींच मुंबईस सभा भरून सर्व व्यवस्था होऊन चुकली आहे पण आमच्या प्रांतिक सभेनें आपला अभिप्राय स्पष्टपणें कळविण्याची टाळाटाळ केली आणि मौनव्रत अशा निकराच्या प्रश्ना संबंधानें स्वीकारलें हें बहुत लोकांस आवडलें नाहीं. इतर प्रांतांतील स्टांडींग कमिट्या तरी सदहू बाबतीचा विचार करितील अशी आह्मास उमेद आहे.

## जाहिर खबर

बाहेर गांवच्या सर्व व्यापारी लोकांस कळविण्यांत येतें कीं; आमची पेढी मुंबईत फार दिवसांपासून चालूं असून आह्मी पुष्कळ फायद्यानें माल खरेदी करून पाठवित असतों. ज्या व्यापारी लोकांस भुसारी, कापड, फरनीचरचें जातीचें सामान, लांकूड, लोखंड, किराणा, हांडवर ( चुका, स्क्रू वगैरे ) स्टेशनरी व ग्यासलेट वगैरे कोणत्याही जातीच माल मागणें झाल्यास आह्मी पुष्कळ फायद्यानें आणि कसोशीनें व त्वरित पाठवूं. एक वेळ माल मागविल्यावर खात्री होईल. आमच्या कामिशनचा भावही फारच कमी ह्मणजे शेंकडा एक टक्या प्रमाणें आहे. माल मागविणें तो व्हाल्यू पेबलनें अगर आगाऊ रुपये पाठवुन मागवावा. पण व्हाल्यू पेबलनें माल मागविणारांनीं शेंकडा २५ रुपये प्रमाणें रक्कम आगाऊ पाठविली पाहिजे ज्या लोकांस माल मागविणें असेल त्यांनीं खालील पत्त्यावर आपलें नांव, गांव, स्टेशन वगैरे स्पष्ट खुलासेवार लिहून पत्रव्यवहार करावा. पत्रें पोस्टपेड पाठवावीं व उत्तराकरितां टिकीट पाठवावें.

**तईयब अली मुलावली भाई.**

मच्छी बाजार, अबदुल रहिमान स्ट्रीट मुंबई

## किंमत पाउणपट केली

के० वासुदेव चिंतामण बापट वकील आद्य वनस्पती वैद्य याचीं

### शुद्ध वनस्पतींचीं औषधें



खाली लिहिलेले सर्व प्रकारचे पांक पक्या शेरास तीन रुपये प्रमाणें.

बालरोग निवारक चूर्ण — किं. तोळपास. ०८

पत्ता
के० वा० चिं० बापट
वकील यांचें वनौषधी आफिसचे व्यवस्थापक
मु० नारिंग्रें.
ता. देवगड.
जि. रत्नागिरी.

१ मदन विलास पाक—नपुंसकत्व दूर करणारा

२ दावानल पाक—सर्व प्रकारचे वायुवर.

३ वधु भूषण पाक— सर्व प्रकारचें प्रदरावर.

४ सालमिश्री पाक, मुसळी पाक, बदाम पांक भुय कोव्हाळे पाक— उत्तम पौष्टीक.

५ बालंत रोग व क्षय रोगावरील— ४२ दिवसांत गुण यतो.

६ आम्लपित्त पेट शुळावरील पाक—८ दिवसांत गुण.

७ मधुमेहावरील पाक—४० दिवसांत गुण.

अन्य औषधें

८ आकडी वरील गोळ्या— डबीस किं रु. २

९ डब्या वरील गोळ्या— डबीस किं रु.१॥

१० दम्या वरील गोळ्या- डबीस किं. २०४

११ दम्या वरील पुड्या—दर रुपयास २०

१२ अद्भुत चमत्कारिक वीर्यस्तंभक चूर्ण— तोळपास ०३ आणे.

१३ सर्व रोगा वरील गोळ्या-डबीस किं. रु.१

१४ उपदंश शामक गोळ्या— डबीस किं. रु० २०४

१५ वात विध्वंसक तेल—सर्व वायुवर पावशेराचे कुपीस किं. २०१०

१६ उपदंशशामक मलम—डबीस किं. रु १

१७ प्रमेहावरील गोळ्या— ८ गोळ्यास किं. रु० १

१८ शतपुटी ओवा— संधीवात, आमवात वगैरेवर किं. दर तोळपास ०६ आणे.

१९ शतौषधी मलम— रक्तपीती, व्रण वगैरेवर दर तोळ्यास किं० ०६ आणे.

२० बाळगुटीच्या गोळ्या— मुलाची प्रकृती चांगली राहून आगही डबा वगैरे होत नाहीं. किं. दर तोळपास ०१२ आणे

२१ रक्त पीती वरिल औषध— तोळपास किं० रु० १०८

२२ नेत्र रोगावरील काजळ— डबीस किं० रु० ०१२ आणे.

२३ प्रवाळ भस्म—पित्त विकारावर किं. दर तोळ्यास रु. ०१२ आणें.

२४ खोकल्या वरील गोळ्या— डबीस किं. ०१२ आणे.

२५ पाचक गोळ्या—अन्न पचन होऊन क्षुधा वाढते ३० गोळ्यांचे डबीस किं० रु. १

२६ कुहे पाक— संग्रहणी, पांडु याजवर ३० गोळ्यांचे डबीस रुपया १.

२७ पटकी वरील फळें—दर रुपयास २०

२८ वाकेरीचें भातें—दर रुपयास तोळे १०

२९ तापाच्या गोळ्या—सर्व ज्वरावर डबीस किं. ०१२ आणे.

३० रक्त शुद्धीच्या गोळ्या— दर रुपयास डब्या २

३१ स्तंभक, कामोत्तेजक सुवर्ण कस्तुरीयुक्त संजीवनी गुटीका—डबीस किं० रु० १

३२ वनौषधीं गुटीका— भ्रमण पीतावर व मस्तकांतील कडकीवर किं. रु. १

३३ व्रणावर औषध— किं. रु. ६

३४ भंद्रवकासुर याजवरील औषध. किंमत रुपये ७

३५ छोहा गुल्म या वरील औषध किं. रु. ६

३६ बहुमुत्रा वरील औषध—किं० रु० १०

३७ कामले वरील औषध—किं० रु. ५

३८ धातुक्षय, उरक्षत, पांडु याजवरील औषध किं. रु. १५

३९ गंडमाळे वरील औषध— किं. रु. ७

४० श्वेत कुष्टावरील औषध किं. रु. ३०

४१ कर्ण रोगनाशक तेल—दर कुपीस रु.१

४२ दातांचे मंजन—सर्व मुख रोगावर किं० दर तोळ्यास आणे ०३

४३ रक्त मुळ व्याधी वरील मलम व मुळी दर तोळपास किं. ०१२ आणे.

४४ वृश्चिक दोषा वरील औषध— तोळपास किं० ०१२ आणे.

वरील औषधें व अन्य सर्व रोगा वरील औषधें आणि वनौषधी प्रकाश, गरमींचें पुस्तक, सुषेण चिकीत्सा; गरीबाचा वैद्य. बाल वैद्य, गुराचा वैद्य हां पुस्तकें सदहूतील पत्त्यावर आह्माकडे मिळतील.

सावगीची सुचना

सदरहू अनुभविक औषधें व पुस्तकें फार मेहनतीनें व शोधानें केलेली आहेत सुमारे २०।२२ वर्षे पर्यंत मालक यांनीं हा कारखाना अव्याहत चालविला होता. मालक कैलासवासी झाल्यामुळें सदर कारखान्यांत फार दिवस काम केलेल्या इसमाकडून हा धंदा तसाच चालविला आहे.

या कारखान्यांत काम केल्याचें लिहून यांतील औषधाची कोणी जाहिरात दिली तरी तीं सदरहु पैकीं समजून धेऊन फसू नये खरा माल खालील पत्त्यावर मिळेल.

प्रकृतिमान कळविल्यास निदान करून योग्य औषधाची योजना करणेत येईल.

पत्ता के० वासुदेव चिं० बापट वकील यांचें वनौषधी आफिसचे व्यवस्थापक.

मु० नारिंग्रें.
ता० देवगड
जि० रत्नागिरी

## चांदीचीं भांडीं


श्रीक्षेत्र नासिक येथें तयार झालेली हर एक प्रकारचीं चांदीचीं भांडीं, चांदी उत्तम चिनई पट १७॥ पेनी चांदीबदल चौकशी करून घ्या. लिहिल्याप्रमाणें नसल्यास हाग परत घेऊं. बाहेर गांवचे देशबांधव यांचे सोयी करितां ही मुद्दाम जाहिरात प्रसिद्ध केली आहे. १ तांटें, तांबे, गडवे, पेले, मुंबईपात्रें, फुलपात्रें, वाट्या. पंचपात्रें, ड्रेन. याशिवाय अशा प्रकारचें इतर सर्व सामानाचा भाव दर तोळ्यास ०—॥। आणे वर तोळ्यानें विकत मिळेल.—२ दळ्या उपकरणी देवपुजेचें सामान वगैरे सर्व प्रकारचें बारीक सामानाचा भाव दर तो. ०=। आणे वरताळ्यानें देऊं—३ तबकें चौफुलें अत्तर दाण्या, गुलाबदाण्या, करंडे, डब्या वगैरे नक्षीचे सामानाचा भाव दर तोळ्यास ०=॥ आणे प्रमाणें वरताळ्यानें देण्यांत येईल—शिवाय चांदीचे व सोन्याचे दागीने ठुश्या वजरटीका सुद्धां घाटघडाई उत्तम पैकीं भाव वगैरे पत्रद्वारें कळेल—नासिकचे भांड्याचा घाट आपल्या देशांत उत्कृष्ट आहे हें सर्वांस माहीतच आहे. त्यांत आह्मी उत्तम कारागीराकडून हा सर्व माल तयार करून आमचे दुकानीं ठेविला आहे—शिवाय आमच्यापाशीं अडत ठेवणें असेल अगर व्यापाऱ्यास हर वेळीं विक्री करितां माल पाहिजे असल्यास त्याजबद्दलचा निराळा ठराव केला जाईल.

विशेष सूचना—चांदीचा भाव कमजास्त झाल्यास वरताळ्याचा भाव कमजास्त केला जाईल.

शिवाय घड्याळें रेल्वे रेग्युलेटर असून कांटे फिरविण्यास ठेस चावी देण्यास मोगरा घड्याळावर ट्रेडमार्क ( नासिक सुयस मेड मालकाचें नांव ) किंमत १२ रुपये ग्यारंटी ५ वर्षांची सोबत कांच कमान पेटी व ग्यारंटी मिळेल

वर लिहिलेलें सामान व्ही. पी. नेंही पाठविलें जाईल.

पत्ता—उदेचंद मुळचंद छाजेड फुल गल्ली पुलावर नासिक सिटी.



मराठी व इंग्रजी उच्चारासह मुंबईत पेतदार यांजकडे अगर आह्मांकडे.

गोविंद भा. ओंक
सदर बाजार, सोलापूर

नमुना नंबर १४२

दिवाणी कोर्टास सूचना

अज्ञानाच्या मालमिळकतीच्या वहिवाटीचें सरटीफिकीट मिळण्या विषयीं अथवा अज्ञानाचे पालन व त्याच्या मालमिळकतीचा कबजा करण्या लायक मनुष्य नेमण्या विषयीं वर्ग — सन १८९० चा अक्ट ८ कलम ६ प्रमाणें वर्ग १३

अर्जाचा नंबर ३ सन १८९५

डेपुटी कामिशनर साहेब जिल्हा एलिचपूर यांचे कोर्टांत.

अर्जदार जमनी मर्द किशोर शिंग क्षत्री आज्ञान पालन करणार.

आई जशोदा मर्द पहिलवानशींग
जात क्षत्री
राहणार मलोना ता० मेळघाट

वरील [ अज्ञान ] जमनी मर्द किशोरशिंग क्षत्री राहाणार मलोना ता० मेळघाट जिल्हा एलिचपूर यांणे [ याच्या ] मालमिळकताच्या वहिवाटीचें सरटिफिकिट मिळावें ह्मणून व याचे पालन व मालमिळकतीचा कबजा करण्या लायक मनुष्य नेमला जावा ह्मणून अर्ज दिला आहे. यास्तव मृत्यु पत्राचे आधारें किंवा दस्तैवजावरून, अगदीं जवळचे नातलगपणाचे कारणावरून, किंवा इतर प्रकारें ज्या मनुष्यास सदर्हू अज्ञानाचे मालमिळकतीवर संभाळ कर्ता या नात्यानें कबज्या करण्याचा हक्क सांगावयाचा असेल त्या सर्वांस या लेखानें कळविण्यांत येत आहे कीं त्यांणीं तारीख १८ माहे नोवेंबर सन १८९५ इसवी रोजीं स्वारी असेल तेथें वरील अर्जाची चौकशी होणार आहे त वेळीं ह्या कोर्टात हजर होऊन आप आपल्या हक्काची लेखी हकीकत दाखल करावी तारीख १५ माहे अक्टोबर सन १८९५ इ०

H. Godwin Austen.
Offg. Deputy Commissione
डेपुटी कमिशनर

## जाहिरात

स्कुल डिल किं० ०१० आज्ञाशद्ध

## The Berar Samachar

MONDAY OCTOBER 28, 1895

In connection with the annual sittings of the National Social Conference to be held at Poona a very important circular has been sent to the various local committees under the signatures of Dr. Ramkrishna Gopal Bhandarkar and Rao Bahadur Mahadev Govind Ranade. Social reform has been an apple of discord amongst the Poona people. We are sorry to say that a good deal of misapprehension prevails about the really evangelistic mission of the Conference. The Social Conference has been a rock where our ship of the National Congress is about to split; whereas it should be a help-mate of the political body. Political and social reforms should go hand in hand and one ought to be a stepping stone to the advancement of the other.

The circular is evidently a feeler of popular opinion. In order to bring home the social movement and to enter on a career of active work it is proposed to confine the deliberations of the Conference to *real* sympathisers and supporters of the institution. A list of eleven principal subjects which at present agitate the public mind is subjoined provisionally and we hope that none will spare himself the trouble of questioning in his own mind whether female education, the question about intoxicating drink and smoke, anti-nauch movement, amiable relations between Hindus and Mahomedans, permission about sea-voyage and foreign travel, intercommunication in point of food and marriage amongst the sub-castes, reforms in the matter of marriage, improvement of the condition of child-widows, registration of social organizations, rights of married widows, and compulsory imprisonment to force restitution of conjugal rights are not subjects which command on our hands a prudent thought and a thoughtful action. We hope our readers will note be wanting in sincerity and honest work. Philosophy of inaction has been so long the guiding deity of the social reform party but we think that the time is ripe for action and action alone.

The utility of anthropology is the subject of learned paper read by Professer Petrie at a meeting of the British Association in England. The lecture is most scientific but *popularized* in the ordinary ways of thinking. A science that philosophises upon the history of human progress is highly useful when it serves to teach an art of living in a community. It further supplies the artitstic checks and counter checks the division of labour and the convenience that arise from common action when a group of men live in close relation to each other. It is a science which gives rise to the art of Civilization. Civilization is thus a growing product of a complex set of conditions and it is therefore futile and abortive to force one civilization upon that of another race. In the opinion of the learned lecturer, an Anglocized Egyptian is but a blotting paper that absorts what is most superficial and undesirable. We are similarly confirmed in our opinion that the contact of the English people—a ruling race has been most destructive to our social fabric. But the question is how far we can undo those effects. Let one understand how anthropology is a practical factor in human life; and to help a reader in that direction we quote below an important para from the columns of the Allahabad Pioneer:—

"It is the business of anthropology to step in, and make a knowledge of other civilisations a part of all decent education. The origin and utility of the various customs and habits need to be pointed out, and in what way they are reasonable and needful to the well being of the community. And, above all, we ought to impress on every boy that this civilisation in which he grows is only one of innumerable experiments in life that have been tried; that is by no means the only successful one, or, perhaps, not the most successful that there has been; that there are many other solutions of the problems of community and culture which are as good as our own, and that no one solution will fit a different race, climate, or set of conditions. The highest form of this preception of other existence is reached in the best history—writing or fiction, which enables the reader to strip himsel for the time of his prejudices and views of life, and reclothe the naked soul with an entirely different personality and environment. Here we run against the special bigotry of the purely classical scholar, who looks on ancient literature as a peculiar preserve solely belonging to those who will labour to read it in its original dress. No one limits an acquaintance with Hebrew, Egyptian, or Arabic authors to those who can deal with those tongues; and Greek and Latin authors ought to be as familiar to the English reader as Milton or Macaulay. What seems to be the most practical course would be the recognition of civilisation or social life as a branch of general reading to be stimulated in schools, and encouraged by subsequent inquiry as to the extent to which it is followed and understood, without making it an additional fang of the examination demon. The books required for such reading should cover the life of Greece, Rome. Babylon, Egypt, and Mexico in ancient times; and China, India, Persia, Russia, Spain, and one or two low civilisations, such as the Audamans and the Zulus; in modern times, Neither histories nor travels are wanted for this purpose; but a selection of the literature which shall most illustrate the social life and frame of the community, with full explanation and and illustrations. We need not to excite wonder, astonishment, or disgust; but rather to enable the reader to realise the daily life, and to live in the very minds of the people. Where no literature is available, a vivid study of the nature of the practical working of their civilisation should take its place."

Dr. Little has given in his Sanitary report a very interesting account as to the law of casation that governs the sex in the production of animals:—

"Of the total live-births registered in 1894, there were 48,625 births of males and 46,134 births of females, the proportion of the sexes born being 105.3 males to every 100 females, a rate which corresponds very closely with the quinquennial mean proportion of the sexes at birth obtained in Great Britain and Ireland as shown below:—

| | |
|---|---|
| England ... ... ... | 103.7 |
| Scotland ... ... ... | 105.1 |
| Ireland ... ... ... | 105.5 |

The close uniformity in these figures not only indicates the relative correctness of our registration but also that the physiological law, whatever it may be, involved in the determination of sex, is pretty consistent in the countries under comparison.

The question how the sexes come into the world in the proportions they do, or what determines sex, is a problem of the future. Many theories regarding the determination of sex have been expounded since the days of Aristotle, who held that the sex is inherent in the germ; but Starkenweather's, law seems to have most acceptance, *viz.*, that sex is determined by the physically superior parent; also that the superior parent produces the opposite sex.

Thus a strong and well-nourished male, mated with a weakly female, will favour the production of females; the reverse condition favouring males.

An American horse-breeder claims to have reduced this theory to practice, and to be able to manipulate his stud so as to obtain colts or fillies at will.

Thus he maintains that by bringing the sire into a favorable nutritive condition by abundant and rich food and proportionate exercise, at the same time lowering the nutritive condition of the mare, the result of their interview will be a filly; while, on the other hand, by soft feeding and little exercise, he reduces the sire to a flabby and comparatively low, though possibly fat, condition, whilst raising the condition of the mare, the result will be a colt.

If this theory be true, it seems curious that the relations of the sexes at birth should be so steadily uniform year after year in this province as well as in the countries mentioned above.

In every district male births exceeded those of females, and ranged from 110 6 in Bassim to 103-6 in Wun. These two districts, showing the greatest variations, are the worst as regards regisrtration."

## वऱ्हाड

हवामान— आकाश मधून मधून मेघाच्छादित असतें परंतु पाऊस पड याचा फारसा संभव नाहीं. एक दिवसा पासून थंडी पडूं लागली आहे. धान्याच्या भावांत महर्गता आहे. व्यापाऱ्यास अजून तेजी नाहीं.

येत्या बुधवारीं उमरावतीस एज्युकेशनल कानफरन्स सालाबाद प्रमाणें भरणार आहे. तिचें कार्यपत्रक नेहमी प्रमाणें प्रसिद्ध झालें आहे. ता. ७ रोजीं संध्याकाळीं वऱ्हाड सामाजिक सभेची बैठक भरणार आहे. यंदा काय काय गोष्टी निघतात हें पाहण्याकडे बहुतजणांचें लक्ष्य लागलें आहे

आह्मास कळविण्यास दुःख वाटतें कीं रा. रा. गोपाळ रावजी ब्रह्म पेनशनदार— पोस्टल इनस्पेक्टर यांस देवाज्ञा झाली.

उमरावतीच्या तलावांतलें पाणी फेब्रुवारी पर्यंत संपेल असा अंदाज दिसल्या वरून त्या गांवच्या गोड्या पाण्याच्या विहिरी दुरुस्त करण्याच्या विचारांत तेथील मुनसिपालिटी आहे.

बदल्या— मे० प्रिंडा सा० अ० क० यांस बुलढाणें येथें डेप्युटी कमिशनर नेमल्यामुळें सेशन कोर्टाचे मदतनीस जज्ज जागीं मे० दस्तुर एदलजी क्यसनजी यांस नेमून त्यांचे हैदराबाद येथील अ० कानटानमेंटचे जागा मे० पंडीत सुरज नारायण अ० क० यांस नेमून त्यांचे जागीं बडनेर कोर्टावर मि० रामचंद्र नारायण दशपांडे बी० ए० ए० अ० क० यांची नेमणूक करण्यांत आली आहे.

मि० एडवर्ड नवीन आलेले ए. अ. क. यांची उमरावतीहून वाशीम येथें बदली झाली.

औरंगाबादेपासून ६ कोसावर रोझा ह्मणून एक रम्य गांव आहे तेथें व्हाईसराय लार्ड एलजिन तारीख ६ रोजीं जाणार असल्या कारणामुळें वऱ्हाडांतील पोस्टल अधिकारी कांहीं तिकडे गेले आहेत.

गेल्या शुक्रवारीं येथील अगरवेशीवर एक सहा वर्षाचा मुलगा नदीच्या काठावर खळत असतां पाण्यांत पडून मरण पावला.

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकिट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहिरांत

सन १८८९ चा अक्ट ७, कलम ६ प्रमाणें.

दिवाणी मु० नंबर १० वर्ग १९

१८९५

डेपुटी कमिशनर साहेब जिल्हा एलिचपूर यांचे कोर्टांत.

नांव— चंदुबाई

जवजे गिरधारीलाल मारवाडी.

राहणार— धामणगांव तालुके इलिचपूर जिल्हा इलिचपूर यांस मयत.

सिवनंदन जानकीराम राहणार धामगांव तालुके इलिचपूर जिल्हा मजकूर यांचें कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटिफिकीट मिळावें ह्मणून सदर्हू अर्जदार यानें अर्ज केला आहे. त्याज करितां सदर्हू मयत मनुष्याचे मालमिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्यांचा दावा असेल त्यांस जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं, त्यांनीं तारीख १८ माहे नवंबर सन १८९५ इ. रोजीं सदर्हू अर्जाची चौकशी होईल त्या वेळीं या कोर्टांत स्वारी असेल तेथें हजर होऊन आपापले हक्का विषयीं लेखी हकीकत दाखल करावी

तारीख ९ माहे अक्टोबर सन १८९५ इ०

H. Godwin Austen
Deputy Commissiounr
Eilichpur District
सिव्हिल जडज्ज.

जाहिरात

अकोलें येथील सर्व खाजगी गोडे पाण्याच्या विहिरींचे मालकास या नोटिसीनें कळविलें जातें कीं नळाचें पाणी एक महिन्यापेक्षां ज्यास्त दिवस पुरेल किंवा नाहीं याचा संशय आहे व नळाचे पाणी कमी झाल्यास नदीचे पाण्याचा उपयोग पिण्याचे कामीं जितका कमी करवेल तितका करणें इष्ट आहे. सबब त्यांनीं आपआपल्या ताब्यांत असलेल्या विहीरींतील गाळ काढून त्या साफ ठेव याची व्यवस्था फार लवकर करावी.

अकोला
ता० १।११।९५

W. N. Kale.
Secretary
Akola Municipal Committee.

वर्तमानसार.

राक्षसी बटाटा—न्युयार्क शहरांत मि. शान नांवाच्या बागवानानें एक प्रदर्शनीय बटाटा तयार केला आहे. तो सु० ९॥ फूट लांब असून त्याचा व्यास १ फूट २ इं० आहे. व त्या बटाट्याचें वजन ८६ पौंड १० औंस आहे ! ! ह्या लठ्ठ बटाट्याचा फोटो सायंटिफिक अमेरिकन पत्रांत काढलेला आहे.

बड्या क्राफर्ड साहेबांचे चिरंजीव काश्मिरचे रेसिडेंट होणार.

वकिलांची स्वतंत्रता संपुष्टांत आणण्या साठीं तयार झालेलें ‘ लीगल् प्राक्टिशनर्स ’ बील कलकत्ता येथील कौन्सलच्या बैठकींत निघणार.

ता० ११ नवंबर रोजीं पुणें येथें व्हैसराय साहेब भुळभेटीचा समारंभ करणार आहेत. संस्थानिकांची चुंब राजदर्शनास जमेलच.

महोत्साह—रशियाचे सार्वभौम झारांस पदाभिषेक होण्याचा समारंभ येत्या वसंत ऋतूंत व्हावयाचा आहे, त्याला जवळजवळ १ कोट रुपये खर्च होणार असें रशियन पत्रें सांगतात ! थोरांचें सर्वच थोर ! !

म्युनिसिपालिटीचा हुकूम तोडल्याचा गुन्हा एकाद्या युरोपियनानें केला, तथापि त्यांत सुद्धां ज्यूरीपुढें चौकशी चालावी असें पंजाबच्या हायकोर्टानें नुकतेंच ठरविलें ! सिमला येथील मेकग्रेगर साहेबांस वरील गुन्ह्याबद्दल डि. माजि. नीं ५० दंड केला होता; तो सदर्हू हायकोर्टानें रद्दकरून त्यांतच हा ज्यूरीचे हक्काचा ठराव केला आहे.

नंदुरबारची तमाम बाजारपेठ मागील पंधरवड्यांत जळून फस्त झाली. २ लाखांहून जास्त नुकसान झालें.

जुलूम—बाहार प्रांतांत फटवा येथील रेल्वे स्टेशनांतील विश्रांतीगृहांत ६० वर्षाच्या एका अंध भिक्षेकरी बाईवर जुलूम केल्याबद्दल एक खटले उपस्थित झालें आहे.

हैद्राबादचे निझाम साहेब विलायतेस जाण्याचे विचारांत असल्याची बातमी आहे.

तुरुंगांतील मुसलमान कैद्यानें निमाझ पढण्याची परवानगी मागितल्यास ती सुपरिं० नें वेळ व जागा नेमून देऊन द्यावी असें सरकाराने ठरविल्याचें कळते. हिंदूलाही अशी मोकळीक पाहिजेच. स. शो.

उतमान खेल व नवागजेच्या खानाची फौज यांच्या दरम्यान बाजोरच्या शेजारी नुकतीच लढाई झाली व त्यांत ६७ माणसें ठार झालीं आणि उतमन खेल यांची पीच्छेहट झाली. माहमुद लोक चाल करून येण्याच्या विचारांत आहेत असें सिमल्याच्या सरकारी बातमीवरून समजतें.

तुमची भेट घेण्याची रशियन बादशहाची इच्छा आहे; शांतता राखण्याची फ्रान्साची इच्छा आहे व जपानानें केरियांत आपलें ठाणें बसवावें हें रशियास सहन होण्यासारखें नाहीं, कारण तशा करण्यानें रशिया व चीन यांस नेहमीं त्रास होणार असें रशियाचा राजकीय वकील प्रिन्स लोबोनफ याणें जर्मन बादशहास एका भेटींत सांगितलें.

ज्या कोणाचा आवाज बसला असेल त्यास चांगल्या रीतीनें बोलतां यावें अशा प्रकारचें सिडनी युनिव्हर्सिटीचे प्रोफेसर स्टीवर्ट यांणीं एक यंत्र तयार केलें आहे असें सांगतात.

बेळगांवच्या बेरडांच्या दंग्यांत कोणी एक मास्तर व एक मुसलमान असे पुढारी आहेत असें बाहेर आलें आहे. विशेष माहिती अजून समजली नाहीं.

रशियांत पटकी सुरू आहे. १९ दिवसांत ४,००० लोक लागले व १७०० ठार झाले.

टर्कीतील मुसलमानांत विशेष चळवळ चालू झाल्यामुळें दंगेखोर ख्रिस्तीलोक घाबरू लागले आहेत.

टर्कीतल्या प्रजापक्षाच्या पुढाऱ्यांस गलबतांत भरून समुद्रांत लोटून दिलें असें सांगतात.

रशियाचीं लढाऊ गलबतें कोरियाच्या कामावर जाण्यास तयार होत आहेत.

रशियाच्या सामोपचाराच्या सूचनेवरून फ्रान्सानें मादागास्कर खालसा करण्याचा बेत रहित केला.

एक चांगली कडक लढाई होऊन टामाटेवच्या शेजारचे फारफवा हें ठिकाण फ्रेंचफौजेनें घेतलें.

दंग्याचे उत्पादक अर्मेनियन लोक असून त्या दंग्यांत २०० लोक ठार झाले असें टर्कीसरकार सांगतें.

इस्मिड जिल्ह्यांत वेगळाल्या ठिकाणीं नवे दंगे सुरू झाले असून त्यांत खूनही झाले.

टर्कीनें बेसिका बे येथें लढाईची तयारी चालविली आहे.

सुधारणा करण्यास टर्की तयार आहे, पण तूर्त नाहीं, कारण तसें केल्यानें टर्की बड्या राजाच्या धमकीस भ्याला असें होईल असें टर्कीचें ह्मणणें आहे.

अर्मेनियन प्रकरणाबद्दल रशियनपत्रें इंग्लंडावर अगदीं हल्ला करीत आहेत.

टांकिनच्या लढाईत फ्रेंचाचे ४० मले व १०० जखमी झाले.

कुबनच्या लढाईत स्पेनचे आजपर्यंत २,००० लोक पेले.

आमच्या हक्काचा निकाल करणें तुह्मी फार दिवस जें लांबणीवर टाकलें आहे तें आतां लवकर निकालास लावा अशी इंग्लंडानें वेनिझुलास शेवटची नोटीस दिली आहे.

बाळ्या, बुदेल्या व सत्या या बेळगांवाकडे दरोडे घालणाऱ्या तिघां बेरडांस जो धरून देईल त्यास प्रत्येकी ५०० रुपये प्रमाणें इनाम देण्याचा जाहिरनामा लागला आहे.

मासेडोनिया येथील फौजेच्या मदती करतां नवी फौज रवाना करण्याचें काम जारीनें सुरू आहे. यंदा फौजेंत ७६,००० लोक नव भरावयाचे असून ती संख्या गुदस्तांपेक्षां ३०,००० नी जास्त आहे व त्यांतील २२,००० लोक हेड क्वाटर मोनास्टर येथें भरावयाचे आहेत.

किसक खेडे व टर्कीची राजधानी हीं ठिकाणें डिनामिट लाऊन उडवून देण्याचा मासेडोनिया येथें एक गुप्त बेत झाला असें बाहेर आलें असून या करितां तेथें विशेष प्रकारचा बंदोबस्त करण्यांत आला आहे.

इटालियन सरदार जनरल बाराटिरी हा आपली फौज घेऊन चाल करून येण्याच्या पूर्वीच मांगेशिया याणें पळ काढला व ब्रेलेट येथें पिच्छेहट झाली. इटालीचे गोरे व काळे मिळून ११ शिपायी ठार झाले व ३० जखमी झाले.

अबिसिनियाची फौज फ्रेंच रायफल बंदुकांनीं सज्ज आहे.

अबिसिनियाचे राजास विजेचा धक्का बसला व त्या मुळें त्यांस बोलतां येत नाहींसें झालें आहे.

इटालीशीं सल्ला करण्याचा अबिनीनियाचा विचार चालू आहे. अ. द.

वायव्यप्रांतांत थंडीची सुरूवात जारीनें झाली आहे.

पंजाबाकडील फरूखाबाद येथें हिंदू मुसलमानांचा पुन्हा तंटा सुरू झाला आहे.

अमदाबाद येथें कान व डोळे यांचा दवाखाना होण्याचें घाटत आहे.

पंजाब प्रांतांत निरनिराळ्या रोगांनीं सुमारें एकतीस हजार जनावरें जाया झाली असल्यामुळें, लोक हवालदील झाले आहेत.

इजिप्तमध्यें कालरा फार चालू आहे.

ब्रह्मदेश व चीन यांमध्यें रेलवे करण्याचा इंग्रजांचा विचार चालला आहे.

कागदाचे पोषाक लौकरच होऊं लागतील असा संभव, युरोपांत दिसूं लागला आहे.

समुद्रांतील आरमाराकरितां वीस कोटी रुपयांचा खर्च करण्यास जपान तयार झालें आहे.

आफ्रिकेच्या पूर्व प्रदेशांत एक मोठी रेलवे बांधण्याची खटपट बरीच सफल होत आली आहे.

चीनच्या उत्तर पश्चिमेकडील मुलखांत व त्याच मुसलमानांनीं मोठी बंडाळी चालविली आहे.

इराणांतील खोरासन प्रांतांतील शेंकडो लोक रशियाच्या मुलखांत जाऊन राहू लागले आहेत.

जर्मनीची राजधानी बर्लिन येथें येत्या १८९६ च्या मे महिन्यांत एक जंगी प्रदर्शन होणार आहे.

नातालकडे रहाणारे हिंदुस्थानवासी लोक आपली एक मंडळी उभी करणार असल्याचें कळतें. ऐक्याचे बल विशेष आहे.

हिंदुस्थानांतील सर्व कापडावर जकांत ठेवण्याचा म्यांचेस्टरवाल्या व्यापाऱ्यांचा प्रयत्न, बराच स्वरूपास आलेला दिसतो. इकडच्या व्यापाऱ्यांनीं विचार करावा.

इजिप्तमध्यें कालऱ्याचा प्रादुर्भाव फार वाढल्यामुळें, त्याचा संचार युरोपांतही झपाट्यानें वाढेल अशी तिकडे भीति पडली आहे.

चीनने युरोपियन तऱ्हेचें शिक्षण देण्याकरितां चीन टिटसीन येथें एक युनिव्हर्सिटी स्थापन करून, तिच्यांत युरोपियन विद्वानांनां प्रमुख केलें आहे.

ल्यांकेशायर येथील कापडाच्या गिरण्यांची स्थिति फार वाईट झाली आहे. कित्येक गिरण्या बंद करण्याची स्थिति, कापडाचा खप कमी झाल्यामुळें आली आहे.

गोंव्याकडे लष्करी लोकांनीं चालविलेल्या दंग्यास भयंकर स्वरूप आलें आहे.

रशियानें जर्मन व फ्रेंच यांची एकी करून देण्याचें काम झपाट्यानें चालवेलें असून, त्यांत त्यास बरेंच यश मिळत चाललें आहे. या योगानें रशिया, जर्मन व फ्रेंच हे एकजीव होऊन, जपानला कोरियांत राहूं देणार नाहींत. इतकेंच काम करून न राहतां ते इंग्लंडला देखील त्रास देतील अशीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत. त्यावरून इंग्लंडला अशा सूचना होऊं लागल्या आहेत, कीं त्यानें रशियाशीं सामदान करून त्यास मिळतें होऊन रहावें. अखेर तितकें नबळेपण करण्यासही इंग्लंड कमी करणार नाहीं हें आजपर्यंतच्या वर्तनावरून दिसतेंच.

गोव्याच्या दंग्यांतील दोनशे शिपायी, सरकारनें माफी दिल्यास परत येण्यास तयार असल्यामुळें पहाडी लोक व बाकीचे शिपाई यांनीं त्यांस कैद केलें आहे. अद्याप कोणत्याच एका तऱ्हेचा निकाल लागला नसल्यामुळें, लोक हवालदील झाले आहेत. स. वि.

चिनांतील फुकिन प्रांतांत एक मोठें बंड उपस्थित झालें आहे. जपाना बरोबर लढाई देतांना चीन सरकाराला अनेक प्रकारचें नुकसान सोसावें लागलें असून आतां देशांतल्या लोकांचे बंडांची आपसांतील दंग्याची उस्तवारी करावी लागत आहे. दुर्दैव ओढवलें ह्मणजे असें चोहोंकडून ओढवतें !

कॉकेशस पर्वतावरील रानटी लोकांत अशी एक चाल आहे कीं, एखादा अविवाहित तरुण मनुष्य मेला असतां ज्या कोणाची उपवर मुलगी एक वर्षाच्या आंत मेलेली असेल तो गृहस्थ ह्या मृत तरुणाच्या बापाच्या घरीं येतो आणि आपली मेलेली मुलगी त्या मेलेल्या मुलाला देऊं करितो. असा करार झाल्यानंतर आंदण काय द्यावयाचें तें ठरणें! दी० बं०

एका महोत्सवाचे प्रसंगीं एक तंतुवाद्य वाजविणारा गवई बऱ्याच जनसमूहाच्या मध्यभागीं बसून वाद्य वाजवीत बसला असतां तें ऐकून एक दीड शहाणे गृहस्थ इतके खुष होऊन गेले कीं, पुढें तो गवई गाऊं लागला असतां या गृहस्थान आपलें तोंड त्याच्या तोंडाशीं नेऊन भिडविलें. गवयानें चट कन् आपल्या उपरण्याचा पदर घेतला व जसें कांहीं स्वतःच शिंकरतो आहे असा भाव दाखवून सपाटून त्या फाजील गृहस्थाचें नाक दाबलें. या विलक्षण कृतीनें तो गृहस्थ ओरडून मागें सरला. मग गवई ह्मणाला—महाराज! माफ करा! आपलें नाक इतकें माझ्या तोंडाजवळ आलें होतें कीं मला वाटलें हें माझेंच नाक !!

चीन देशांतली सगळी जमीन सरकारची असून ती लोकांना फार थोड्या भाड्यानें दिलेले असते. जमिनीची मालकी सरकाराखेरिज कोणाचीही नाहीं. सरकार घेतें, तें अगदीं अल्प असतें हें आतां वर सांगितलेंच. या भाड्याखेरीज जमिनीसाठीं दुसऱ्या कोणत्याही रूपानें पैसा जात नाहीं. सारा नाहीं, धारा नाहीं—इतकेंच नव्हे, परंतु या भाड्या खेरीज दुसरा कोणचाही कर सरकार घेत नाहीं त्या जमिनीच्या भाड्याची सरासरी मात्र दर डोक्यास सालीना सव्वा रुपया येते. चीनची जमीन इतकी सुपीक आहे कीं, एका माणसाचें पोट भरण्यास फारच थोडी जमीन लागवड करावी लागते. एक औरस मैल जमिनींत ३८४० माणसें पोट भरूं शकतात! करमणूक.

---

☞ हे पत्र अकोलें येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे “ वऱ्हाडसमाचार ” छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

| | | | |
|---|---|---|---|
| सहामाही | ,, ३ | ,, | ०८ |
| सालअखेर | ,, ७ | ,, १ | ०८ |
| किरकोळ | अंकास | .... .... .... | ०४ |

| | |
|---|---|
| Annual in arrears 7 ,, | 1 Rs. 8 as. |
| Six monthly ... ... ... | 3 ,, 8 as. |
| Single copy ... ... ... ... ... | 4 as. |

नोटिशी बद्दल.

| | |
|---|---|
| १० ओळीचे आंत रु० | १ |
| दर ओळीस .... | ०१०६ |
| दुसरे खेपेस .... .... | ०१ |

Advertisment.

| | |
|---|---|
| Below 10 lines ... | 2 Rs. |
| Per line over 10 ... | 4 as. |
| Repetition Per line | 3 as. |

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXIX — AKOLA MONDAY 11 NOVEMBER 1895 — NO 43

वर्ष २९ — आकोला सोमवार तारीख ११ माहे नोव्हेंबर सन १८९५ इ० — अंक ४३

## नोटीस

नोटीस वेशमी— भगवंत महादेव कुळकरणी हिवरखेड हल्लीं मुकाम अकोलें यांस— खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत यतें कीं आह्मी तुह्मांस ता० १० माहे सप्टेंबर सन १८९५ इ० रोजीं तुमचे मुक्त्यारपत्र रद्द करून आठ दिवसांचे आंत हिशाब समजून देण्यासाठीं व आमचे कागदपत्र दस्तैवज वगैरे समजून देण्यासाठीं मुदत दिली होती परंतु त्या मुदतींत आपलेकडून कोणतेही प्रकारचा निकाल झाला नाहीं करितां या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं ही नोटीस पावल्या दिवसापासून चार दिवसाचे आंत आमचे जमाखर्चाच्या वह्या व तिकीट वह्या आसामीचे सह्या करून घेतलेले व नवीन तुह्मी दस्तैवज करून घेतलेले व आमचे जुने दस्तैवज चालूं तुमचे जवळ असलेले ते खालीं लिहिल्याप्रमाणें:—

झिबलाजी वा। सटवाजी जामीन सोनाजीं वा। सटवाजी वस्ती पैलाम ता० उमरावती याचा दस्तैवज रुपये ७९९ चा. बाळाजी नारायण कुळकरणी पैलाम दस्तैवज ३०० रुपयाचा. बापु वा। रानोजी घोंगडे पैलाम दस्तैवज ५० रुपयाचा. राजाराम वा। इष्णाजी पैलामकर दस्तैवज ४५॥।– रुपयाचा. पांडू वा। विठोबा लकडे जांभ दस्तैवज ५० रुपयाचा.

येणें प्रमाणें दस्तैवज व कागदपत्र वह्या जमाखर्चाच्या व या शिवाय जे कांहीं कागदपत्र आहेत ते रा० रा० रामजी एकोबा भागवत रहाणार अकोला यास समजून द्यावे न दिल्यास रीतिप्रमाणें तजवीज करूं. व ज्या कांहीं दस्तैवजाची मुदत पुरी होऊन गेली व त्यापासून जे कांहीं आमचे नुकसान होईल तेंही नुकसान तुमच्यापासून भरून घेतले जाईल मग कोणतेही प्रकारची तकरार ऐकली जाणार नाहीं ह्मणून ही नोटीस दिली. ता० ६।११।९५ इ०

[ सही ] केशव बळीराम अज्ञान पालक मातोश्री रुखमाबाई जवजे बळीरामपंत राहाणार पैलाम हल्लीं अकोले नि० खु०

---

नमुना नंबर ( जी )

नादारी मुकदमा नंबर २७ सन १८९५

विद्यमान नादारी कोर्टाचे जज्ज जि० अकोला.

सर्व धनको यांसः—

नोटीस देण्यांत येते कीं, जयराम वल्लद उदेभान पाटील रहाणार वोडगांव हा नादारी आहे असा आज तारीख २६ माहे १० सन १८९५ इ० रोजीं ठराव झाला आहे. आणि तारीख ३० माहे नोव्हेंबर सन १८९५ हा दिवस नादाराचे सावकारांनीं नेमण्या करितां आणि सावकारांनीं आपले तर्फेचा असायनी नेमून देण्या करितां व नादारानें आपल्या सुटके विषयीं दिलेल्या अर्जाचा निकाल करण्या करितां नेमला आहे.

नादाराच्या सुटके संबंधीं ज्या सावकाराची तकरार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं त्या बद्दल आठ आण्यांच्या स्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी. त्या नोटिशींत ज्या आधारावरून तक्रार सांगणें असेल ते व त्या बद्दल ज्या साक्षीस समन्सें करण्याची इच्छा असेल त्या साक्षीदारांचीं नांवें नमूद करावीं. ही नोटीस नेमण्या करितां नेमलेल्या तारखेच्या निदान तीन दिवस तरी पूर्वीं दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पहाण्या करितां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड्या ठेविल्या आहेत. ज्यास नादारावर दावे नोंदाविणें असतील त्यांनीं आठ आण्यांचे स्टांपावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी व ते दावे खरे असल्या बद्दलचा प्रातिज्ञा लेख लिहून त्याजवर अर्जदारानें आपली सही केली पाहिजे.

जे सावकार दूरचे राहणारे असतील त्यांनीं आठ आण्यांचे स्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या जुडिशियल आफिसरापुढें तिच्या खरेपणा विषयीं शपथ लिहावी आणि ती यादी टपाला कडून कोर्टांत पाठवावी. ह्मणजे दावे रजिस्टरांत दाखल होतील. कळावें ता. ४।११।९५ इ०

B. B. Sule.
Judge
Bankruptcy Court.
Akola District.

---

वऱ्हाडसमाचार

मिती कार्तिक वद्य ९ शके १८१७

वकीलीची सनद परीक्षा घेऊन दिली जाते तेव्हां वकीलाला कांहीं कायद्याचें ज्ञान असतें आणि त्या ज्ञानविक्रयावर वकिलीची दुकानदारी त्यास चालवावयाची असते. हा कायद्यांतील पांडित्याची खरी किंमत पुष्कळास ठाऊक नसते पण प्रत्येक वकिलाचा थोडबहुत नांवलौकिक लोकांस माहित असतो आणि त्या धोरणानें पक्षकार उड्या घालतात किंवा माघार घेतात. पक्षकारांसही कोणी राजोच्या व पुढारी मनुष्य पाहिजे असतो ह्मणून तो शिकार टेहळत असलेल्या दलालाच्या जाळ्यांत सांपडून सर्व थैव फसतो असेंच नाहीं तरी त्याचा कांहीं पैसा व्यर्थ खर्च होतो. प्रतिस्पर्धी पुष्कळ वकील उपलब्ध असले ह्मणजे गिऱ्हाइकी मिळण्यासाठीं पक्षकारांच्या मागें दलालाचीं सुदर्शनचक्रें वकील फेंकीत असतील तर त्या मध्यें वकिलीच्या धंद्याला कमीपणा येतो व कायद्याच्या गुन्ह्यांत सांपडण्याचीही तयारी होत असते.

भावी नवीन कायदा जुन्या प्रमाणेंच निरुपयोगी ठरेल इतकेंच नाहीं तर नवीन कायद्या पासून दुसरे अनर्थ अनेक उद्भवतील. वकिलीच्या धंद्याची स्वतंत्रता रद्द होईल. वकिलाविरुद्ध लचांडें उत्पन्न करून त्यास जमीनदोस्त करण्याचीं साधनें दुष्ट लोकांस बहुत मिळतील आणि परिणामही अत्यंत दुःखकारक व अहितावह घडतील. आमच्यामतें वकील व न्यायाधीश यांच्या सल्लामसलतीनें, त्यांच्या उदार विचारानें व परस्परांचा लौकिक वाढविण्याच्या प्रतिस्पर्धेनें दलालीचा धंदा आपोआप लयास जाईल. नैतिक किंवा व्यवहारिक सुधारणा कायद्याच्या द्वारें घडत नसतात. कायद्याची मदत केवळ अमर्याद दुर्वर्तनाला बंद करण्यासाठीं पाहिजे असते पण बाकीच्या अक्षम्य गोष्टी लोकमताच्याच जोरानें बंद कराव्या लागतात व तेथें कायद्याची गति होऊं शकत नाहीं.

सूक्ष्म व्यवहारिकदृष्टीनें विचार केला ह्मणजे दुनियेंतल्या कोणत्या व्यवहारांत दलालीचा प्रकार आढळून येत नाहीं बरें! व्यापारी आपला माल खपण्यासाठीं पुष्कळ युक्त्या लढवितात आणि त्यामध्येंच दलाली देण्याचा एक प्रकार आहे. व्यवहाराची मोडणीच अशी आहे कीं आपल्या मालाला किंमत चांगली येईल असा बाजार शोधावा लागतो आणि हा बाजार मिळविण्यासाठीं अनेक दलाल्या द्याव्या लागतात. पण समाजाच्या कल्याणाकडे दृष्टी देऊन जशी लग्नाच्या व्यवहारांतली दलाली निंद्य मानली आहे त्याच प्रमाणें जनसमूहाच्या हितासाठीं वकिलाच्या धंद्यांत दलाली असूं नये ह्मणून ठरलें आहे. हा नियम समाजाला इष्ट आहे तर तो चांगला पाळला जावा ह्मणून वकिलांनीं व न्यायाधीशांनीं आपल्या एकाग्र चित्तानें व संकलित मतस्थैर्यानें खबरदारी घेतली पाहिजे पण यासाठीं हल्लीं सूचविलेला कायदा तिळप्राय नको.

---

ठिकठिकाणच्या वकिलांनीं नव्या कायद्याच्या सुचने विरुद्ध आपापले अभिप्राय कळविले आहेत त्याप्रमाणें वऱ्हाड प्रांतांतील वकिलांनींही करण्यास चुकूं नये अशी आमची इच्छा आहे. वऱ्हाडांत अशी स्थिति येऊन पोंचली आहे कीं प्रांतस्थ वकिलांची एक सभा असली पाहिजे आणि त्या सभेमार्फत वारंवार उपयुक्त व महत्वाच्या गोष्टी संबधानें लोकमत यथाधार लोकांच्या समोर येत गेलें पाहिजे. आमची सूचना कांहीं नवीन नाहीं पण अद्याप सभा स्थापण्यांत आली नाहीं ह्मणून हें मुद्दाम लिहिणें भाग आहे.

---

वकिली संबंधानें जो बहुत वर्षांचा जुना कायदा आहे तो वस्तुस्थितीला अनुरूप असावा तसा नाहीं असें वाटल्यावरून त्या मध्यें कांहीं नवीन सुधारणा करण्याचा व्हाइसराय साहेबांच्या कायदे कौंसिलाचा विचार आहे. हल्लीं असें प्रत्यंतरास आलें आहे कीं, कांहीं दलाल वकिलांशीं संधान बांधून पक्षकार लोकांस आपल्या वकिलाच्या घरीं नेऊन घालतात आणि लांबलचक व अघळपघळ थापा देऊन पक्षकारांस वकील करून देतात व वकिलास पक्षकार आणून देतात आणि सर्व बेत सुयंत्रपणें सिद्धीस गेला तर पक्षकारांकडून तसेंच वकिलाकडून दलाली उपटतात. या दलालीचा एक धंदाच कांहीं लटपटी व चलाख लोकांना होऊन गेला आहे. वकिलांचे पांडित्यावर किंवा त्यांच्या काम करण्याच्या शैलीवर ही निवड होत नसून निव्वळ दलालीच्या दृष्टीनें दलाल ही निवड करीत असतात. वकिलाचा धंदा तेजीवर येतो व दलालांची चांगाळी उडते पण पक्षकार लोक भोळ्याभावानें दलालांच्या हातीं आपला गळा देतात आणि पैशानें व विश्वासघातानें सफै बुडतात. असे अनर्थ दलालांच्या हातून घडतात आणि त्यांचें दुरीकरण करावें ह्मणून हल्लीं नवीन कायद्याचा मसूदा निघाला आहे.

वकिलांशीं दलालीचा व्यवहार मुळींच कायद्यानें मना केला आहे. परंतु या मनाईनें कार्यभाग मिटत नाहीं, ह्मणून अधिक कायदा करण्याचा विचार करून वकिलांवर सक्तीची पैरवी ठेवण्यांत येणार आहे. पक्षकारांस आणणारा दलाल ह्मणून जो नाणवलेला आहे त्याची गांठ पडली ह्मणजे वकिलानें आपलें काम यथाशास्त्र असल्याचें शाबीत करावें आणि असें सिद्ध होत नाहीं तों पर्यंत सर्व अनुमानें वकिलांच्या विरुद्ध जातील असा नवीन नियम सूचविला आहे. हा नियम पक्का अमलांत येण्यासाठीं वकिलांची बहाली, बडतर्फी जिल्ह्याच्या मुख्य अधिकाऱ्यांच्या हातीं दिली आहे.

पुराव्याच्या शास्त्राला अपवादक असें तत्व वरील कायद्याच्या मसूद्यांत गोंविलें आहे. वकिलांच्या कामावर करडी देखरेख ठेवण्याच्या हेतूनें त्यांच्यावर जुलूम, व अन्याय करण्याच्या पळवाटा व युक्त्या नवीन कायद्यानें नवीन सिद्ध केल्या आहेत ह्मणून हा नवा खर्डा पसार होऊं नये असें सर्वत्र लोकमत आहे.

---

ख्रिस्ती धर्म राजधर्म असल्यामुळें पाद्री भटांच्या संस्था वऱ्हाडांत पुष्कळ झाल्या

आहेत आणि वेळोवेळ बाप्तिस्मा देण्याचे योग कमजास्त नीच जातीच्या लोकांस. ध्यें येत असतात. पण आह्मांस आमच्या छापखान्या समोरील जुमामशिदींत महमदी धर्माची दीक्षा दिल्याच्या पर्वण्या दृष्टीस पडतात. धर्मान्तर धर्मदृष्टीनें कोणी केलें तर बरें पण नेहमीचीं उदाहरणें व्यवहारांतल्या लाभ दृष्टीनें घडत असल्याचें वारंवार दिसून येते अशा धर्मान्तराला आह्मी धर्माची अवहेलना समजतों.

---

डाक्टर लिटल यांनीं मुलामुलींच्या उत्पत्ती विषयीं एक मौजेची माहिती गेल्या आरोग्यविषयक रिपोर्टीत दिली आहे सन १८९४ सालीं एकंदर ९४७५९ मनुष्यें जन्मास आलीं आणि तीं जन्माच्या वेळीं जीवंत होतीं. या जनसंख्येमध्यें ४८६२५ पुरुष असून ४६१३४ स्त्रिया होत्या ह्मणजे सरासरीनें १०० स्त्रिया जन्मल्या तर १०५.३ पुरुष जन्मतात असें प्रमाण निघतें. वऱ्हाड प्रांतांत लिंगभेदाचें असें प्रमाण आढळतें आणि ठोंकळ मानानें हेंच प्रमाण इंग्लंड, स्काटलंड व आयर्लंड या देशांत आढळतें. गेल्या पांच वर्षांत जन्मलेल्या स्त्रीपुरुषांचें प्रमाण देशावारीनें येणें प्रमाणें आहेः—

| जन्मास आलेल्या प्रत्येक १०० स्त्रिया बरोबर | पुरुष |
| --- | --- |
| इंग्लंड | १०३.७ |
| स्काटलंड | १०५.१ |
| आयर्लंड | १०५.५ |

अशा प्रमाणानें स्त्रीपुरुषांची उत्पत्ति होत आहे.

वऱ्हाड प्रांतांतील जन्माची संख्या ग्रेट ब्रिटन व आयर्लंड देशांतील जन्मसंख्येशी ताडून पहातां बरेंच साम्य दृष्टीस पडतें. लिंगभेदाचें प्रमाण जवळ जवळ एकच आहे. विलायतेंत जन्ममरणाची नोंद बरोबर होत असते आणि तशीच आमच्या प्रांतीं ही नोंद बिनचूक होत असें दिसतें आणि याही स्थळीं स्त्रीपुरुषांच्या उत्पत्तीला एकच लिंगनियामक सिद्धान्त लागूं पडला पाहिजे.

भिन्नभिन्न योनींची उत्पत्ति कशी होते हा शोध मोठा खोल आहे आणि त्याचप्रमाणें जगामध्यें स्त्रीपुरुषांचें प्रमाण अनुरूप कां आढळत हेंहीं कांहीं सकारण सांगतां येत नाहीं. लिंगोत्पत्तीविषयीं पुष्कळ शास्त्रवेत्यांनीं विचार केला आहे पण अद्याप कोणताच सर्वसामान्य सिद्धान्त कळलेला नाहीं. स्त्रीपुरुषांच्या जन्माविषयीं अनेक तत्वज्ञांचीं अनेक मतें आहेत. हा सृष्टिचमत्कार आपण युगांचीं युगें पहात आलों इतकेंच नाहीं तर त्याचें उत्पत्तिकारण हीं आपणच आहों. पण आपलीच कर्तृत्वशक्ति आपणास उमगत नाहीं आणि ईश्वरेच्छेनें ह्मणा किंवा कांहीं अदृष्ट नियमानें ह्मणा, स्त्री पुरुषांच्या योनिसंगमामध्येंच कांहीं अतर्क्य कारणमाला निष्पन्न होते आणि त्या मालेचें कार्य स्त्रीपुरुषांच्या रूपानें आपणास परिणामीं दृष्टीस पडतें.

प्राचीन काळचा जगविख्यात तत्ववेत्ता आरिस्टाटल याचा अभिप्राय असे कीं बीजामध्यें लिंगाचा उगम आहे. हें मत ह्मणजे आपल्या शास्त्रातला बीजांकुरन्याय होय.

आमच्या दृष्टीनें हें मत चुकीचें आहे. वनस्पति सृष्टींतल्या किंवा उद्भिज कोटिंतल्या चमत्काराला हा बीजांकुरन्याय चांगला लागूं पडतो. जमिनींत जें धान्य पेरावें तें उगवतें ही गोष्ट सर्वास ठाऊक आहे. गहूं पेरला तर गहूंच येईल हें खरें पण त्यामुळें मनुष्यसृष्टीमध्यें स्त्री पुरुष कसे निपजतात हें कांहीं सिद्ध होत नाहीं. बीजांकुरन्यायामध्यें आपली समजूत अशी असते कीं जमीन ह्मणजे स्त्री आणि पेरलेलें बीं ह्मणजे पुरुष; या दोघांच्या संगमापासून जसें बीं तसें धान्य येतें. हाच नियम मनुष्य कोटींला लागूं केला ह्मणजे असें ठरतें कीं स्त्रियेच्या ठायीं पुरुषाच्या रेताप्रमाणें मुलगी किंवा मुलगा निपजते. हा नियम केवळ सादृश्यदृष्टीनें बसविलेला आहे आणि तो फार भ्रामक आहे.

अलिकडील नवीन शोधावरून आरिस्टाटलचें मत चुकीचें दिसतें. पुरुष जातीचें किंवा स्त्री जातीचें मूल निपजण्याला कांहीं विवक्षित पूर्व गोष्टी कारणीभूत असतात असें सध्यांच्या शास्त्रज्ञांचें मत आहे. या गोष्टी ह्मणजे मुलाच्या मातापितरा पैकीं पिता बलानें श्रेष्ठ असेल तर तो स्त्री जातीचें मूल निर्माण करितो; आणि माता बल श्रेष्ठ असेल तर पुरुष जातीचें मूल निपजतें. या वेळीं हें ध्यानांत धरलें पाहिजे कीं प्रजोत्पत्तीला आवश्यक जे गुणधर्म ते सर्व स्त्री पुरुषांच्या ठायीं आहेत; व या गुणधर्मामुळें संभोगकाळीं स्त्रीला गर्भ राहिला आहे. गर्भस्थ अर्भक कोणत्या जातीचें होईल असें भविष्य अनुमानणें असल्यास वरील मताच्या अनुरोधानें निर्णय करावा. स्टार्कनवेदरचें मत ह्मणून हें नवीन मत प्रसिद्ध आहे. हा अनुमानपंथ सामान्य आहे आणि तो पक्का कायमचा झाला असेंही कांहीं नाहीं. अधिक शोध लागले ह्मणजे या मतांतही फरक पडेल परंतु या मतानें बहुत स्थळीं बिनचूक अनुमान निघतें ह्मणून तें सांप्रत विशेष ग्राह्य आहे.

अनेक प्रसंगीं असें अनुभवास आलें आहे कीं पुरुष शरीरानें बळकट व खाऊन पिऊन खुशाल असा असला आणि स्त्री नाजूक व अशक्त असली तर अशा दंपत्यापासून मूल स्त्री जातीचें निपजेल; आणि हेंच दंपत्य उलट स्थितींतलें असलें तर पुरुष जातीचें मूल निपजेल.

अमेरिकेमध्यें एका गृहस्था जवळ एक घोड्याची पागा आहे व तो चांगला अश्वपरिक्षक आहे. आणि त्याची व्यवस्था इतकीं हुकूमी आहे कीं त्याला वाटेल तसें शिंगी किंवा तट्टू याचें वेत काढून घेता येतें. त्याची व्यवस्था सर्व स्टार्कनवेदरच्याच मतावर बसविलेली आहे. या अमेरिकन गृहस्थाचें ह्मणणें आहे कीं घोड्याला चंदी वगैरे पुष्टिदायक पदार्थ खाण्याला देऊन तो व्यायायानें चांगला तयार करावा आणि त्याच वेळीं घोडीला थोडी कमताकद करावी आणि नंतर अशा घोडीला तो घोडा दाखवावा ह्मणजे हटकून शिंगी निपजते. याच्या उलट अनुभव घेतला तेव्हां असें आढळलें कीं घोडा घोडीच्या मानानें मांसल बांध्याचा, सुस्त व कमजोर झाला होता व घोडी उमदी ताजीतवान व चांगली तयार होती आणि त्यांच्या संभागापासून जें शिंगरूं निपजलें तें तट्टू होतें.

हें नवीन मत खरें असेल तर नवल इतकीच जन्मलेल्या मुलांमध्यें मुलगे व मुली यांचें प्रमाण पूर्वी प्रमाणेंच कायम आहे आणि त्यांत कांहीं तफावत ह्मणण्या सारखा पडत नाहीं. वऱ्हाडांत व विलायतेंत आरंभीं कळविलें मुलामुलींचें प्रमाण अजून कायम आहे. या मताप्रमाणें मनुष्याला प्रजोत्पत्ति पुरुष जातीची किंवा स्त्रीजातीची जशी पाहिजे तशी करितां यावी; परंतु वास्तविक पाहतां मनुष्याचें सामर्थ्य इतकें लांबवर पोंचलेलें नाहीं. वरोबर या मताची सत्यता किंवा असत्यता प्राचितीस येण्याचा संभव आहे तेव्हां सूचना करावयाची ती इतकीच कीं एखाद्या स्थळीं हें अनुमान चुकलें ह्मणजे लागलींच तें त्याज्य मानूं नये. शंभर दोनशें उदाहरणें लक्षांत घ्यावी आणि नंतर गोळाबेरजेनें अशा मताची सत्यता ताडून पाहण्यांत यावी.

---

श्रीमंत नामदार दुर्भंगाचे महाराज यांस येत्या राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष नेमण्याविषयीं लोकांचा विचार होता पण कांहीं अन्य कार्यामुळें फुरसत नाहीं ह्मणून महाराजांनीं दिलगिरी दर्शविली आहे. आतां दुसऱ्या एखाद्या श्रेष्ठ व लोकमान्य गृहस्थाची अध्यक्षस्थानीं निवड करण्या संबंधानें वाटावाट चालूं आहे. काल फार थोडा राहिला आहे तर भावी अध्यक्षाची निवड लवकर झालीच पाहिजे. आरंभीं राष्ट्रीय सभेच्या पूर्व इतिहासाचें सिंहावलोकन करून पुढील कार्याची दिशा विवेचनानें दर्शविण्याचें काम अध्यक्षांचें असतें तेव्हां तें काम उत्तम रीतीनें होण्यासाठीं बराच काल अध्यक्षाला पाहिजे असतो. ही गोष्ट ध्यानांत आणून सत्वर निवड होईल अशी आह्मास उमेद आहे.

---

यंदा पुण्यास राष्ट्रीय सभा कशी काय भरते या विषयीं मोठी चिंता पडली होती पण वादसमुद्र शांत झाला आहे आणि राष्ट्रीय सभेच्या कार्याला सर्वजण एक दिलानें लागले आहेत. स्वागत कमिटी नेमण्यांत आली. राष्ट्र कार्याला आपल्या सेक्रेटरीपणामुळें कदाचित अडचणी येतील अशा साशंक मनानें परिणामावर दृष्टी देऊन नामदार बाळ गंगाधर टिळक यांनीं सेक्रेटरीच्या जागेचा राजिनामा दिला असें 'केसरी' वरून समजतें. नामदार टिळकांनीं राजिनामा दिला हें त्यांच्या संबंधानें त्यांनीं चांगलें केलें आणि ही गोष्ट त्यांच्या मनाच्या थोरपणाची दर्शकही असेल परंतु आमच्या मतें ते सेक्रेटरीच्या अग्रस्थानींच अधिक लाभप्रद होतील आणि त्यांच्याच कर्तबगारीनें पुष्कळ जनसमूह राष्ट्रीय सभेच्या कार्यानिमित्त आपोआप मनापासून झटूं लागेल नामदार टिळकांच्या अंगीं बहुत अनुपम गुण आहेत आणि त्यामुळें पुष्कळ लोक त्यांच्या धुरीणत्वा खालीं वाटेल त्या तऱ्हेनें डुलण्यास तयार असतात. तेव्हां अशा सन्मान्य गृहस्थांस मंडळींनीं अलिप्त, त्रयस्थ व निष्काम राहूं देऊं नय आणि तशीच व्यवस्था होईल असा आमचा समज आहे

---

राष्ट्रीय सभेचें स्थळ पुण्याच्या चतुःशृंगीच्या मैदानांत योजिलें आहे. सुमारें सहा हजार लोक एकत्र बसतील असा भव्य रमणीय सभामंडप देण्यांत येत आहे. पुण्याच्या व्यवस्थापक मंडळीच्या सेक्रेटरींनीं यंदा सभेपुढें येणाऱ्या विषयाचें संक्षिप्त टांचण सर्वांच्या माहिती साठीं प्रसिद्ध केलें आहे. विषयांची नामावळी येणें प्रणाणेंः— (१) इंडियन खर्चावर बसलेलें रायल कमिशन; (२) कायदे कौन्सिलांत सभासदांच्या मताला मान न देतां वरिष्ट सरकारच्या हुकूमाला मान देण्याचें नवें धोरण; [३] कापसाच्या मालावरील आयात व निर्यात कर; (४) हुंडणावळीच्या भावापेक्षा सिव्हील व लष्कारी खर्च अवाढव्य असल्यामुळें पडत असलेली तूट; [५] सरहद्दीवर इंडियांतला पैसा खर्च न करण्याविषयीं कांहीं धरबंध ठरवणें [६] कायदे कौन्सलांत प्रश्न विचारण्याचा व बजेटा विषयीं वादविवाद करण्याचा हक्क आहे, तो अधिक सवलतीचा करण्या विषयीं प्रयत्न, [७] दंग्याच्या स्थळीं पोलिस फौज ठेवण्या विषयाचा नवा कायदा, (८) जुरीच्या मताला धक्का पोंचविण्याचा मसूदा रद्द करणें, [९] जामिनी वरील मालकीचें हक्क कमी करण्या विषयीं कायद्याची खटपट बंद करणें, (१०) सारा वाढविण्याच्या मर्यादा नेमस्त करणें, [११] जंगलचा कायदा सुधारणें, [१२] प्राव्हिनशिअल सरव्हिसचा प्रश्न, [१३] मेडिकल खात्यांतली जागा नेटिवांस देण्या विषयीं मागणी, (१४] धनोत्पादक सार्वजनिक कार्यासाठीं पौंडामध्यें भांडवल उभारूं न देणें, [१५] नाण्याचा कायदा व टांकसाळी बंद करणें, [१६) हुंडणावळीमुळें पगाराची वाढ, [१७] आफू व गांजा यांच्या विषयीं कमिशनचा रिपोट, [१८] ब्रिटिश कांग्रेस कामिटी, [१९] स्टांडिंग कांग्रेस कमिटीच्या कामाच नियम, आणि [२०] राष्ट्रीय सभेचा फंड.

असे अत्यंत महत्वाचे प्रश्न यंदा सभेपुढें येणार आहेत. ठिकठिकाणीं प्रतिनिधी निवडण्या साठीं जाहिरसभा भरवून हे विषय लोकांस कळवावे आणि प्रतिनिधींच्या द्वारें लोकमत राष्ट्रीय सभेंत कळविलें जावें असा मूळ उद्देश वरील विषय अगोदर प्रसिद्ध करण्याचा आहे. उद्देशाला अनुसरून कांहीं गोष्टी फलद्रूप होतील अशी पूर्ण आशा आहे.

---

प्रोफेसर श्रीधर गणेश जिन्सिवाले एम्. ए. याचें बडोद्यास नुकतेंच एक सुरस व्याख्यान झालें. 'आतां आपलें पुढें होणार तरी कसें' हा व्याख्यानाचा विषय होता. त्यांचें संभाषण नेहमीं प्रमाणें गोड व मनाला उत्साह देणारें होतें. गेल्या ज्ञान प्रकाशांत याचा, पुष्कळ भाग छापलेला आहे. त्यांच्या भाषणाचा मथितार्थ असा कीं आपल्या देशाला सध्यां ऱ्हासकाल आला आहे तरी भिण्याचें कारण नाहीं. आपला देश कालचक्राच्या हजारों वर्षांच्या फेऱ्यांतून निभावलेला आहे; आपल्या देशामध्यें कांहीं चिवटपणा आहे आणि इतर राष्ट्राच्या मानानें या देशाचें सामर्थ्य व जीवनशक्ती फार मोठी आहे. इंग्लिश राष्ट्राची भरभराटी अलिकडी-

ल पांच सातशें वर्षांची आहे. हिंदुस्थान ची स्थिती अगदी निराळी आहे मुसलमांनी च्या स्वाऱ्या होऊं लागल्या पासूनच काय ती आठशें वर्षें आपली पारतंत्र्यांत गेली आहेत. धर्मश्रद्धा व देशाभिमान यांचा आपल्या मध्यें पुष्कळ लोप झाला आणि हेंच कारण राष्ट्राच्याअपकर्षाचें होय; अलिकडील शिक्षण पद्धतीनें आपण आपल्यासच नवखे झालों आहों; आमचे प्राचीन ग्रंथ आह्मास ठाऊक नाहींत मग त्यांत पारंगतता नाहीं हें उघडच आहे. अलिकडील सुधारणेनें इंग्लिशलोकांच्या अनर्थकारक चाली मात्र स्वीकारल्या आहेत. ब्लाटिंग कागद जसा वाईट साईट टिपके व घाण लिहिलेल्या कागदा वरील टिपून घेतो त्या प्रमाणें इंग्लिश लोकांच्या साहचर्यानें आपली स्थिती झाली आहे. तलवारीनें लढण्याचा काल आतां गेला. यापुढें आपलें भांडण युक्तीवादाचें आहे आणि राज्यकर्त्यांपासून आपण हळू हळू आपले हक्क संपादले पाहिजेत. भांडल्या शिवाय—आणि तें भांडण देखील निकराचें झालें पाहिजे—आपणास इष्ट हक्क साध्य होणार नाहींत.

गेल्या गुरुवारीं सायंकाळीं उमरावतीस वऱ्हाड सामाजिक सभेची वार्षिक सभा भरली होती. अध्यस्थानीं रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी हे होते. प्रमोधसिंधुकर्ते लिहितात कीं यंदा सभेचें काम समाधानकारक झालें आणि गडगड व बखेडा कांहीं झाला नाहीं. राष्ट्रीय सामाजिक परिषदेला वऱ्हाड प्रांतातर्फे ४९ प्रतिनिधी निवडून धाडण्यांत आले. एकंदर ४०० सभासद या प्रांतिक संस्थेचे आहेत. ही संख्या लोक वस्तीच्या मानानें अगदीं थोडी आहे. रा. रा. व्यंकटेश रामचंद्र मुधोळकर यांनीं गत वर्षीच्या रिपोर्टांत पुष्कळ उपयुक्त माहिती दिली असून त्यांत आकोल्याचे राजश्री जानु महार यांनीं स्थापिलेला महार मेळा, देशमुख सभा इत्यादि सुधारणाविषयीं हकीकत आहे. डाक्टर भांडारकर व रावबहादूर रानडे यांनीं घाडलेले सरक्युलरांतील विषयांचा जमलेल्या मंडळीनीं चांगला खल केला आणि ते विषय पुण्याच्या बैठकींत निघावे असें बहुमतानें ठरलें.

## The Berar Samachar

MONDAY NOVEMBER 11, 1895

For the several months past there prevails a good deal of agitation both in thought and action at Poona the old capital of the Peshwas. The popular mind is busy with social problems. The vigorous litarary warlares waged by the Press and the hot discussions carried on by some zealots in furtherence of their view have been too widely made known to the general public to require special mention here. The excitement of the party spirit is so full that an anxious solicitude is felt and expressed all over India in fear that this contagion of extreme party devotion might if not checked in time, so far propagate its evil and mischievous consequences as to involve the National Congress into a serious danger of its existence.

But she clouds of discord and distrust amongst the leading members do not any longer darken the atmosphere and the spell of a common cause and harmonizing influences of the Nation Congress have brightened the political horizon. A largely representative Reception Committee is formed and a circular of the proposed subjects for discussion and deliberation at the annual sittings has been freely sent round to prepare public opinion on those principal subjects. Looking to the several subjects proposed for discussion in the Eleventh National Congress Meeting to be held next December at Poona, one imagines that there are so many questions of vital interest and importance asking for a clear lucid solution, that the National Congress is hardly capable of devoting adequate attention to them all, having as it has a very limited time at its disposal. The proper course which that august deliberative Council is compelled to adopt is to select out of these only such grave topics as seem to be exceedingly bound up with the national welfare present as well as prospective. Each of the subjects appearing in the list given below, has its own importance. 'The Royal commission on Indian Expenditure' brought into life only of late, has attracted the Indian mind to a very large extent. The Commission aims at a close inquiry into the condition of the Indian Exchequer. Much good could have been hoped for from the the Commission had it been not limited in its scope of inquiry and had it not been likely to be biassed by the re-actionary policy of the present Government and by the subversive and selfish tendencies of the Englishmen in India. The rest of the subjects are equally comprehensive and important. The work of the National Congress has become more onerous and it is to be hoped that the people will not shrink an inch at this critical juncture.

The circular which Messers. Gadgil and Gokhale have issued to all standing Congress—Committees runs as below towards the close:—

"We beg to suggest for the consideration of the Congress Committees throughout India and for the deliberation of the Congress itself when it meets here the following subjects.

1. The Royal Commission on Indian Expenditture.
2. The doctrine of the "Mandate" over-riding freedom of voting in Legislative Councils.
3. The Excise and Import duties on cotton goods.
4. The growth of Civil and Military charges, a more potent cause of financial disturbance than the fall in exchange.
5. Additional checks necessary than are already provided against employment of Indian revenues on trans-frontier wars.
6. Improvement of the rules regarding interpellation and budget discussion.
7. The new Punitive or special Police Legislation.
8. The proposed restrictions on the finality of Jury Verdicts.
9. The proposed legislation in restraint of private rights in lands.
10. Maximum limits to Revision Enhancement.
11. The Amendment of Forest rules.
12. Provincial Service including Police and General Services in higher grades.
13. The Indian Medical service.
14. Sterling vs. Rupee loans for reproductive Public Works.
15. Failure of currency Legislation and the closing of the Mints.
16. Exchange Compensation.
17. Opium and Ganja Commission Reports.
18. The British Congress Committee.
19. The Draft Rules for the working of Standing Congrress Committees.
20. Congress Fund."

In his general remarks Mr. Bullock makes a pertinent and important suggession about the present inability of the Local Boards in the Province to spend money with strict economy and to meet in due earnestness such wants of the people as can be duly supplied by the limited fund at disposal.

"The defect is the administration of these Boards is that we have to rely for the supervision of the work done on members of the various committees, who take little or no interest in their duties, or on the chairmen or vice-chairmen, who only take a clerical interest, and never go into the districts and see how the works are actually done. There are certain items of expenditure in regard to which no exception can be taken, such as the salaries of schoolmasters, amounting to 30 per cent. of the income; works executed under the direct control of the Public Works Department, which, though they may be costly, are supervised efficiently; but deducting these there is still a very large expenditure, amounting in all to several lakhs of rupees, on petty works of buildings, communications, and improvements for sanitary purposes; establishments and other expenses connected with conservancy, arboriculture, &c., in regard to which our information is very defective. I think there is good ground to fear that there is a great waste of money, and the very large sum of money in regard to which this suspicion arises makes it a most important matter of consideration whether an inspector of public works and improvements is not required, who should be an engineer capable of supervising works and directing them. The building of wells in Berar is no easy matter, and the selection of good sites is all important, but from my enquiries it seems doubtful whether the majority of the wells sunk really answer the purpose of giving a good water-supply."

## वऱ्हाड

हवामान—मध्यंतरीं ढग येतात पण थंडी चांगली लवकरच पडूं लागेल असा रंग दिसतो. पिकें साधारण आहेत. तुरळक वाऱ्याच्या उपद्रवा शिवाय रोगराई विशेष नाहीं पाण्या संबंधानें सर्वत्र हांकाहांक आहे. यंदा नद्या, ओढे, विहिरी वगैरे फार आटलीं आहेत तेव्हां निभाव कसा काय लागतो याची पंचाईत आहे.

मि. सिम्पसन आफि. डेपुटी कमिशनर यांची स्वारी हल्लीं तेल्हारें मुक्कामीं आहे.

राव साहेब सिताराम विश्वनाथ पटवर्धन यांची स्वारी येत्या १९ वे तारखे पासून प्रांतांत फिर यासाठीं बाहेर निघणार आहे.

मि. सव्हियल पोलिस इनस्पेक्टर, उमरावती यांनीं पेनशन घेतल्यामुळें खालील बदल्या करण्यांत आल्या आहेतः—

| रा. रा. | पगार रुपये |
|---|---|
| मोंगलजान, आकोट | २५० |
| धोंडजी कोडजी, आकोला | २०० |
| विनायकराव मोर्शी | १७५ |
| सायबा, बुलढाणा | १५० |
| नागोराव, मलकापूर | १२५ |
| मार्चंट, आनथोपोमेट्री- रेकार्ड कीपर, उमरावती | १०० |

व्हाइसराय साहेब येत्या १३ व्या तारखेस हैदराबादेस येणार आहेत. त्यांच्या मुलाखती निमित्त मि. बुलक साहेब कमिशनर हे हैद्राबादेस गेले आहेत.

एक महिन्या पूर्वी नागझरी येथें दरवडेखोरांनीं डांका घातला होता. १००।१५० रुपयांचा माल चोरीस गेला होता. पण या डाकेखोरांची टोळी पोलिसांनीं मोठ्या कारवाईनें पकडली. २०।२५ लोक सांपडले असून खामगावचे माजिस्त्रेटा समोर चौकशी चालू आहे. दोन चार जणांस माफी देण्यांत आली असून कांहीं आरोपी गुन्ह्याला कबूल आहेत. मागें जळगांवा कडे बहूत डांके पडले होते त्यांचाही कांहीं थांग आतां लागेल असा अंदाज आहे.

मि. काटग्रेव्ह अकोल्याचे पोलिस सुपरिनटेंडेन्ट रजेवरून येत्या आठवड्यांत परत येतील. साहेब महाबळेश्वराच्या थंड हवेंत विश्रांति घेत होते. पुढील एप्रील पासून हे पेनशनच्या पूर्वीची फर्लो रजा घेऊन जाणार आहेत.

मि. फ्रान्सिस लांड रेकार्डचे डायरेक्टर हे आज चिखलीकडे जाण्यासाठीं निघणार आहेत.

रा. रा. वाहिदव प्रसाद पोलिस इन्स्पेक्टरची जागा सोडून नेटीव संस्थानांत गेल्यामुळें त्यांच्या शंभर रुपयांच्या जागीं मि. नामदारखा यांची नेमणूक झाली.

उमरावती मुनसिपाल कमिटीनें नवीन जकात बसविण्याचा विचार करून नियम प्रसिद्ध केले आहेत. येथील मुनसिपालिटीचा विचार देखील नवीन उत्पन्न वाढविण्यासाठीं जकांत बसविण्या संबंधानें चालू आहे. अद्याप पक्का निकाल लागला नाहीं.

वऱ्हाडचें एजुक्याशनल कानफरन्स पूर्व संकेता प्रमाणें उमरावतीस गेल्या आठवड्यांत भरलें होतें. सालाबाद प्रमाणें सर्व कार्य सुयंत्रपण झालीं. पुढील अंकीं आवश्यक हकीकत प्रसिद्ध करण्याचा बेत केला आहे.

## वर्तमानसार.

“ मी हंसते लोकांला, आणि शेंबूड माझ्या नाकाला ” तशांतलाच प्रकार नव्हे का? आपल्या जातभाईस अनीतीपासून सोडविण्याचें खरें कर्तव्य करावयाचें सोडून हे पाद्री लोक परदेशी जातात, हा प्रकार उपाध्याच्या मुलाचें लग्न करण्यापैकींच अजागळपणाचा नव्हे का ? असें आह्मी आमच्या पाद्री बांधवांस विचारतों.

मनुष्याच्या मदतीशिवाय टाईप जुळणारीं यंत्रें—ह्या यंत्राचा उपयोग विलायतेस अतोनात होतो, पण हिंदुस्थानांत अद्याप हें यंत्र आलें नव्हतें. बंगाल सरकारानें बंगालच्या सेंट्रल प्रेसाकरितां ५ आणि अलीपूर येथील जेलच्या प्रेसासाठीं एक अशीं ६ यंत्रें आणविलीं आहेत. ह्या प्रत्येक यंत्राची किंमत ७००० रुपये आहे. अलीपूर जेल प्रेसमध्यें हें यंत्र प्रथम सुरू करणार, आणि तें चांगलें चालतें असें ठरलें ह्मणजे बंगालच्या सेंट्रल प्रेसमध्यें बाकीचीं पांच यंत्रें चालू करणार आहेत असें समजतें.

२० कोट रुपयांचें नुसतें लोणी—लंडन शहरांतल्या लोकांसाठीं स्वीडन आणि नोर्वे ह्या दोन देशांहून दरसाल वीस कोटीपेक्षां जास्त रुपयें किंमतीचें नुसतें लोणी येतें.

विजेच्या शक्तीनें चालणारे पंखे—कोलंबो ( सिंहलद्वीप ) येथें विजेच्या शक्तीनें चालणारे पंखे इतके उपयोगांत येत आहेत कीं त्या मुळें पंखा ओढणारांस भडाभड काढून टाकलें जात आहे असें समजतें. ह्या पंख्याचा उपयोग हिंदुस्थान सरकारानें करावा ह्मणजे पुष्कळ मजुरांचे सोल्जराकडून जे खून होतात ते सहजी बंद होतील. ग्रु. सू.

गव्हरनर जनरल हे चाकरीची मुदत भरण्यापूर्वी चाकरी सोडून जाणार असें सांगतात.

औध जिल्ह्यांत उना येथें एक ठिकाणीं साठ लाख रुपयांचें द्रव्य पुरलेलें आहे असें समजून तें शोधून काढण्या करतां कलकत्यास एक मंडळी स्थापन झाली आहे !

गैरकायद्यानें व दुष्टबुद्धीनें कैद केल्याबद्दल व आगळीक केल्याबद्दल राजशाहीचा माजी माजिस्त्रेट मि. प्राईस याच्यावर नातोरचा राहाणार राजा जगेंद्रनाथ राय याणें राजशाही येथें कोंडतांत नुकसानीबद्दल ह्मणून २५,००० रुपयांचा एक दावा केला आहे.

इंग्लंडांत राजकीय चळवळ चालू आह व त्यांत इंग्लंड व रशिया यांच्या दरम्यानच्या स्थितीबद्दल लोकांचीं मनें जास्त विचारांत आहेत.

आमच्या ह्मणण्याप्रमाणें करा नाहीं तर लढाईस तयार व्हा अशी इंग्लंडानें अशांटीच्या राजास जी एक शेवटची नोटीस दिली होती त्याचा जबाब आह्मी लढाईस तयार आहों असा राजानें दिला.

चीनच्या कान्सु प्रांतांची राजधानी लांचफू हें ठिकाण तिकडच्या मुसलमानांनीं वेढावा करून बळकाविलें व मुसलमान लोक चिनी लोकांस जिकडून तिकडून पिटाळून लावीत आहेत. मध्यचिनांतील गुप्त मंडळी त्या मुसलमानांस सामील झाली आहे.

चीनानें लढाईच्या खर्चाबद्दल जपानास जी रकम द्यावयाची त्याचा पहिला हप्ता ८,००,००,००० रुपये ता० १ नवंबर रोजीं लंडन येथें चीननें जपानास दिला. टा. अ.

वट हुकूम-- कबूल जबाबासाठीं आरोपी माजिस्त्रेटापुढें येईल तेव्हां त्याची नुसती कबुली लिहून घेणें एवढेंच माजिस्त्रेटाचें कर्तव्य नाहीं, तर तूं कबुली कां करतोस? तुला पोलिसांनीं मारलें कीं काय? इ० प्रश्न आरोपीला मुद्दाम विचारून मारलें ह्मणेल तर लागलेंच त्याचे आंगावर माराच्या कांहीं खाणाखुणा आहेत कीं काय हें पाहून लिहून ठेवावें, व आरोपी वेडें वांकडें सांगेल तें माजिस्त्रेटानें सर्व लिहून घ्यावें; ह्मणजे त्याचा पुढें सेशन कोर्टास चांगला उपयोग होईल, अशा प्रकारचा वटहुकूम झाल्याचें समजतें.

असेसरास शिक्षा—वायव्य प्रांतांतील एका सेशनजज्जानें असेसर खुर्चीवर डुलक्या खात असलेला दिसला, ह्मणून त्यास एक दिवसपर्यंत भिंतीकडे पाहात उभें राहण्याची शिक्षा दिली असा एक चित्रपट नॅशनल् गार्डियन पत्रांत आला आहे.

यंदाच्या म्याट्रीक्युलेशन परीक्षेस एकंदर ३००६ उमेदवार आहेत त्यांचा तपशील—मुंबई १६९८; पुणें ३८८; अहमदाबाद ४६०; बेळगांव १२३; आणि कराची १३७ ह्यांत ५७ बायका उमेदवार आहेत. स. शो.

सोलापूर संमतिवयाचा खटला व बायकाशीं सृष्टीविरुद्ध संभोगः— अब्दुल्ला व० लाडले नांवाच्या एका इसमानें आपली बायको हशमतबी इचें वय १० वर्षांचें आंत असून तिच्याशीं संभोग केला, इतकेंच नव्हे, पण सृष्टीविरुद्ध संभोगही केला, ह्मणून त्याजवर त्याच्या सासूनें फिर्याद केल्यावरून दि० माजिस्त्रेट मे. देशमुखसाहेब यांनीं त्याची चौकशी करून खटला सेशन कमिट केला आहे. आरोपी अटकेंत आहे

ज्या घरांत ४ पुरुष असतील त्यांतील एकानें लष्करी नोकरीस राहिलेंच पाहिजे, असा जाहिरनामा अमिरानें प्रसिद्ध केल्यामुळें काबुलांतील लोकांत बरीच चळवळ उडाली आहे. क० त०

शेतकऱ्या संबंधीं सरकारचें दोन ठराव—

पहिला ठराव—ज्या ठिकाणची जमीन निकस होऊन पिकत नाहीं व ज्या ठिकाणीं अतिवृष्टीमुळें अथवा टोळधाड अथवा अशाच संबंधाच्या कारणानें पीक होत नाहीं अथवा पीक येऊन तें नाहींसें झालें आहे तेथील लोकांस धान्यासंबंधानें कांहीं वर्षांच्या मुदतीनें सवलती देणें वगैरेचा आहे

दुसरा ठराव—शेतकरी लोकांच्या मुलांस त्यांच्या पूर्वापार चालत आलेल्या धंद्यास योग्य असें शिक्षण देण्यास काय तजवीज करण्यांत आली पाहिजे, या संबंधाचा आहे.

हे ठराव अमलांत आल्यास फायद्याचे आहेत खरे. पण ते अमलांत येण्यास कितीक वर्षें अगर तपें लागतील ईश्वर जाणे. एकानें ठराव करावयाचे व दुसऱ्यानें ते दप्तरांत गच्च बांधून ठेवावयाचे. असा प्रकार जेथें आहे तेथील लोक सुखी कसे व केव्हां होणार याचा विचार करणें वाचकांवरच सोंपवितों. न्या. सिं.

जपान आणि रशिया यांचें जें एकदां फाटलें आहे ते थोडाबहूत रक्तस्राव झाल्याशिवाय बुजेलेंसें वाटत नाहीं. जपानानें जय मिळविला त्याचा त्या राष्ट्राला मुळींच फायदा मिळूं देऊं नये असा रशियाचा इरादा आहे. जर्मनी जवळ जवळ जपानासच अनुकूल ह्मणतां येईल. फ्रांस व रशियाचा तह आहेच फ्रांसचें एखादें ह्मणणें रशियानें ऐकेल असें नाहीं. रशिया डोईजड आहे. फ्रान्साचे रंग तेरड्यासारखे बदलतात.

रशियाचा सूड घेण्याची जपानी लोकांची अगदीं कट्टी तयारी दिसते. जपानचा वसूल ८ कोट ९० लक्ष आहे. परंतु ६ कोटी फक्त लष्करीकडे खर्च करावयाचे ठरलें आहे. आज ६६,००० सैन्य तयार आहे तें ५ लक्ष सार्वकाल तयार ठेवावयाचें. चीनाकडून येणार खंडणीपैकीं २० कोटीची लढाऊ जहाजें विकत घ्यावयाचीं. या तयारीवरून व युरोपातल्या धुसफुशीवरून रशिया जपानच्या अंगावर जाण्यापूर्वी चांगलाच विचार करील !

ब्रह्मदेशच्या पोरी खुपसुरत असून मोठ्या नटव्या असतात अशा बातम्या आपण ऐकल्या आहेत. पण त्यांना युरोपियनांनीं चांगलीच मोहनी टाकली आहे. तिकडे युरोपियन नवरा व ब्रह्मी बायको अशा लग्नाची सांथच आली आहे अधिकाऱ्यांच्या गैरवर्तनाचा बोभाटा होऊन सक्तीचे हुकूम सुटल्यामुळें तर ही सांथ आली नाहींना.

रात्रंदिवस बूट घालणारांचे बुटाचें कातडे दरसाल दोन इंच झिजतें. ह्मणजे जन्मभर एकच बूट वापरावयाचा असला तर नऊ फूट जाड तळ पाहिजे.

अबिसिनियाचा राजा इटालीच्या फौजेवर चाल करून जात आहे. तेथील इटालियन फौजेच्या मदती करिता तें सरकार युरोपांतून नवी फौज पाठवीत आहे.

वायव्य प्रांतांत गुरांच्या चोऱ्या अलिकडे फार होऊं लागल्या आहेत असें सांगतात.

रूमचे सुलतानानें असें जाहीर केलें आहे कीं, जे आर्मेनियन लोक गिरजाघरांत लपून बसलें असतील त्या सर्वांना आपल्या राजधानींतून घालून द्यावें. व सर्व गिरजाघरें बंद करावी आजपासून कोणीही आर्मेनियन आपल्या राजधानींत राहूं न पावे. व त्या लोकांना खाण्यापिण्यासही देऊं नये. जे आर्मेनियन लोक दंगा करण्यास प्रवृत्त झालें होते त्यांवर खटले चालू आहेत. आ. व.

कपूरथळ्याचे महाराजांनीं पार्लमेंटा सारखी व्यवस्था केली आहे.

जज्ज बद्रोद्दीन तय्यबजीची नेमणूक हायकोर्ट जज्जाचें जागीं कायम झाली.

आगारा येथील मेडिकल कालेजांत पुरुषांपेक्षां स्त्रिया जास्त प्रमाणांत पास होतात.

उंटावरील लष्करी स्वारांची कवाईत आग्रा येथें व्हाइसरायांनीं, गेल्या सोमवारीं घेतली. उंटावरील स्वारांची पलटण ही एवढीच आहे.

मद्रास प्रांतांत गंतूगर इकडे एक योगी आले असून, ते समाधिस्थ अधर आसन घालून बसतात, असा सर्वांस प्रत्यक्ष पाहून अनुभव आल्याचें कळतें.

चीनमध्यें रशियास बरीच फूस सांपडली असून, त्याच्या झालेल्या तहामुळें इंग्लंडास बरेंच नुकसान सोसावें लागलें.

कोरियाच्या राजाचा बाप व हल्लीचा राजा यांच्यांत जबरदस्त मतभेद पडून मोठा रक्तपात झाला आहे. नव्या सुधारणेच्या विरुद्ध बाप असून मुलगा अनुकूल आहे. त्यामुळें हा प्रकार झाला. पण त्यामुळें जपानचें घोडें कोरियांत चांगलेंच शिरलें असें दिसूं लागलें आहे. जपानची फौज हल्लीं कोरियांत आहेच. स० वि०

स्लेटपेन्सिला आतां हालडांतही बनवूं लागलें आहेत. त्या मोडत नाहींत इतकेंच नव्हे तर त्यांचा आवाजही निघत नाहीं.

चीन देशांत एक विलक्षण आघोरी मनुष्य पकडण्यांत आला आहे. हा मनुष्य उपाध्याचा धंदा करणारा असे. हा यजमानांच्या घरीं गेला ह्मणजे, तेथें यजमानांच्या मुलांतील एखादें लहान बालक चोरून आपल्या घरीं नेऊन त्याला कांहीं औषधानीं बेशुद्ध करी. नंतर त्याच्या अंगाची थोडीथोडी कातडी काढून त्या कातडीच्या जागीं बकऱ्याची कातडी चिटकवी व त्यावर कांहीं उपचार करून मूळच्या कातडीशीं ती बकऱ्याची कातडी मिळवून देई. या प्रमाणें त्या मुलाच्या सर्वांगावरची कातडी थोडथोडी काढून तिचे जागीं बकऱ्याची कातडी लावून ती त्याच्या अंगाशीं मिळून जाईल असा उपाय करून मग त्या मुलाला दुसऱ्या शहरीं नेऊन जंगली मनुष्य ह्मणून पुष्कळशा किंमतीस विकीत असे. या प्रमाणें त्या दुष्टानें अनेक बालकें जंगली मनुष्यें बनवून विकलीं असें उघडकीस आलें असून त्याला पकडलें आहे. कोण तरी हें नीच कर्म पोटासाठीं लोक करितात !

कानांतील फोडावर सुलभ उपाय—कानांत फोड येऊन अतिशय वेदना होऊं लागल्या ह्मणजे त्यांवर ह्मैसीच्या ताज्या शेणाची पुरचुंडी बांधून तिचे थेंब थेंब सोडावे. वेदना ताबडतोब बंद होऊन फोड बरा होतो.

रशिया व इंग्लंड ह्यांमध्यें वैमनस्य उत्पन्न झालें ही तार मुंबईंत येऊन पोंचतांच शेअरबाझारांत दोन आणे खाडादिशीं भाव उतरला. दी. बं.

जपान सरकारानें असा जाहिरनामा प्रसिद्ध केला आहे कीं, कोरियामध्यें कोणास जाणें असल्यास त्याणें जपान सरकारची परवानगी मिळविली पाहिजे. परवानगी वाचून कोणालाही कोरियामध्यें जाण्याची मोकळीक नाहीं.

इनामदाराची वंशाळ— एका इनामदाराचा मी मर्दवंश वारस आहे. असा खोटसाळ पुरावा करून एकानें इनामाचा पैसा उपटण्याचा प्रयत्न केला असें सरकारच्या दृष्टोत्पत्तीस आल्यावरून, जीं इनामें वंशपरंपरेनें चालणारी आहेत, त्यांच्या वंशावळी सरकारांतून बरोबर चांगली चौकशी करून चोख रीतीच्या ठेवण्याचा ठराव झाल्याचें कळतें.

असें ह्मणतात कीं, बनारस ( काशी ) च्या परवांच्या दंग्याचें मुडाशीं कोणी कामिनी होती ! जगतांस खेळविणारी कनक आणि कांता हींच दोन तत्वें आहेत ह्मणावयाचें. इं. प्र.

☞ हे पत्र अकोलें येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे “ वऱ्हाडसमाचार ” छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सालअखेर ,, ७ ,, १ ८.
किरकोळ अंकास .... .... .... ४४

नोटिशी बद्दल.
१० ओळींचे आंत रु० १
दर ओळीस .... ०१८६
दुसरे खेपेस .... .... ०१

Single copy ... ... ... ... ... 4 as.

Advertisement.
Below 10 lines ... 2 Rs.
Per line over 10 ... 4 as.
Repetition Per line 3 as.

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXIX AKOLA MONDAY 18 NOVEMBER 1895 NO 44

वर्ष २९ आकोला सोमवार तारीख १८ माहे नोव्हेंबर सन १८९५ इ० अंक ४४

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटिफिकिट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहिरात

दि. कि. मु. नंबर ११ वर्ग १९
१८९५

डेपुटी कमिशनर साहेब जिल्हा एलिचपूर यांचे कोर्टांत.

नांव— यशोदाबाई
जवजे-बाळाजी कुणबी
राहणार— करजगांव तालुके इलिचपूर जिल्हा इलिचपूर यांस मयत. बाळाजी बापाचें नांव- विक्रमजी राहणार करजगांव तालुके इलिचपूर जिल्हा मजकूर यांचें कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटिफिकीट मिळावें ह्मणून सदर्हू अर्जदार यानें अर्ज केला आहे. त्याज करितां सदर्हू मयत मनुष्याचे मालमिळकतविर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्यांचा दावा असेल त्यांस जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं, त्यांनीं तारीख ४ माहे दिसेंबर सन १८९५ इ. रोजीं सदर्हू अर्जाची चौकशी होईल त्या वेळीं या कोर्टांत स्वारी असेल तेथें हजर होऊन आपापले हक्का विषयीं लेखी हकीकत दाखल करावी.

तारीख ५ माहे नोवेंबर सन १८९५ इ०

H. Godwin Austen
Deputy Commissionnr
Ellichpur District

वऱ्हाडसमाचार

मिती मार्गशीर्ष शुद्ध २ शके १८१७

हल्लीं अभ्यास फार वाढले आहेत पण खरें शिक्षण विद्यार्थ्यांस मिळत नाहीं. विद्यार्थ्यांचीं मनें कोमेजलेल्या फुलाप्रमाणें दिसतात. विद्यार्थी निशक्त व निरुत्साह बहुत दिसतात. आपल्या पाठीवर जर कोणी बोजा दिला व अमूक एका स्थळीं अमूक वेळ्यांत तो नेऊन ठेवण्यास जर आपणांस सांगितलें तर आपण जसा तो बोजा पराकाष्टेनें एकदां विवक्षित स्थळीं पोंचवून चटकन मोकळे होण्या विषयीं कष्टानें श्रम करूं त्या प्रमाणें विद्यार्थ्यांचीं मनें अभ्यासाविषयीं संकटांत पडलेलीं असतात. बैलाच्या पाठीवर जशा मास्खरेच्या गोण्या तद्वत् हल्लींच्या विद्यार्थ्यांवर अभ्यासाची गोणी आहे. विद्यामृताची गोडी नसते. सांगकामी जशी कांहीं माणसें आढळतात त्या प्रमाणें विद्याजनांत आमचे विद्यार्थी पुस्तकी विद्वान होतात. मनाची आकलन शक्ति विद्येच्या व्यासंगानें वाढली पाहिजे; मन ची स्थिति प्रौढ होत गेली पाहिजे आणि मनाचें क्षितीज नेहमीं वाढत असलें पाहिजे. विद्येचे संस्कार मनावर हे परिणाम आपोआप उत्पन्न करितात. पण सांप्रतच्या शिक्षणक्रमानें उलट परिणाम होतात आणि विद्यार्थ्यांचीं मनें मोडावतात.

ईयत्तेचे विषय समजो अगर न समजो, ईयत्ता पार पडलीच पाहिजे. अवधि एक वर्षाचा असतो. विषय बहुत असतात. तेव्हां घरींदारीं दिवसारात्रीं घोकंपट्टी विद्यार्थ्यांकडून शिक्षक करवितात आणि विद्यार्थ्यांच्या मनोयंत्रांतून ईयत्तेचे विषय बाहेर पाडतात. अलिकडे विषय वाढल्याचें वेड शिक्षणक्रमांत अती शिरलें आहे. प्राथमिक शिक्षण किंवा उच्च शिक्षण सारखेंच बहुसाळ विषयांनीं ओतप्रोत भरलेलें आहे.

परीक्षा दिवसानुदिवस कसून घेतल्या जातात. विद्यार्थी काय शिकले आहेत हें पाहण्यापेक्षां ते कोणत्या प्रश्नें फसतील हें पाहण्य कडे शिक्षकाचा कल विशेष दिसून पडतो कोणत्याही विषयांतील क्षुद्र स्थळें शोधून काढण्यांत परीक्षक अधिक उद्युक्त असतात. सामान्य स्थळें तात्विक दृष्टीनें पाहून विद्यार्थ्यांची चांचणी झाली पाहिजे. प्रत्येक परीक्षकाच्या स्वभाववैचित्र्यावर ही गोष्ट अवलंबून असते. जसा डाव पडण्याचा संभव असतो त्या मानानें शिक्षक आपली शिकविण्याची हातोटी फिरवीत असतात. पूर्वी पक्षां परीक्षा ही बहुत झाल्या आहेत. युनिव्हरसिटीच्या प्रवेश परीक्षेची मजल पोंचण्यास चांगल्या एकमार्गी, मेहनती विद्यार्थ्यांस अकरा वर्षे अध्ययन करावें लागतें आणि अकरा परीक्षा द्याव्या लागतात.

साधारण लिहिणें वाचणें व गणित हे विषय चांगले आले ह्मणजे पुष्कळ विद्यार्थ्यांस इतिहास, भूगोल, भूमिती, व्याकरण इत्यादि विषय प्रौढ वयांत सहजगत्या तयार करिता येतील. पण हल्लीं शेवटील अवान्तर विषयांनीं डोकें मनस्वी उठविलेलें असतें. अल्पवयांतच युक्लीडच्या गहन विचारसरणीशीं ओळख करून घ्यावी लागते, इतिहास भूगोल सांप्रतच्या क्रमिक पुस्तकांनीं नीरस व घोंकमपट्टींत ले करून सोडले आहेत. नवल हें कीं ६।७ वर्षे इतिहासाचें अध्ययन करून इंग्लंडचा किंवा इंडियाचा इतिहास चांगला येत नाहीं. इंग्रजीचें किंवा मराठीचें भाषाज्ञान चांगलेंसें नसतें आणि ईयत्तचा अभ्यास पुरा करण्यासाठीं विद्यार्थी नाना कष्ट व हाल सोसतात.

शेवटीं, प्राथमिक व उच्च शिक्षणाची इमारत अशी उभारलेली आहे कीं त्या शिक्षणाचा उपयोग उद्योगशाळांतील, यांत्रिक-शिक्षण किंवा अन्य हुन्नर शिकणाऱ्यांस कांहीं होत नाहीं. मराठी शाळेचा, इंग्रजी शाळेचा आणि नंतर कालेजचा असा शिक्षणक्रम अनुक्रमानें ज्यांस विविध कारणामुळें पुरा करायवाचा नसतो अशा विद्यार्थ्यांस व्यवहारोपयोगी व इतर धंद्याला चातुर्यानें लागण्या पुरतें ज्ञानार्जन हल्लींच्या प्राथमिक किंवा उच्च शाळांतून मिळत नाहीं. भाराभर विषय शिकण्याचा खटाटोप करून नंतर रुवे दुकानदारी आत्पावी लागते आणि कांहीं तरी पोटापाण्याचा धंदा स्वीकारावा लागतो.

अलिकडील अभ्यासानें विद्यार्थी कंटाळतो आणि तो मध्यम वयांत व उत्तर वयांत व्यासंग सोडून विद्यार्थी दशेंत पडलेल्या श्रमाचें उट्टें काढतो. स्वस्थपण, निर्व्यापार, व व्यासंगशून्यता हे गुण त्याचे खेळगडी होतात. अंगभूत गोष्टी ह्मणजे पुस्तक पूजन, निरनिराळे खेळ, गप्पाष्टकें यांत बहुत शिकलेल्या विद्यार्थ्यांचा कालव्यय होतो. पोटाची सोय करण्या पुरतां मात्र धंदा करावा आणि तो केल्याशिवाय भागतच नाहीं.

अभ्यासाच्या बोजामुळें विद्यार्थी शाळा सोडते वेळीं थकलेले भागलेले असतात आणि जे विद्यामृताच्या नादानें, किंवा पदव्यांच्या अभिलाषानें शरिराचा नाश करून घेतात ते स्वता मत्युमुखीं देखील पडून आपल्या आप्तमित्रांस फसवितात. डाक्टर भांडारकराच्या ह्मणण्याप्रमाणें जीवनकलह कठीण होत आहे व हल्लींच्या कालचक्राप्रमाणें विद्यार्थ्यांनीं धनदौलत, मानपान इत्यादि मिळविण्यासाठीं आपलें आयुष्य खर्ची घातलेंच पाहिजे. अशा बिनतोडीचा प्रसंग आला आहे असें आह्मांस वाटत नाहीं. धनोत्पादक उद्योगशाळा पुष्कळ निघाल्या तर सांप्रतची विद्यार्थ्यांची गर्दी प्रस्तुत शिक्षणक्रमा साठीं होणार नाहीं पण निरुपायास्तव कांहीं तरी शिकावें ह्मणून हल्लीं पुष्कळ विद्यार्थी सध्यांच्या शाळांतून आढळते असतात. सांप्रतचा शिक्षणाचा पाया चुकला आहे व तो कोठें व कसा चुकला आहे ही गोष्ट आमच्या या लेखानें व्यक्त झाली तर आमचें बहुत कार्य झालें असें आह्मी समजूं.

इंग्लिश लोक इंडियांत कसे वागतात व हल्लींच्या भालेरावीचा परिणाम किती वाईट होईल याचें चित्र रेव्हरंड वानर यांनीं निबंधद्वारा लोकांच्या समोर मांडलें आहे. राज्यकर्त्यांचा प्रजाजनांशीं सलोखा नाहीं. नेटिवांच्या मनांत इंग्लिशा विषयीं बेभरंवसा वाटतो आणि इंग्लिशांच्या मनांत नेटिवा विषयीं अनादर व अप्रेम वास करितात. १८५७ साला प्रमाणें आतां बंड उद्भवण्याचा संभव नाहीं हें खरें. इंडिया देश राष्ट्राच्या पायरीला इंग्लिशांच्या कृपेनें पोंचला आहे. अडीच कोट लष्कर नेटिवांचें असून तें राजनिष्ठ आहे, रेल्वे तारायंत्रें वगैरे साधनांनीं दळण वळण वाढलें आहे इत्यादि कारणामुळें बंड उद्भवणें संभवत नाहीं तथापि इंग्लिशाची राज्यपद्धति गोडीगुलाबीची व सढळपणाची असावी तशी नाहीं. तलवारीनें राज्य मिळविलें तथापि तलवारीच्या बळवर तें कायम रहावयाचें नाहीं. लोकांमध्यें असंतुष्टता वाढली आहे कांकीं राज्यकर्ते वाटेल ती दांडगाई चालवीत असतात. आयर्लंड मध्यें इंग्लिशांचा अंमल जसा अप्रीय झाला तशी स्थिति या देशा संबंधानें होत चालली आहे.

## मत भिक्षा

( आमच्या एका मित्राकडून )

'विधवाविवाह प्रतिबंध निवारक मंडळाचे' चिटणीस प्रोफेसर धोंडो केशव कर्वे बी. ए. हे उमरावती, यवतमाळ, नागपूर वगैरे गांवीं जाऊन परत गेल्या मंगळवारीं आकोल्यास आले. यांनीं विधवाविवाहाला लोकमत अनुकूळ करण्याचा प्रयत्न चालविला आहे आणि आपल्या व्याख्यानानतर लोकांस आपापलीं मतें स्थापन करण्याविषयीं महिनाभराची मुदत देऊन ते पुढें चालते झाले. व्याख्यानाच्या अखेरीस मतभिक्षा त्यांनीं मागितली होती ती भिक्षा गोळा करण्याचा त्यांचा यत्न चालूं आहे.

विधवाविवाह शास्त्रानें विहित आहे किंवा निषिद्ध आहे हें निरनिराळ्या शास्त्रांचें पर्यालोचन करणारे विद्वान गृहस्थ सांगतील. लौकिकीदृष्टच्या तात्पर्यावर नजर देऊन आपणास विचार करावयाचा आहे. विधवाविवाह हिंदुसमाजांतील उच्च वर्णांत प्ररूढ नाहीं. अन्य जातींत विधवेचे विवाह प्रचारांत आहेत इतकेंच नव्हीं तर सधवेचा नवऱ्यांशीं काडी मोडून पुनर्विवाह प्रीतीपात्राशीं होतो. आणि कित्येक जातींत तर सधवेचा पुनर्विवाह ह्मणजे पहिल्या नवऱ्याला पैसा मिळविण्याची किमिया सांपडली आहे. अशा नाना वर्णांनीं बनलेल्या हिंदुसमाजांत अतिश्रेष्ठ नीतीमार्गांचें उत्कृष्ठ दर्शन विधवांच्या पवित्र चरित्रानें होत असतें. संसारसुख उपभोगल्या नंतर त्या अपूर्व, अप्रतिम व अवर्णनीय प्रेमानंदाला पुनर्विवाहानें तिलांजली मिळते. मैथुनसुखाची अति गोडी लागली तरी त्या कामना तृप्त करण्याच्या वाटा ह्मणजे पुनर्विवाह आहे. खरें पाहिलें तर रतिसुखाला क्षणिक ब्रह्मानंद ह्मणत असतात पण इतर मानवी सुखाप्रमाणें हें सुखही परिणामीं कटु असतें. पण दंपत्य स्थितींतला आनंदानुभवाचा खजिना आमच्या मनामध्यें मोठा असतो. अनुभूत आनंदाचें स्मरण करणें हें तरी मोठें आनंदप्रद आहे.

पतीच्या ठायीं सप्रेम अंतःकरण आसक्ती असलें ह्मणजे पतीच्या मरणानंतर दरील तें परपुरुषाविषयीं वांछा धरीत नाहीं आणि कदाचित् उद्दीपक गोष्टीमुळें मनोविकार उज्वलित होऊन गत दंपत्यपणाचें विस्मरण झालें तर पुनर्विवाहांतील मैथूनसुख पश्वादिकांच्याच कोटींतलें होय. आमच्या हिंदुसमाजांतील बहुत विधवांचीं चरित्रें निर्मल सद्गुणाचें आश्रयस्थान व प्रथम पतीवरील अत्युत्तम प्रेमनिष्टेचें मंदीर आहेत. कल्पनिक पवित्रपणाचें, सद्धर्माचें, व सद्गुणाचें दर्शन विधवांच्या चरित्रांत प्रत्यक्ष घडतें तर असा अनुपम कित्ता लोकांच्या डोळ्या समेरून सर्वथैव बुडवावा असें आह्मास वाटत नाहीं.

आयुष्यांतील पुष्कळ गोष्टी द्यूतप्रमाणें आहेत. नानाविध सुखदुःखें मनुष्याच्या वाट्याला येत असतात. त्यांच्यावर मनुष्याच्या कृतीचा अंमल अगदीं थोडा आहे. खेळतांना जसें फांसे टाकण्याचें काम आपलें आहे पण ते निर्जीव फांसे दर्शवितील त्या डावाप्रमाणें आपला खेळ खेळावा लागतो तद्वत संसारामध्येंही प्रकार आहे. संसारसुखें बहुत मिळावीं ह्मणून आपण प्रयत्नशील असतो पण सर्व परिणाम आपल्या आटोक्या बाहेरील व आपल्या ज्ञानदृष्टीस अगोचर अशा गोष्टीवर अवलंबून असतात. मनुष्यकृतीचा पंगुपणा आपण नेहमीं ईश्वरी नेमाच्या संज्ञेनें व्यक्त करीत असतों. अशी अगम्य स्थिती आपल्या आयुष्याची आहे तर आपण ईश्वरी नेमावर हवाला ठेऊन जसा आयुष्याचा डाव पडेल त्याप्रमाणें मनाच्या शांतीनें सुखाला किंवा दुःखाला तयार असलें पाहिजे. आमचा भावार्थ असा कीं एक वेळ लग्नविधि स्त्रीपुरुषांचा व्हावा आणि गृहस्थाश्रमाचा ब्रह्मानंद एक वेळ अनुभव घेऊन पाहावा. ईश्वरी संकेताप्रमाणें तो कमजास्त मिळेल. अधिकाची लालसा धरून काय उपयोग! आणि चित्रकार सृष्ट पदार्थाची किंवा नाना रंगांनीं सुशोभित आकाशाची खरी कल्पना आपल्या चित्रांनें जितपत करून देईल तितक्या पायरीनें देखील पुनर्विवाहानें उपयुक्त गृहस्थाश्रमाची खरी कल्पना होणार नाहीं. कांहीं गोष्टीस अन्यस्पर्श देखील खपत नाहीं जसें पतिव्रतेचें कुच किंवा सर्पाची फणी; तसेंच गृहस्थाश्रमाच्या अनुभूत आनंदाला पुनर्विवाहांतल्या दुसऱ्या मनोविकारांचा स्पर्श खपत नाहीं.

आह्मास पुनर्विवाह अनुपयुक्त अक्षतयोनींच्या विधवांचा मान्य आहे. प्रत्येक समाजांतील नियमांनीं एक वेळ निदान स्त्रीपुरुषांस संसारसुख मिळेल अशी योजना ठेविली पाहिजे. समाजाचे नियम आपले कृत्रिम उपाय आहेत तेव्हां ते वस्तुस्थितिला अनुसरून असले पाहिजेत. सध्यां प्रजावृद्धी झपाट्यानें होत आहे आणि उदरनिर्वाहाच्या सोयी मोठ्या बिकट झाल्या आहेत ह्मणून प्रजावृद्धीला कांहीं व्यत्यय येतील आणि इष्ट दिशेनें थोडें बहुत आपलें पाऊल पडेल अशी व्यवस्था आपण स्वीकारली पाहिजे. या विचार दृष्टीनें पाहतां विधवाविवाह सरसकट उपयोगी नाहीं.

विधवा विवाहाच्या पुरस्कर्त्यांस आमचा एक सल्ला आहे. एक पत्नी मेली तर दुसरी करावी हें पुरुषांच्या अंगवळणीं पडलें आहे. विधुरावस्थेचीं सुखदुःखें पुरुषांनीं कां भोगूं नयेत हें आह्मांस समजत नाहीं. सांप्रतच्या स्थितीला ही गोष्ट फार आवश्यक आहे. एकपत्नी व्रताची दीक्षा पुरुषांनें घ्यावी. बायको जीवंत असतांना हें व्रत कांहीं कठीण नाहीं पण ती मेल्या नंतर अन्य स्त्रीचे ठायीं संभोगाची इच्छा धरणें हें त्या व्रताला बाधक असून मनुष्यपणाच्या लघुत्वाचें दर्शक आहे. पती सन्निध असतांना व त्याच्याशीं रात्रंदिवस रममाण होत असतांना कोणी स्त्री पतिव्रता राहिली तर जसें नवल नाहीं तसेंच आपल्या गृहदेवतेच्या ठायीं आपली निष्ठा दाखविण्यांत मोठासा पुरुषार्थ नाहीं पण ती कालगतीनें नष्ट झाली तर नाशिवंत देह संपला ह्मणून खंत न मानतां मनोमय साक्षी ठेवून पत्नीवरील प्रेमनिष्ठा विधूर दशेंतच पुरुषानें चांगली व्यक्त करावी. बायकावर बायका करणें पशुतुल्य आहे. जे पुरुष विधुरदशा कायम राखतील किंवा ज्या स्त्रिया वैधव्यांतच राहतील त्या अभागी स्त्रीपुरुषा विषयीं आमच्या मनामध्यें पूज्यभाव विशेष वागेल. किंबहुना हींच माणसें खरोखरीं करारी, निश्चयी, बोलण्या प्रमाणें वागणारीं आणि ह्मणूनच शिरसावंद्य आहेत. पुनर्विवाहितांची योग्यता त्यांच्याशी तुलना केल्यानें केल्यानें कांहींच नाहीं किंवा ही तुलनाच साध्य नाहीं.

पुनर्विवाहाच्या द्वेष्ट्यांस आमची एक विनंती आहे. प्रोफेसर कर्वे यांचें व्याख्यान अकोल्यास झालें त्या वेळीं ही विनंती चांगली स्पष्टपणें कळली आहे पुरुष जर बेडधक कामवासनेनें अनेक लग्नें करण्यास माघार घेणार नाहींत तर त्यांनीं विधवांस पुनर्विवाहा विषयीं कां प्रतिबंध करावा या प्रश्नाचें उत्तर लोकांनीं आपल्या मनाशींच द्यावें विधुरपणांत बुडालेल्यास जर लोक हात देऊन लग्नाची टाळी वाजवितात तर वैधव्यपंकांत रुतलेल्या गायीस न सोडविणें ह्मणजे खाटिकपणाचें कृत्य नव्हे काय? मनुष्यांनें गुणदोष दुसऱ्यास आपल्या स्वताच्या स्थिती वरून लावोवत. संसारांतील कामज्वरानें विव्हळ झाल्यावर काय स्थिती होते याचा क्षणभर विचार करावा आणि नंतर विधवाविवाह बरा वाईट ह्मणून काय तो अभिप्राय द्यावा. विधवा किंवा विधूर नाहींत अशा लोकांस मत देण्याचा अधिकार नसावा कारण त्यांस पर दुःख कितपत शीतळ आहे हें ठाऊक असतें पण अशाच त्रयस्थांशीं सर्व दुनियेदारी करावयाची असते ह्मणून त्यांच्या जुलमी किंवा न्यायी अभिप्रायाची कांस धरावी लागते. मनुष्यानें सज्जन असणें फार उत्तमः पण मध्यम मार्ग ह्मटला ह्मणजे त्यानें दुर्जन असूं नये. त्याच प्रमाणें विधुर व विधवा पुनर्विवाहा शिवाय सद्वर्तनी राहतील तर त्यांची गणना उत्तम कोटींतली होय पण जे स्त्रीपुरुष रंडीबाजी व पुरुषबाजी या दुर्व्यसनांत न लोळावें ह्मणून गृहस्थाश्रमाची द्वितीया आवृत्ती काढतील ते मध्यम कोटिंतलें खरे पण नीच लोका पेक्षां समाजाला फार बरे असें वाटतें.

---

नामदार सुरेंद्रनाथ बानर्जी यंदा राष्ट्रीय सभेचे अध्यक्षस्थानीं विराजमान होतील असा रंग दिसतो. बाबू सुरेंद्रनाथ हें नांव आबालवृद्धांस ठाऊक आहे. या गृहस्थांच्या जिव्हाग्रीं सरस्वती साक्षात् वास करित आहे. मधूर, सुश्राव्य, व मुद्देसूत व्याख्यान कानीं पडलें ह्मणजे आपल्या मानसिक शक्तीमध्यें एक अवर्णनीय विद्याप्रवाह चालूं होतो. देशाभिमान, स्वार्थत्याग, राजनिष्ठा.व लोकप्रेम इत्यादि मनोविकार एकदम प्रचलित होतात. या विख्यात वक्त्यानें अध्यक्षस्थान स्वीकारण्याचें कबूल केलें आहे. ही बातमी सर्व राष्ट्रभर पसरतांच चोहोंकडून आनंदोद्गार ऐकूं येऊं लागले आहेत. गेल्या दहा वर्षांच्या इतिहासांचें सिंहावलोकन बाबू सुरेंद्रनाथ करितील असा बहूतजणांचा तर्क आहे.

---

## पुण्याचा धूमकेतू

आकाशांत जसा अकस्मात धूमकेतु उगवतो तद्वत पुण्याच्या वादमंडळांत राजश्री श्रीधर विठ्ठल दाते हा ग्रह उदय पावला आहे. या शेंडेनक्षत्राच्या शेपटामध्यें पुण्याचे बहुत लोक मोडतात. पुण्याची अब्रू जाऊं लागली ह्मणून या ग्रहाचा उदय झाला आहे! पण धूमकेतू पृथ्वीला चाटून गेला तरी अनर्थ उसळतात व राजक्रांत्या होतात. तेव्हां राजश्री श्रीधर विठ्ठल व त्यांची सेना काय काय चमत्कार दृग्गोचर करितील तें पहाण्याकडे सर्व राष्ट्राची दृष्टी लागली आहे.

राजश्री श्रीधर विठ्ठल हे एक प्रसिद्ध पुरुष आहेत. सामाजिक परिषदेचे जे कट्टे द्वेष्टे आहेत त्यांच्या व्यूहामध्यें हा धूमकेतु आपला देदीप्यमान प्रकाश पाडीत आहे. नामदार बाळ गंगाधर टिळक यांनीं राष्ट्रीय सभेच्या व्यवस्थापक मंडळीचा सेक्रेटरीपणा सोडला. त्यांचा राजिनामा मंजूर ही झाला आणि त्यामुळ त्यांस यथेष्ट दिशेनें वागण्यास कांहीं प्रतिबंध राहिला नाहीं. सामाजिक परिषदेला लयास नेऊं इच्छिणारी मंडळी निकरास व हट्टास पेटली आहे. राष्ट्रीय सभेच्या मंडपांत सामाजिक परिषद भरूं नये ही गोष्ट वादास मूळ कारण होय. ही अट कबूल असेल तरच राष्ट्रीय सभेला वर्गणी देऊं, नाहीं तर वर्गणी देऊं नये व दिली असल्यास ती परत कोर्टद्वारा देखील वसूल करावी असा या वादाचा परिणाम होतो! गेल्या १० व्या तारखेस पुण्यास टोळेजंग जाहिर सभा भरली होती तेव्हां वरील मतलबाचे ठराव कडाक्यानें पसार करण्यांत आले. राजश्री श्रीधर विठ्ठल हे व त्यांचे अनुयायी मोठें मजेदार बोलले 'सोमाय इंद्राय तक्षकाय स्वाहा' या श्रुतिवाक्या प्रमाणें सामाजिक परिषदेची किंबहुना राष्ट्रीय सभेची, आहुती या वादकुंडांत टाकण्याचा मंत्र' राजश्री श्रीधर विठ्ठल आदि करून अध्वर्यु पठण करीत आहेत इच्छा एवढीच कीं आचार्यांचीच चकून होमकुंडांत आहुती न पडावी ह्मणजे झालें.

---

# The Berar Samachar

MONDAY NOVEMBER 18, 1895

The re—settlement of Berar is in vigorous progress and from the last Revenue Report we learn that the proposals for the Balapur Taluka await the final orders at the hands of the Governor-General in Council. The fate of the Akola Taluka is in the balance and will in all probabilities be a sequel to the highly enhanced assessment in the Talukas of Malkapur, Jalgaon and Khamgaon. We are opposed to this policy of the ever increasing demands of Revenue on two grounds; firstly, there is not the necessity of a higher demand for the revenue of the land for the purposes of administration; and secondly, we can not help confessing that the masses are extremely poor and can no longer bear a higher strain of taxation. The soil of the province is in a deteriorated condition. The prospects of a good harvest are most uncertain. The recent years bear out the fact that the agriculturists are fast sinking in the depths of poverty through successive failures of a good crop. The old assessments leave a small margin of income and the peasantry as a class do not, after a year's honest work in a field, live beyond want. We cannot well depict to ourselves the future effects of a heavier taxation upon the indebtedness of the masses, but we would rather signalize the danger of a growing feeling of discontent that rules in the minds of the people at large.

We are sorry to behold that the Government turned a deaf ear to the solicitations of the large public meeting held here in November last. The Berar Sarwajanik Sabha was fully alive to the emergencies of the present disastrous policy of Re—settlement. The Sabha has done an exceedingly able work in its exhaustive representations to the Government; but the prospects of success are as distant and disheartening as they were before. The recent reply of Lord Elgin to the address of the Poona Sarwajanik Sabha gives a death—blow to our hopes. The Poona Sabha condemned with anxious solicitude the prevailing policy of revising the old assessments, but Lord Elgin seemed in a flashing tone to sign a warrant of sticking with persistent efforts to the self—same Re—settlement. His Excellency rebuked the Sabha for references in a welcome address to the larger and more comprehensive problems that affect the whole community in India. Lord Elgin argued that a reasoned and deliberate reply is not possible in contraversial questions, still it must be well—known that the present demand of revenue from the yield of the land is the smallest that was ever known in the History of India.

We hope, however, that the leaders of the Berar Public will not shrink an inch from the thankless task of fighting a good battle against the Government policy of Re-settlement. It is a problem of a vast public utility and should not be thrown aside through dispair. We are aware that our representations to the Government of India will not secure a redress of our grievances, but we wish our leaders to carry a crusade to the very doors of the Parliament.

---

In his Sanitary Report Dr. Little has drawn the attention of the Municipalities to his note containing instructions as to how the night—soil should be utilized in the best way possible. What he presses people to learn is the use of the night—soil for raising fruitful crops. He calls upon the municipal bodies to lay for imitation a practical lesson before the public. He observes thus:—

"It is strongly recommended that municipalities should thus trench and cultivate the ground for themselves, at least to begin with, so as to demonstrate practically to the public the value of night-soil, and the profit accruing from its use. In this way they will help to remove the prejudice now said to exist against it. The system under which the trenched land is leased to cultivators, or the contents of the trenches sold as manure, is doubtless less troublesome to work, but not so lucrative in the long run, and is wanting, as a practical demonstration, likely to lead to competition for the manure in the future."

In his review of the Municipal report of last year, the Resident summarizes in a brief note the income of a Municipal citizan and the incidence of taxation fixed there upon. We draw the attention of our readers to the summary we present below with a dissentient note that the possibilities of future taxation are not as bright as they are painted there.

This portion of the review runs as follows:—

"The aggregate municipal income from all sources, including loans, fell from Rs. 3,83,399 in 1893 94 to Rs. 2,56,313. In the former year the large provincial water-works loan (Rs. 1,26,000) to the Akola Municipality swelled the income of the year. The total income from rates and taxes fell to Rs. 96,090 from Rs. 1,00,627 in 1893 94: revenue from municipal property and powers apart from taxation amounted to Rs. 80,577 against Rs. 84,297: of this sum more than half was realized from fees and revenue from markets and slaughter-houses. The sutta tax in Akola and Khamgaon yielded considerably less receipts (Rs. 2,126 and Rs. 6,310), the rate of the tax having been reduced and speculative dealings in grain and cotton having been restricted in the year.

The incidence of taxation per head of population varied from Rs. 1-5-6 in Buldana to Rs. 0-2-11 in Shegaon. The taxes included in this calculation are taxes on houses and lands, on animals and vehicles, on professions and trades, tolls, water rates, and scavenging taxes. The calculation exhibits a larger incidence than is, strictly speaking, fair, for the tolls are presumably paid as much by outsiders as by the municipal committees, while the water—tax is merely a payment for a commodity. The total incidence for the Province on these figures works out to 9 annas 10 pies, and this collective figure is distinctly low, and confirms the opinion frequently expressed before that the Berar municipalities have plenty of resources available to them if only they make use of their opportunities. The Resident notes with satisfaction that three of the small municipalities—Shegaon, Ellichpur Civil Station, and Yeotmal—are proposing a scavenging tax: there is no reason why other municipalities which are still without taxes on animals and vehicles, and whose public needs call for fresh taxation, should not impose these taxes, while the tax on buildings and lands is one that so far only two municipalities have imposed.

Grants to municipalities from local funds amounted to Rs. 48,275: the greater part of these grants are assignments from the pound receipts of the District Boards."

The bill well—known as the bill of "Special Verdicts" is on the anvil of the imperial Legislative Council. We are not prepared to say that we are either for or against the proposed amendment in the present Jury System. We think, however, that our readers should have some material from which they can frame their own opinions on the question.

The Jury Commission is opposed to any amendment and thus remarks:—

"We are not in favour of any alteration in the present law, which provides sufficient means for obtaining a verdict, and we think that there are strong objections to any thing of the nature of a cross-examination of the jurors as to-details of a case so as to obtain their opinion on portions of the evidence. Amongst these it will be sufficient to say that it must very frequently happen that the jurors may individually arrive at the same conclusion by different processes of reasoning, or they may find difficulty in expressing intelligently or logically a conclusion fairly arrived at on consideration of the entire case. No doubt in certain cases—for instance, in cases of culpable homicide not amounting to murder, or of house-breaking with intent to commit an offence—it may be necessary to give a special verdict to determine the exact offence, so as to regulate the sentence; but the terms of the present law sufficiently provide for this and we are opposed to any alteration for the purposes suggested."

The late Justice Sir T. Muttusami Aiyar is evidently in favour of the proposal and expresses his learned opinion in the following persuasive terms:—

"As regards section 303, I see no objection to amending it so as to enable the Judge to require a special verdict on particular issues of fact. On the other hand, I venture to think that such amendment is an additional safeguard. It is not clear to me how the amendment is likely to initiate a system of cross examining the jury as to grounds of decision. In his charge to the jury the Judge is bound to tell them what material issues of fact arise for decision in each case under trial, and what the findings of the jury ought to be on the several issues to warrant either a conviction or an acquittal. This being so, the power to call for a special verdict on particular issues of fact will only enable the Judge to see that effect is given to his directions and accustom the jury to consider whether their verdict is the outcome of their findings on the several issues. I do not, however, understand the amendment to permit the jury being questioned as to the reasons for their finding on each issue, and there appears to me, therefore, no weight in the objection that the power to call for a special verdict will end in initiating a system of vexatious cross examination as to the reasons of the decision of the jury."

The following is the substance of the resolution at which the Governmnnt of India has arrived after a careful study of the various opinions collected on the very question.

"We are, therefore, of opinion that the Judge should be allowed to require from the jury separate findings on any questions of fact which he may think material. The statement of these issues will in itself be calculated to assist the jury. Whether this can be more suitably done before the jury have delivered their general verdict or afterwards, is a matter which we are disposed to leave to the Select Committee if a Bill is introduced; but, as at present advised, we think that it can be more suitably done before the general verdict is given as a general rule, though in particular cases and to clear up doubtful points it might doubtless be usually done afterwards. It is, however, to be noticed that if after a jury have returned a general verdict they are required to bring in separate findings on subordinate points, there will be some difficulty in avoiding at least the appearance of cross-examination. We think that an amendment of section 303 could be drafted without difficulty, which would, on the one hand, admit questions on particular issues of fact material to a charge, and, on the other, exclude questions relating to the reasons for a decision or the credibility of particular evidence."

Our correspondent from Elichpoor dated 14 current writes about a touching scene of leave—taking. When Captain Maudit closed his court previous to the day of his going in furlough Mr. Gunesh Nagesh in behalf of the pleaders, addressed a few parting words. He thanked Captain Maudit very much for his kind cordial and corteous treatment of the bar. Mr Gunesh Nagesh was emphatic when he said that the work of the gentleman was most honest straight—forward and thorough. Captain Maudit has well nigh reduced the files of the work in arrears and it is to be said with sincere satisfaction that Captain Maudit has won the golden opinions of those who came in contact with him. Captain Maudit in his reply thanked the pleaders in a feeling manner and was very glad to refer to his improvement in legal acumen through his touch with the learned bar. He said that it was pretty fair of them all to put up with his impatience and before thanking them again he expressed a hope that he would be glad to return there amongst them all after a year's period.

## वऱ्हाड

हवामान—थंडी असावी तशी नाहीं. गांवोगांव पिण्याच्या पाण्याच्या पुरवठ्या संबंधानें ओरड आहे. किरकोळ दुखणीं जोरावर आहेत.

क्यापटन माडिट अ. क. इलिचपूर हे १ वर्षाच्या फर्लो रजेवर विलायतेस जात आहेत

मि. सिंपसन आफिशिएटिंग डेपुटी कमिशनर अकोला यांस एलिचपुरास अ. कमिशनरचे जागीं बदललें आहे. आणि मि. हेअर हे येत्या आठवड्यांत आपल्या कामीं रुजूं झाल्या नंतर मि. सिंपसन हे आपल्या जागीं इलिचपुरास जातील.

कर्नल गंथार्प पोलीस सुपरिन्टेन्डेंट यांनीं पेन्शन घेतल्यामुळें गेल्या जुलैच्या २८ तारखेपासून खालील बदल्या देण्यांत आल्या.

मि. काडग्रेह यांस वर्ग तीन व मि. ग्यालवे यांस वर्ग ४ चे पोलीस सुपरिन्टेन्डेंट व मि. म्यागिन यांस वर्ग १ चे असिस्टंट सुपरिन्टेन्डेंट नेमिलें.

कर्नल मेकंझी सी. आ. ई. यांनीं पेन्शन घेतल्या कारणानें मि. बुलक रेव्हेन्यु कमिशनर, मि. आवर्ड ज्युडिशियल कमिशनर आणि मि. इलियट सिव्हिल आणि सेशन जज्ज यांस त्यांच्या सध्याच्या जागीं कायम केलें हें कळविण्यास आनंद वाटतो.

रा. रा. केशव गणेश गोडसे हे वऱ्हाडांतून गेल्या नंतर संबळपुरास पोस्ट मास्तर होते त्यांची बढती पुन्हां वऱ्हाडांत पास्टल इनस्पेक्टरचे जागीं झाली हें कळविण्यास आनंद वाटतो वऱ्हाड प्रांताला पूर्वी दोन इनस्पेक्टर होते त्या ठिकाणीं आतां तीन जागा केल्या आहेत आणि तिसऱ्या जागेवर राजश्री केशवराव यांची नेमणूक झाली आहे हे गृहस्थ फार वर्षें मागें पडले होते पण त्यांच्या गुणाची पारख झाली हें विशेष आनंदकारक होय.

खामगांव मुनिसिपालिटीचे ओव्हरसिअर रा. रा. शंकर केशव यांस येथील जिल्हा बोर्डांत ८० रुपयांची मुख्य ओव्हरसिअरची जागा मिळाली आणि त्या अन्वयें ते अकोल्यास दाखल झाले. आरंभीं पगार ८० रुपये मिळून दरसाल ५ रुपये प्रमाणें १०० रुपया पर्यंत वाढावयाचा आहे.

आणि येथील जिल्हा बोर्डातील सब ओव्हरसिअर रा. रा. गोपाळ हरी सावरकर यांस ७५ रुपयांवर खामगांव मुनिसिपालिटींत नेमिलें. ही बदली त्यांस फार त्रासदायक झाली आणि ती त्यांच्या मित्रमंडळीस अगदीं आवडली नाहीं. राजश्री गोपाळराव यांनीं आपल्या कामा शिवाय येथील मुनिसिपालिटींत व लायब्ररींत महत्वाचीं सार्वजनिक कामें उदारपणें केलीं आहेत.

लार्ड एलजीन साहेबांची स्वारी हैदराबादेस गेली असून तेथील मोगलाई आनंदोत्सवांत व घोड्यांच्या शर्यतींत अगदीं गर्क आहे. महाराणी साहेबांचे प्रतिनिधी या नात्यानें लाट साहेबांचा गौरव मोठाच झाला पाहिजे आणि त्या अन्वयें निजाम सरकार लक्षावधि रुपये खर्च करून साहेबांना उत्कृष्ट पाहूणचार देत आहेत. हल्लीं हैदराबाद संस्थानचा राज्यकारभार अत्यंत असमाधानकारक आहे. तेव्हां नामदार साहेब निजाम बहादुरास बोध करून त्यांचें लक्ष्य ख्यालीखुशालींतून काढून प्रजेच्या हिताकडे लावतील अशी आह्मी उमेद बाळगतों.

मुंबईस "एम्प्रेस इंक कंपनी" नांवाचा शाईचा मोठा कारखाना निघाला आहे. या कंपनीच्या शाईला मुंबई सरकारानें उदार आश्रय दिला आहे. आपल्या शाईची प्रसिद्धि व्हावी ह्मणून या कंपनीनें १२ आणे किंमतीची ही शाई विकत घेणारास १८९६ सालची एक रोजनिशी बक्षीस देण्याचा विचार केला आहे. या कंपनीच्या रोजनिशीची एक प्रत आह्माकडे आली आहे तिचा आह्मी आभारपूर्वक स्वीकार करितो. रोजनिशीची छापाई चांगली, व कागद टिकाऊ आहेत. आरंभीं विशेष उपयुक्त माहिती असून प्रत्येक तारखेच्या शेवटीं एक एक मराठी ह्मण दिली आहे. या रोजनिशीची किंमत फक्त चार आणे, आहे. आणि ही किंमत स्वल्प आहे. ठिकठिकाणच्या ग्राहकांनीं या रोजनिशीस आश्रय द्यावा आणि या कंपनीच्या शाईचा अनुभव घेऊन पहावा अशी आमची सूचना आहे. कंपनीचा पत्ताः—मेडिकल हॉल, दहावी कामाठीपुरा, गल्ली मुंबई असा आहे.

## वर्तमानसार.

विलायती कापडावर हिंदुस्थान सरकारानें नुकतीच जी जकात बसविली आहे ती अयोग्य असून आमच्या व्यापारास ह्मणून पाडणारी व हिंदुस्थानच्या मालाचा बचाव करणारी असल्या मुळें ती उठविणें जरूर आहे असें मांचेस्टरच्या व्यापाऱ्यांचें ह्मणणें असून त्याबद्दल तुमचें काय ह्मणणें आहे असें विलायतसरकाराकडून हिंदुस्थानसरकारास विचारणें झालें आहे. व त्याकरतां हिंदुस्थानसरकारानें मुंबईच्या व्यापारी मंडळीस विचारणें केलें आहे.

डार्डनलच्या किल्यांत टर्की मोठी तयारी करीत आहे, १३,००० फौज नवी तयार केली आहे; वेगळाल्या ठिकाणीं नव्या नव्या तोफा सज्ज करून ठेवल्या आहेत; शहरांतली सर्व फ्लानेल खरेदी करून त्याची काडतुसें करण्याचा झपाटा चालविला आहे; आणि कासार व तांबट यांस कंदील व क्यांटिव नांवाची शिपायाचे पिण्याचे पदार्थ ठेवण्याचीं भांडीं तयार करण्याच्या मार्गे लावले आहेत. इकडे हा असा प्रकार चालू असून रशियानें आपलें अरमार ट्रेबिझोंड येथें रवाना केलें आहे.

टर्कीच्या एशियाटिक प्रांतांत चहूंकडे दंगे धोपेच चालू झाले आहेत व त्याकरतां गरज लागल्यास तावडतोब कामगिरीवर पाठवितां यावी ह्मणून टर्कीसरकारानें रिझर्व फौजेंतील ४०,००० फौजेस तयार असण्याचा हुकूम केला आहे.

आलिकडे हिंदुस्थानच्या लोकांस विडी, आगकाडी व राकेल या त्रिदोषांनीं अगदीं ग्रासून टाकलें आहे व त्यामुळें फार मोठें नुकसान होत आहे.

हैदराबाद उमरकोट स्टेट रेलवे गिड बंदरापासून शाडीपालीपर्यंत वाढविण्याचें ठरलें. खर्चाचा अदमास १८,१९,८८८ रुपये मंजूर झाले.

ही पुढील गमतीची गोष्ट बंगलोरच्या एका वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाली आहेः—सुमारें १५ दिवसांवर एक फकीर हुबळीच्या मशिदींत निमाज पढायास गेला. काजी परत जाऊं लागला; असतां तो फकीर काजीजवळ गेला व मशिद बांधण्याकरतां वर्गणीनें मी ही रकम जमविली आहे ती संभाळा असें काजीस ह्मणाला. काजीनें ती रकम घेतली व मी तुला जेवण देतों तें जेव आणि मग जा असें फकीरास सांगितलें. काजीनें जेवण दिलें व फकीर जेवला. जेवल्यावर थोड्याच वेळांत पटकीसारखा प्रकार होऊन फकीर मेला. सकाळीं लोक आले व त्यांनीं प्रेत पाहून काजीस वर्दी दिली. काजीनें दिलगिरी दाखवून प्रेत पुरण्यास सांगितलें. प्रेत स्मशानांत नेण्याची सर्व तयारी झाली व आठ असामी उचलूं लागले तरी तें प्रेत उचलेना. शेवटीं काजी उचलूं लागला तेव्हां तें उचललें व स्मशानापर्यंत काजीस खांदाही घालावा लागला. स्मशानांत तयार केलेल्या खाड्यांत प्रेत लोटतांच तें खडखडून उठलें व काजीच्या पायांवर पडलें. इतक्यांत त्यास पुन्हा लोटलें तों काजीच्या पायांत एक लोखंडाचा वाळा व त्यास एक साखळदंड असें तयार झालें. लव्हारास बोलावून आणून काजीच्या पायांतील ती बिडी काढली. दुसऱ्या पायांत तशीच तयार झाली. ममताचे कपडे तपासले तों त्यांत वर्गणीनें २०० रुपये जमविल्याची एक याद सांपडली पुढें काय झालें तें बाहेर आलें नाहीं.

हिंदुस्थान सरकारच्या फौजेची एक टोळी येत्या वर्षी काफरीस्थानाकडे जाणार आहे असें सांगतात. अ.

विलायती शेतीची निकृष्टावस्था—ह्या शेतीच्या दैनेचा असा परिणाम झाला आहे कीं शेतींत निर्वाह होईना ह्मणून शेती करणारे तो धंदा सोडून कारखान्यांत मोल मजुरी करण्यासाठीं जात आहेत, आणि जमिनीचे मालक त्या जमिनींत पिकें न करितां चारणीसाठीं ह्मणून राखून ठेवण्याचें काम निरुपायामुळें करीत आहेत.

बाहेर देशचा गहूं अतोनात येऊं लागल्यामुळें उत्पन्न होणारा महाग गहूं कोणीच घेईना, तेव्हां तो उत्पन्न करून तरी उपयोग काय? शेती संबंधीं उत्पन्नाचा दुसरा धंदा दूधदुभतें, लोणी, मलई वगैरे विकण्याचा होय पण रसायन क्रियेनें दूधदुभतें, लोणी, आणि मलई ताजा स्थितींत ठेवण्याचा शोध लागल्या पासून स्वीडन आणि नार्वे अशा देशांतून दूध लोणी आणि मलई इतकी येऊं लागली व विलायतेंतल्या दूधदुभत्या पेक्षां इतकी सस्त विकूं लागली कीं विलायती शेतीचा तो उत्पादक दुसरा धंदाही बहुतेक बसल्या सारखाच आहे. तिसरा धंदा मांसासाठीं जनावरें तयार करून तीं मारून त्यांचा मांस विक्रय करणें, पण रसायन क्रियेनें मांस सुरुन ताज्या स्थितींत ठेवण्याची युक्ति साधल्या पासून युनायटेड स्टेटस, आस्ट्रेलिया वगैरे देशांतून तसलें मांस येऊन विलायतेंतल्या मांसापेक्षां अतिशय सस्तें विकूं लागल्या मुळें तोही धंदा बसला. ह्या प्रमाणें सर्व बाजूंनीं विलायतेंतल्या शेतीची अत्यंत निकृष्णावस्था होऊन गेली आहे. तेव्हां जमिनदार जे मोठमोठे उमराव ह्यांच्या कुरकुरीस पारावार नाहींसा होऊन ती कुरकुर कांहीं उपायानें मोडण्याचें वचन कानसरव्हेटिव मंडळीनीं निवडीच्या वेळीं दिलें आहे तें आतां कोणत्या उपायानें ही शेताची दैना नाहींशी करितात हे पहाणें आहे.

अप्रतिबंध व्यापाराचा हा निःसंशय परिणाम आहे असें थोड्याच दिवसांत ब्रिटिश सरकारास कबूल करावें लागेल.

इंग्लंड हें स्वराज्य आहे तेव्हां त्याच्या कल्याणा साठीं ब्रिटिश सरकार हवें तें करण्यास तयार होईल. पण हिंदुस्थान हें परराज्य आहे. त्याच्या हिताची हिंदुस्थान सरकारास अगर ब्रिटिश सरकारास मुळींच कळकळ नाहीं तेव्हां त्याच्या शेतीची, व्यापाराची, आणि कलाकौशल्याची दैना झाली तरी तिची दाद ह्या इंग्रजी राज्यांत लागण्याचा मुळींच संभव नाहीं कारण ज्या लोकांची दुर्दशा झाली आहे त्या हिंदुस्थानच्या लोकांच्या अनुमतानें हिंदुस्थानचा राज्यकारभार मुळींच चालत नाहीं. तेव्हां हिंदुस्थानाचें कोणत्याही प्रकारचें दैन्य फिटण्याची मुळींच आशा नाहीं.

चीन देशांत पेकीन राजधानीमध्यें गेल्या दोन महिन्यापासून विलक्षण प्रकारची तापाची सांथ आल्यामुळें उत्तर भागांत ६०००० व दक्षिण भागांत ३०००० आणि अशाच इतर रोगांनीं मिळून एकंदर १२० हजार लोक लेमे! मोठाच अनर्थ!

रत्नागिरी तालुक्याच्या रिव्हिजन सेंटलमेंटा करितां ह्या तालुक्यांत शेतकीची व इतर गुरें आणि नांगर किती आहेत, व तलाव व इतर जल संचय किती आहेत वगैरे माहिती गोळा करण्याचें काम परवांपासून १० कारकून ठेवून सुरू झालें आहे खरी माहिती सरकारांत जाण्यासाठीं लोकांनीं सुद्धां जपलें पाहिजे.

प्राथमिक शिक्षणास मदत—मुंबई इलाख्यांतील लोकलफंडाच्या शिलकीचे सुमारें ७ लाख रुपये जिल्हानिहाय देश भाषांच्या प्राथमिक शिक्षणाभिवृद्धीकडे लावावे, अशा आशयाचा विचार सरकारांत सुरू असल्याची बातमी आहे

अमृतसर येथें पाद्री लोकांनीं एका ब्राह्मणाच्या मुलीस ख्रिस्ती धर्माची दीक्षा दिली त्यामुळें तिकडील हिंदुमुसलमानांचीं मनें फारच खवळलीं आहेत असें ट्रायब्यून पत्रावरून समजतें. ह्या चळवळीस विशेष रूप देण्यासाठीं तारण येथील लोकांची अमृतसर येथें दरबार साहेब जागेत एक फार मोठी सभा भरली होती. तीस पुष्कळ जातीचे मिळून १००० लोक आले होते. तेव्हां पुढें लिहिलेले ठराव करण्यांत आले.

१ तारण येथें वेगळ्या दोन मुलींच्या शाळा आहेत. तेव्हां कोणत्याही हिंदु अगर मुसलमानानें आपल्या मुली पाद्रींच्या मुलींच्या शाळेंत पाठवूं नयेत.

२ कोणत्याही हिंदूनें अगर मुसलमानानें आपल्या मुली, बहिणी, बायका, किंवा दुसरी कोणतीही स्त्री रोगी पाद्रयाच्या जनाना दवाखान्यांत पाठवूं नये.

३ म्युनिसिपालिटीकडून पाद्रयाच्या जनाना दवाखान्यास जी मदत दिली जाते ती तिनें काढून घ्यावी अशी सूचना करावी.

४ अमृतसर शहरांत ज्या बंद गल्ली आहेत त्यांत पाद्री धर्मोपदेशकांस जाऊं देऊं नये कारण धर्मोपदेश करण्याच्या मिषानें ते हिंदु आणि मुसलमान धर्माची निंदा करितात.

५ कोणी बोलाविल्या शिवाय पाद्री बायांनीं हिंदूच्या अगर मुसलमानाच्या खासगत घरांत कधींही जाऊं नये.

सभेच्या ह्या ठरावावरून तिकडील हिंदु मुसलमानांचीं मनें पाद्री लोकांबद्दल किती वाईट झालीं आहेत?

" स्व धर्मे निधनं श्रेयं " ही ह्मण लोकांनीं नेहमी ध्यानांत बाळगून वागावें हें बरें. शु० सू०

आर्मीनियाच्या खटपटींच्या विरुद्ध, रशियनपत्रें सक्त टीका करूं लागलीं असून इजिप्तचा कबजा इंग्लंडानें सोडावा असें ह्मणत आहेत. ही पुढीचीं स्वप्नें कीं काय?

आर्मिनिया व त्याच्या आसपासही मोठा बंडावा उत्पन्न झाला आहे. आर्मिनियांतील ख्रिस्ती लोकांनां इंग्लंड पासून फायदा झाला नाहीं ह्मणून ते रशियाकडे दाद मागण्यास गेले आहेत असें कळतें.

मध्यप्रांतांत यंदाहीं दुष्काळाचीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत- त्यामुळें लोक अगदीं सैरावैरा होऊन गेले आहेत सरकार याच्या साठीं धान्याचीं कोठारें थोडीच मोकळीं ठेवणार आहे? सरकारला त्याची फिकीर वाटेल तर ना!

रविवारीं हजामत केल्याबद्दल दंड—लीडस येथील तिघा न्हाव्यांस रविवारीं हजामत केल्या बद्दल एकेक शिलींग दंड झाला.

शिवछत्रपति स्मारका साठीं जमलेली रकम १०००० रुपयांवर गेली असें मराठा पत्रावरून समजतें.

पुण्याच्या वार्तानिधि पत्रांत असें आहे-- व्यापारी लोकांची एक सभा होऊन राष्ट्रीय सभा एक पक्षाच्या हातीं ( सामाजिक परिषद पक्षपात्यांच्या हातीं ) गेली सबब कोणी वर्गणी देऊं नये, व ज्यांनीं दिली असेल त्यांनीं ती परत घ्यावी. व ह्या कामांत घ्यावी लागल्यास कोर्टाची मदत घ्यावी, असें ठरल्याचें समजतें. " फार चांगली गोष्ट आहे!

ग्रेटब्रिटन व आशान्टी—कमासिच्या राजानें ग्रेटब्रिटनचें शेवटचें बोलणें कबूल केलें नाहीं व आपण लढाईस तयार आहों असें उत्तर दिलें.

लंडन ९ ता. तुर्कस्थानांतील हल्लींची स्थिति फारच भयंकर आहे.

तुर्कस्थानांत नवीन प्रधान मंडळ नेमिल्यापासून सुलतान साहेब इतर राष्ट्रांशीं बेपर्वा वागत आहेत.

हिज इंपिरियल मेजेस्टी सुलतान साहेब यांनीं बेहरी पाछायास अस्मानिकची मोठी पदवी दिली. ह्यांस सुलतानानीं पूर्वी व्हॅान येथील गव्हर्नरचे जागेवरून इंग्लिश वकीलानें त्यांचे आर्मेनियन लोकां बरोबरच वाईट वर्तन दाखविल्या वरून, काढलें होतें.

रेंडीयरचें दूध व याचे केलेलें चीज वगैरे पदार्थ खाल्यानें फुफ्फुस चे रोग बरे होतात.

विजेच्या योगानें पायगाड्या चालू लागल्यामुळें अमेरिकेंत ९ लाख घोडे रिकामे पडले आहेत

पॅरिसमध्यें टपालाचे पेटींत पत्रें टाकिलीं ह्मणजे बर्लिन मध्यें १॥ तासांत पाहोंचतीं होतात तीं पत्रें आंतील वाऱ्याच्या सोसाट्यानें तिकडे जातात.

कानांतील फोडास सुलभ उपाय—कानांत फोड झाले व वेदना होऊं लागल्या असतां म्हशीच्या शेणाची पुरचुंडी करून त्याचे थेंब त्यावर सोडावे ह्मणजे तावडतोब कळ बंद होते व फोड बरे होतात

विजेची काठी—ही एका कल्पकानें काढली आहे. तिची बटन दाबून कोणाचेही अंगास ती लावतांच मोठा धक्का बसतो व तो खालीं पडतो. रात्रीं एकटे फिरणारांनीं जवळ बाळगण्यास योग्य आहे.

आनंदाची सुवार्ता—यंदाच्या राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष सुप्रसिद्ध वक्ते नामदार सुरेंद्रनाथ बनरजी ह्यानीं होण्याचें कबूल केलें असल्याचें कळतें

स्लेट पाट्या आतां हाडांच्याही बनवूं लागले आहेत. त्या फुटत नाहींत इतकेंच नव्हे, तर त्यांचा आवाजही निघत नाहीं.

---

☞ हें पत्र अकोलें येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे " वऱ्हाडसमाचार " छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सालअखेर ,, ७ ,, १ ०८
किरकोळ अंकास .... .... .... ०४

नोटिशी बद्दल.
१० ओळींचे आंत रु० १
दर ओळीस .... ०।०३
दुसरे खेपेस .... .... ०३

Six monthly ... ... ... 3 ,, 8 as.
Single copy ... ... ... ... 4 as.

Advertisement.
Below 10 lines ... 2 Rs.
Per line over 10 ... 4 as.
Repetition Per line 3 as.

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXIX AKOLA MONDAY 25 NOVEMBER 1895 NO 45
वर्ष २९ आकोला सोमवार तारीख २५ माहे नोव्हेंबर सन १८९५ इ० अंक ४५

### नमुना नंबर १४२

दिवाणी कोर्टाची सूचना

अज्ञानाच्या मालमिळकतीच्या वहिवाटी-चें सरटीफिकीट मिळण्या विषयीं अथवा अज्ञानाचे पालन व त्याच्या मालमिळकतीचा कबजा कर-या लायक मनुष्य नेमण्या विषयीं वर्ग १३ सन १८९० चा अक्ट ८ कलम ६ प्रमाणें.

अर्जाचा नंबर ९ सन १८९५

डेपुटी कमिशनर साहेब जिल्हा एलिचपूर यांचे कोर्टांत.

अर्जदार बिसमिल्लाबी, सेख अमनत, व खतीनाबी अज्ञान पा. आई पापाबी.

बापाचें नांव जवजे सेखवजीर

जात मुसलमान

राहणार अंजनगांव तालुके दर्यापूर

वरील ( अज्ञान ) बिसमिल्लाबी, सेख अमनत, खतीनाबी बापाचें नाव सेखवजीर जात मुसलमान राहणार अंजनगांव तालुके दर्यापूर जिल्हा एलिचपूर यांणें ( याच्या माल मिळकतीच्या वहिवाटीचें सरटीफिकीट मिळावे ह्मणून ) ( याचें पालन व मालमिळकतीचा कबज्या करण्या लायक मनुष्य नेमला जावा ह्मणून ) अर्ज दिला आहे. यास्तव मृत्युपत्राचे आधारें किंवा दस्तऐवजावरून, किंवा अगदीं जवळचे नातलगपणाचे कारणावरून, किंवा इतर प्रकारें ज्या कोणी मनुंष्यास सदरहू अज्ञानाचे माल मिळकतीवर संभाळ कर्ता या नात्यानें कबज्या करण्याचा हक्क सांगावयाचा असेल त्या सर्वास या लेखाने कळविण्यांत येत आहे कीं त्यानीं तारीख ६ सहा माहे दिसेंबर सन १८९५ इसवी रोजीं वरील अर्जाची चौकशी होणार आहे ते वेळी ह्या कोर्टात हजर होऊन आपापल्या हक्काची लेखी हकिगत दाखल करावी. तारीख ९ माहे नोवेंबर सन १८९५ इसवी.

H. Godwin Austen
Deputy Commissioner
डिपुटी कमिशनर.

---

### नोटीस

भागाई मर्द बहादू माळी देवकर राहणार पातूर शेखबाबू ईस खालीं सही करणार याजकडून नोटिशीनें कळविलें जाते कीं तूं माझी लग्नाची बायको असून तूं माझे घरून आपले आईबापाचे घरी जावयास सरासरी नऊ महिने झाले असतील. मी तुजला माझे घरी आणण्या करितां दोन चार वेळ आलों असून तूं आली नाहींस. मजला परस्परें असें ऐकण्यांत आलें आहे कीं तूं आपले आईबापाचे सांगण्यावरून तेथेंच राहिलीस त्यावरून तुझे बापानें पंच जमा करून पंचाईत केली. मी पंचास राजी असून तुझा बाप पचास नाराजी आहे. आतां सरासरी पंधरा १५ दिवस झाले असतील मी तुजला आणण्या करितां आलों असतां तूं माझे बरोबर आपखुषीनें येत होतीस परंतु तुझे आईबाप व भाऊ यांनीं फरक दिल्यामुळें तूं आली नाहींस त्या सर्वांच्या मनांत असें आहे कीं दोन तनिशे रुपये कोणापासन तरी घेऊन तुझा घरठाव दुसरा करावा. आतां जर तूं सदरील लिहिल्या प्रमाणें दुसरा घरठाव करशील तर तुझेवर व तुझे आईबापावर व भावावर फौजदारींत काम चालवून माझे जे यापाई नुकसान होईल तें व लग्नाचा सर्व खर्च फिर्यादी करून घेतला जाईल. असें तुजला कळवितों कीं तुजला सर्वपरीनें वागविण्यास व अन्नवस्त्र देण्यास मी तयार आहे. परंतु तूं जर माझें न ऐकतां दुसरा घरठाव केल्यास मजला फिर्याद सदरील लिहिले प्रमाणें करणें भाग आहे तर तूं ही नोटीस पावल्यापासून दिवस २४ चे आंत माझे घरीं यावें व तूं घरीं येणार ह्मणून जबाब आठ दिवसांत द्यावा. ह्मणून दिली नोटीस तारीख ८ माहे नोवेंबर सन १८९५ इसवी.

सही

सहीची निशाणी बखर बहादू वल्लद रंजाजी देवकर माळी राहणार पातूर शेखबाबू

---

### नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सराटीफिकिट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहिरात

सन १८६० अक्ट ७ कलम २७ प्रमाणें.

कि. क्लास १५ मिसल नंबर ८/९५

विद्यमान सिव्हिल जडज्य साहेब जिल्हा अकोलें यांचे कोर्टात.

नांव तुळशीराम दाजी अ. पा. चुलता ताराचंद बापाचें नांव परमानंद

राहणार आकोट तालुके आकोट

जिल्हा अकोलें यांस मयत.

दाजी बापाचें नांव परमानंद राहणार आकोट तालुके आकोट जिल्हा आकोला यांचे कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटिफिकीट मिळावें ह्मणून सदरहू अर्जदार यानें अर्ज केला आहे. त्याज करितां सदरहू मयत मनुष्याचे मालमिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्यांचा दावा असेल त्यांस जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे की, त्यांनीं तारीख ३० माहे नोवेंबर सन १८९५ इसवी रोजीं सदरहू अर्जाची चौकशी होईल त्या वेळीं या कोर्टात हजर होऊन आपापले हक्का विषयीं लेखी हकीकत दाखल करावी.

तारीख १८ माहे नोवेंबर सन १८९५ इ०

V. N. Dandekar.
सि० ज्यडज्य

---

वऱ्हाडसमाचार

मिती मार्गशीर्ष शुद्ध ९ शके १८१७

अकोल्यास नळांचें पाणी आणण्याचें पब्लिक वर्कस् खात्याचें काम अद्याप पुरें झालें नाहीं हें पाहून नवल वाटतें. मुनसिपालिटीचें काम जमाखर्चाच्या वहींत पैसा खर्ची घालण्याचें आहे आणि पब्लिक वर्कस खात्याचें काम तो पैसा खर्चण्याचें आहे. मुनसिपालिटी एका अर्थानें पब्लिक वर्कस खात्याचा बिनपगारी खजिनदार आहे. नळाच्या कामांत देखरेख करण्याचा, कांहीं नवीन सूचना करण्याचा, किंवा खर्च अमूक इतका व तो असाच करावा असें ह्मणण्याचा अधिकार मुनसिपालिटीस नाहीं. पब्लिक वर्कस खातें स्वतंत्र आहे व तें मुनसिपालिटीला जबाबदारही नाहीं. शहरसफाईच्या बाबी, पिण्याचें पाणी, सडका, वगैरे आरोग्य राखणारीं कामें बहुत आहेत पण त्या साठीं लोकनियुक्त प्रतिनिधींनीं मुनसिपालिटींत बसून रयतेचा लक्षावधि खजिना हवा तसा खर्च करावा आणि नागरिक लोकांनीं स्वस्थ मुकाट्यानें सर्व गोष्टी होऊं द्याव्यात हें तत्व आह्मांस कबूल नाहीं. स्वच्छतेच्या व आरोग्य रक्षक ह्मणून कोट्यावधि रुपये खर्च करण्याचे मार्ग आह्मास माहित आहेत. त्या पासून गांवच्या श्रीमंत लोकांची चैन होईल पण गरीब रयतेची काय दशा! गरिबांच्या डोक्यावर नवीन कर बसविले तर त्यांचा कितपत निभाव लागेल ही गोष्ट आरंभीं लक्ष्यांत घेतली पाहिजे. लोकांच्या मतें आकोल्याच्या नळांचें काम खर्चाच्या मानानें चांगलें झालें नाहीं. पब्लिक वर्कस खात्याचें स्पष्टीकरण विचारून सर्व जमाखर्च व झालेलें काम हीं मुनसिपालिटीनें अशा शंकास्पदस्थळीं निदान लोकदृष्टी समोर मांडलीं पाहिजेत. हल्लीं नवीन कर बसविण्याच्या वाटाघाटी चालूं आहेत आणि लोक नाना कराच्या देण्यानें नाडलेले आहेत. तेव्हां लोकांस मुनसिपालिटीनें आपला आदावा अगोदर कळविला पाहिजे.

---

रावसाहेब सिताराम विश्वनाथ पटवर्धन बी. ए. डायरेक्टर यांनीं कांहीं महत्वाच्या सुधारणा प्रचलित केल्या आहेत. परीक्षा साच्या होत जाव्या आणि परीक्षेंत कांहीं चांगले विद्यार्थी उतरले नाहींत तरी त्यांस वरच्या वर्गांत घ्यावें अशा विषयीं थोडी बहुत योजना त्यांनीं केली आहे. आह्मी पूर्वी हल्लींच्या शिक्षणक्रमा संबंधानें प्रतिकूळ लिहिलें होतें तथापि आनंदाची गोष्ट अशी कीं कांहीं चुक्या दुरुस्तीच्या मार्गांत आहेत. उद्योगशाळा सुरूं कराव्या ह्मणूनही रावसाहेबांचा प्रयत्न चालला आहे. औद्योगिक व यांत्रिक शिक्षणा संबंधानें या देशांत मोठी अनास्था आहे आणि उद्योगशाला बहुत पाहिजेत अशा विषयीं मि. राजर्स पाद्री-इंजिनिअर यांनीं थोडे महिन्यापूर्वी आकोल्यास व्याख्यान दिलें होतें. त्यावेळीं रावसाहेब पटवर्धन यांनीं या शिक्षण क्रमा विषयीं आपली कळकळ प्रदर्शित केली. लवकरच कांहीं प्रयत्न फलद्रूप होतील अशी आह्मास आशा आहे.

---

### बहिष्कार

( गोविक्रियाला शिक्षा )

गोहनन खाटिक कारितात असें ह्मणण्या पेक्षां गाईस माते प्रमाणें पवित्र बरबर मानणारे लोकच खरे चांडाल व खाटिक आहेत असें आमच्या अनुभवास आलें आहे. शेंकडों गाई हरहमेश खेडेगावांतून विकत घेऊन चालले असतांना कसाई दृष्टीस पडतात. त्या लोकांचें पोट कसाईपणावर चालतें व त्यांचा तो धंदाच आहे. पण खेड्यापाड्याचे व शहरचे कुणबी, ब्राह्मण, व इतर शेतकरी लोक द्रव्यलोभानें धडाधड गाई कसाबाला विकतात हा अपराध त्यांचा आहे. आणि त्या विक्रीबद्दल आमच्या समाजांत कांहींच शिक्षा नाहीं. कांहीं तरी शिक्षा असल्या शिवाय गोहननाची बंदी होणार नाहीं. गोरक्षणी सभा आमच्या प्रांतांत निजल्या आहेत आणि गोविक्रय बिनहरकत खाटिकांशीं लोक करीत आहेत. खाटिकाला गाय विकली तर विकणारास बहिष्कृत केलें पाहिजे आणि असा नियम सर्वत्र अमलांत येणें सोपें आहे. बहिष्काराची चाल एवढ्या गोष्टी पुरती लोकांनीं प्रचलित केली तर तिला कांहीं व्यत्यय येण्याचा संभव नाहीं. गोरक्षणी सभांपेक्षां गोहनननिवारक सभा अगोदर निघाल्या पाहिजेत. आमचे प्रांतस्थ लोक ही सूचना काळजीपूर्वक विचारांत घेतील अशी आह्मांस उमेद आहे.

---

सर्व राष्ट्राचा विचार गेल्या वर्षी मद्रासेस ठरला कीं सन १८९५ ची राष्ट्रीय सभा पुण्यास भरावी. राष्ट्राचे प्रतिनिधींचा हा विचार आहे तेव्हां तो पुणेकरांच्या भलेराईनें अस्तंगत होईल असें वाटत नाहीं. सामाजिक परिषदही मामुली प्रमाणें राष्ट्रीय सभेच्या

मंडपांत भरली पाहिजे आणि ती खरोखर तेंथें कां भरूं नये हें आह्मांस कळत नाहीं. यंदा त्याच मंडपांत भरली पाहिजे आणि जरूर वाटल्यास पुढील वर्षी मंडप परिषदला देऊं नये असा बहुमतानें यंदा ठराव करावा. राष्ट्रीय सभेचे प्रतिनिधी सामाजिक परिषद भरविण्याला अनधिकारी असून ते विश्वासघात करितात असें ह्मणणें चुकीचें आहे. राष्ट्रीयसभेला एक गृहस्थ प्रतिनिधी आहे ह्मणून ता कांहीं सामाजिक परिषदेला प्रतिनिधी हात नाहीं; किंवा सामाजिक परिषदेला आलेला प्रतिनिधी राष्ट्रीय सभेचाही प्रतिनिधी असला पाहिजे असा अर्थ बिलकूल नाहीं. उदाहरणार्थ, नामदार महादेव गोविंद रानडे. हे राष्ट्रीय सभेला प्रतिनिधीच होऊं शकत नाहींत पण ते सामाजिक परिषदेचे मुख्य चालक आहेत सामाजिक परिषद् कांहीं वाळीत पडलेली नाहीं. बहुत गृहस्थ तिचे सभासद आहेत. सर्व राष्ट्रच तिच्या सभासदाखालीं मोडतें तेव्हां अशी सामाजिक संस्था राष्ट्रीय सभेच्या मंडपांत भरली तर कांहीं हरया घडेल असें आह्मांस वाटते. नाहीं. पण हल्लीं पुण्यास जें रण शुष्कवादामुळें माजलें आहे त्यांत मात्र पुष्कळ हत्या वडतील असा भयंकर परिणाम दिसतो.

## मातृमहात्म्य आणि सद्यःस्थिति

( लिहून आलेला मजकूर )

हा विषय सामाजिक आणि राजकीय असा उभयविध आहे. कोणतेंही राष्ट्र घ्या अगर कोणतीही संस्था घ्या तिचें महत्व त्यांतील निरनिराळ्या व्यक्तींच्या महत्वावर अवलंबून असतें. तुर्कस्थान गाढांधःकारांत आहे अगर यूरोपांतील सर्व राष्ट्रें फार सुसंस्कृत झालीं आहेत असें आपण वारंवार ह्मणतों. त्यावेळीं आपण फारसें विचार पूर्वक बोलत नसतों हें खरें आहे तरी इतकें निर्विवाद आहे कीं अशा प्रकारचें विधान ठोकून देतांना त्या राष्ट्राची राज्यकारस्थान संबंधीं अगर एकाद्या कलेची प्रगति मनांत आणून आपण आपलीं विधानें प्रमाणभूत करीत असतों राष्ट्र ह्मणजे काय तर अनेक व्यक्तींचा मोठा समुदाय, राष्ट्राची योग्यता त्यांतील प्रत्येक व्यक्तीच्या योग्यतेवर अवलंबून आहे. ही एक व्यक्ति, ती एक व्यक्ति अशा अनेक व्यक्तींच्या समुदायानें ग्रामें, शहरें, आणि राष्ट्रें तयार हातात. करितां राष्ट्रांपासून व्यक्तिविषय दूर करणें दुर्घट आहे. समाजघटना सदृढ पायावर रचणें असल तर प्रत्येक व्यक्तिमात्रानें आपल्या स्वतःची सुधारणा केल्यास पुरें आहे. स्वतःची सुधारणा करतांना प्रत्येक व्यक्तिमात्रानें सर्व सग्दुणांचा पाया जो सत्याभिमान याचा दृढ आलम्ब केला तर इतर गुण आपोआप येण्यासारखे आहेत. ज्या राष्ट्रांतून मुळीं सत्याचाच लोप होत चालला आहे त्या राष्ट्राच्या प्रगतीबद्दल फारसा विचारच करण्याचें कारण नाहीं. ही गोष्ट विशेषेंकरून आपल्या देशास जितकी बळकट प्रमाणानें सांप्रतकाळीं लागू होत आहे तितकी इतर कोणत्याही देशास लागू होत असेल किंवा नसेल याचा आह्मास बळकट संशय आहे. व जोंपर्यंत लोकांत सत्यप्रीतिच नाहीं तोंपर्यंत किती ही राष्ट्रीय सभा आणि कितीहि सामाजिक परिषदें झालीं तरी दशाचें पाऊल पुढें पडणेंच नहीं. फार लांब कशाला वऱ्हाड सामाजिक परिषदेची स्थापना काणत्या रितीनें आणि कशी झाली! परिषदेच्या स्थापनेच्या वेळीं अध्यक्ष साहेब रा० ब० श्रीराम भिकाजी जठार यांनीं परिषदचा इतर परिषदांपासून किती भिन्न आदिघटक स्वभाव आहे वगैरे कितीवेळां सांगितलें होतें हें त्यावेळीं हजर असलेल्या प्रत्येक शिक्षकास आठवत असेलच. ही संस्था ह्मणजे कांहीं विविक्षित मंडळीची खाजगी संस्था असून अशाच नांवाखालीं इतरत्र मोडणाऱ्या संस्थाचा आणि इचा कांहींही मळ पडणें कठीण आहे असें त्या पूज्य आणि सन्माननीय गृहस्थानें हजार वेळां अभिवचन दिलें. तरी एक दोन गृहस्थांच्या खटपटीनें परिषेदस सामाजिक परिषदेचें रूप देऊन तिचें वृथाडम्बर करण्यांची जारी खटपट सुरू आहे. शेवट परिषदेनें मारून मुटकून जुलमाजुलमानें राष्ट्रीय सामाजिक परिषद या नावाखालीं मोडणाऱ्या परिषेदस प्रतिनिधी पाठविण्याचें कारस्थान पुढें ढकलून बिगर परवानगीनें यंदा मुखत्यारांचा ओंढाचा ओंढा व भला मोठा तांडा पाठवून या प्रांतस्थ परिषेदस वर्षभर नाममात्र अस्तित्वांत ठेवून प्रखर आणि तेजोमय रूप देण्याचा यत्न केला आहे. या गोष्टींत पुष्कळ वाद उपस्थित होतात. परंतु आपणास आज ते उपस्थित करण्याचें प्रयोजन नाहीं सबब उकरून धुरळा उडविण्याचें पुण्य आह्मी घेत नाहीं. या गोष्टी पासून घेण्यासारखी काय ती एकच गोष्ट आहे. ती ही कीं आपला सत्याभिमान लोपत चालला आहे. व आपण उगाच नसती स्तोमें माजवून सर्षपमेरु न्यायानें वागण्याचा यत्न करूं लागलों आहों. दयाळू इंग्रजसरकारानें आपल्याला जें पाश्चिमात्य शिक्षण दिलें आहे त्याचा आपण दुरुपयोग करून आपल्या अधिक अडाणी परंतु विमलात्म्या बांधवांच्या नेत्रांत शास्त्ररज फेंकण्याचा यत्न करूं लागलों आहों. आपणास आपल्या शिक्षणाच्या योगानें दोन लेखणींचे अथवा शद्बांचे फरेडे ओढून किंवा मारून दुर्विवेकास उदारकल्पाचें रूप देतां येऊं लागलें आहे. वस्तुतः ते आपल्यापेक्षां बरे. कारण त्यांना निदान आपले दुर्विवेक छपवतां येत नाहींत ह्मणून तें आपलें खरें स्वरूप झांकून, आहेत त्यापेक्षां अधिक बरे आहेत, असें दाखविण्याचा यत्न करीत नाहींत. हे विचार मनांत आले ह्मणजे मोठा विषाद वाटतो. व आपल्या पूर्व आणि सद्यःस्थितीचें स्वरूप मनांत येऊन सर्वांचेंच चित्त गोंधळून जात असेल यांत संशय नाहीं. ही स्थिति दूर होणें फारसें कठीण नाहीं. परंतु ही दूर करावी असा प्रत्येकाचा मनःपूर्वक हेतु मात्र असला पाहिजे. सामाजिक परिषदें नकोत असें ह्मणणारे क्वचितच आढळतील. परंतु परिषदाचे अध्वर्यु बोलल्या प्रमाणें वागत नाहींत किंवा ज्या बहुजनाच्या हितार्थ या संस्था स्थापन झाल्या आहेत त्या बहुजनास युक्ति युक्तींनें आणि धंदाईनें ते विमार्गविन्मुख करीत नाहींत. अग्रेसरांनीं बहुजनसमाजाशीं मातृवात्सल्य ठेवावें हीच आमची इच्छा आहे. व ते तसें मनोभावानें ठेवतील तर त्यांचे इष्ट हेतु केव्हांच तडीस जातील.

या लेखास आरंभ करतांना आह्मी प्रत्येक व्यक्तीची सुधारणा हीच राष्ट्राच्या प्रगतीची सूचिका असें ह्मटलें आहे. परंतु व्यक्तीची सुधारणा कशी व्हावी हें मात्र सांगावयाचें राहिलें आहे.

नेपोलिअन बोनापार्ट नेहमीं ह्मणत असे कीं कोणत्याही मनुष्याचें भावी सुख दुःख त्याच्या जननीवर सर्वथैव अवलंबून असतें. एकवार सरकारनें सुरू केलेल्या शिक्षणासंबंधीं भाषण करीत असतां वरील थोर पुरुष मॅडम कॅम्पन जवळ ह्मणाला "हल्लींची शिक्षण पद्धति मला निरुपयोगीशी वाटते.

( पुढें चालूं )

---

अकोलें जिल्ह्यांत खुर्दा अगदीं दुर्मिळ झाला आहे सर्वत्र रुपयास अर्धा आणा कमी मिळतो ह्मणजे शेकडा रुपये ३४= कमी पडता. सरकारी खजिन्यांत लोकांस पुरे इतका खुर्दा नाहीं. सरकारोंन पूर्वी येथें चालत असलेले त्रिशूळी वाघंबरी तरवारी वगैरे तांब्याचें नाणें बद केल्यामुळें इंग्लिश खुर्दाची चणचण फार झाली. परंतु बाजारांत रयतेस रुपयास अर्धा आणा तोटा सोसावा लागतो तरी सरकार सदरहू बाबतींत अजून बंदोबस्त करीत नाहीं. खुर्द्याची हल्लींच्या हंगामाचे दिवसांत फार जरूरी आहे. पूर्वी शेतीचे मजूरी बद्दल धान्य अगर कापूस द्यावा लागत असे परंतु शेतकरी लोकांस रोख पैसेच देणें हल्लीं जास्त सोयीचें वाटतें. स्थानिक अधिकारी लवकर सदरहू गोष्टी कडेस लक्ष पुरवून बंदोबस्त करतील अशी आह्मास बळकट आशा आहे.

---

वाशीम येथील जिल्हा व तालुका बोर्डाचे कांहीं मेंबरांस ते सतत तीन महिने पर्यंत बोर्डाचे कोणतेही सभेस हजर न झाल्यामुळें त्यांस बोर्डाचें कायद्याचें कलम ९ प्रमाणें मे० दिपुटी कामिशनर साहेब यांचे शिफारसीवरून मे० रेसिडेंट सा० हैदराबाद यांनीं मेंबरांचे यादींतून अशा गृहस्थांचें नांव काढून टाकण्या बद्दल गेल्या रेसिडेन्सी आरडर मध्यें प्रसिद्ध केलें आहे. सरकारोंने रयतेस स्थानिक स्वराज्याचे जे हक्क कृपाळू होऊन दिले आहेत ते अशा रीतीनें घालविल्या बद्दलचें हें पाहिलेंच उदाहरण वऱ्हाडांत आहे. पाहिल्यानें निवडणूकीचे वेळीं एन केन प्रकारेण जगापुढें आपण यावें ह्मणून प्रयत्न करावयाचे व त्यांत कशा तरी रीतीनें यशप्राप्ती झाल्यावर आपल्या शिरावर काय जबाबदारी आहे याचा कांहीं एक विचार करूं नये ही मोठा दुःखाची गोष्ट आहे. सरकारानें आपणास जे हक्क दिले आहेत त्याची अमलबजावणी आपण जर इमानें इतबारें व काळजीपूर्वक बजावली नाहीं तर त्या हक्कास आपण अपात्र आहों असें जाहीर करण्यासारखेंच आहे. मतदारांनीं मत देतांना योग्य मनुष्यास मत देण्याविषयीं फार खबरदारी ठेविली पाहिजे. ह्मणजे असें अनिष्ट परिणाम होणार नाहींत. असो " पुढच्यांस ठेंच मागचा शहाणा " या न्यायानें आमचे निरनिराळ्या संस्थेचे पुढारी कर्तव्यपराङमुखता दाखविणार नाहींत असें आह्मी इच्छितों.

---

# The Berar Samachar

MONDAY NOVEMBER 25, 1895

## THE HELPLESSNESS OF THE INDIAN PEASANT

It is a matter of worldwide notoriety that India is essentially an agricultural country and that the Indian ryot is a cow which has helped to make England prosperous in all the nations of the world. Our manufactures at one time were the most finished. The gorgeous products in the east manufactured in our looms rivalled the beauty and delicacy of any other workmanship and were sought through out the world But these are now things of the past. Free trade and orderly British rule have undermined them. We practised many useful arts and many arts which were conducive to refinement of manners and even to luxurious living. Our sculptors and our builders have left behind them enduring monuments whose solidity has defied the ravages of time and the revolution of ages. By our contact with Britain we have lost our artistic skill and excellence. Our ancient magnificence has gone and perhaps for ever. But through all these violent changes we have retained our habits of patient and contented industry. This opinion has been confirmed by that of many who are not interested in reviling us. Rich crops of productions reward the Indian peasant's unwearying work year by year. It is only our agricultural produce on which we have to rely for subsistence as well as the Government for their vast expenditure. Government may neglect the arts and industries of the country so as to place it at the mercy of English manufacturers. But can it afford to neglect the agriculturist? To do so would be to adopt a policy that would endanger its own existence and bring on a political suicide absolutely unparalled in the history of the world. Is the Government doing all it can to make the people prosperous? English economists make a statement that" In many districts the ordinary scale of nourishment is below what it was some years approaching dangerously near the limit of permanent starvation." These economists are not Congress agitators. Nor are they the Educated Hindus. What is the reason for this persistent decline? Government is periodically engaged in enhancing the settlement rates here, there and every where. There is not the least pretence for doing so. The country is getting more and more impoverished and yet this periodical increase of land revenue is allowed to go on unchecked. The late Mr. Heney Fawcett, speaking more than 25 years ago in the House of Commons with the authority of the greatest economists and financiers of the age included the Indian land tax as one of the inelastic items of Indian revenue and as incapable of any further increase. Still year after year Government has made use of its power and its admanistrative machinery to increase the land revenue by leaps and bounds and collects the enhanced rates at the point of the sword. The people are literally groaning under the burden of this increaseed taxation; yet their complaints and

sufferings are unheeded. From every district in this and other provinces which have been brought under the operation of this revenue representations have been sent forth against the grievous and burdensome character of the operations of the Revenue Settlement Department. But they have been of no avail. Meanwhile has the Government done any thing in the nature of a remedial measure. Every observer of the Indian agricultural Community has observed the difficulties arising from their indebtedness to the money-lending classes. There has beyond doubt been a widespread feeling that a remedy must be speedily found. The Government at times suggests a feasible measure of relief whenever these grivances reach it in an irresistible clamour. Beyond this nothing is done and the promised relief is as distant as ever. So recently as last year the late Sir George Chesney wrote as follows:—

"There is unquestionably in many extensive tracts of the country a degree of distress which calls for active remedy due to the agricultural community's increasing indebtedness to the professional trader and money lender, involving a wholesale alienation of land from the simple peasantry who have held it from time immemorial and who can not for the most part read and undertand the contracts under which they sign away their heritage in redemption to loans borrowed at exorbitant interests." Chesney points to a real grievance whose stress is daily on the increase. But government remains as stolid as ever and does nothing whatever to relieve the sufferer. Some remedy therefore is essential to the maintenance even of this deplorable state.

Again will any body deny that pedantic and technical procedure of our Courts, their elaborate system of pleading, and the facilities offered for endless appeal from Court to Court unduly foster the Indian passion for litigation and that they favor the process of alienation of land already referred to. If the consequences of this system were not so serious, one might indulge in a little banter at the grotesqueness of the technicalities which abound in the practice and procedure of our Courts of law. We again ask, can not government devise a simpler system which would be more adapted to the state of civilization of the country and the character of its inhabitants?

Experts and best economists have pointed out such serious symptoms about our present position in regard to land as the following:— (1) So far as can be judged the supply of cattle for agricultural purposes has dwindled considerably as well as gone off in quality. (2) There are not wanting grave indications as to the deterioration of soil all over India, owing to excessive cropping, want of fallows, and insufficiency of manure. Are these statements true or not? These are statements made by European as well as Native observers. Similar statements are daily and hourly made by our own agricultural population.

This year's Congress will consist of entirely refined men. It will be of men of light and reading the glory of the nation. All brutes will be directed from it. Will the Congress deign to consider the condition of the brute peasant? We have no agricultural schools, no model farms, we have in fact no means either popular or government which would enable us to improve and enhance our agricultural condition. The Congress has no donbt agitated this question from year to year But a time is now come for a more vigorous action. Poona is the city of all busy and sensible politicians. It is no use quarreling about a petty thing like the Social Conference. It is important for any good or evil. What is the Berar Social Conference formed under the constraint of Educational authorities doing? It is so insignificant that it may be allowed to drag a languid existence. The people should join together, should make a common cause, suspend their internal animosities and make one bold effort to "relieve their bold peasantry their country's pride." Time is fast approaching and we wish all party differences to subside.

## वऱ्हाड

हवामान—ह्या आठवड्यांत थंडीनें आपला अमल थोडा जास्त बसविला. रात्रीसि थंडी चांगलीच पडते. गावांत हिवतापाची साथ बरीच आहे. पाण्याचे पुरवठ्याची बरीच टंचाई आहे. नळाचें पाणी पुरेसें नाहीं व नळावर अतिशय गर्दी असल्यानें पुष्कळांस नदीचे पाण्याचाच पिण्याकडेसही उपयोग करावा लागतो. डाक्टर लोकांचे मते नदीचें पाणी अतिशय बिघडलेलें आहे व हल्ली मुनसिपाल कमेटीचा नदीचे पाण्या संबंधानें जसा बंदोबस्त असणें जरूर आंह तसा नसल्या कारणानें पाणी फार बिघडून भयंकर रोग उद्भवण्याची भीति आहे.

मे. हेअर सा० डेपुटी कमिशनर हे रजेवरून परत येऊन त्यांनीं आपले कामाचा च्यार्ज मि० सिपसन अ० क० आकोलें यांजपासून ता. २३ रोजीं घेतला.

मे. सिपसन साहेब यांची बदली एलिचपूर येथें झाली होती परंतु ती रहित झाली असें समजतें.

खून— येथें नबात्रण्यांत गेल्या मंगळवारीं रात्रीं एका रफू करणाऱ्या पटवे कराचा खून सुमारें ५० रुपयांचे ऐवजा करितां फार भयंकर रीतीनें होऊन त्याचें प्रेत छिन्न विछिन्न करून तें खोलेश्वराचे घाटचे बाजूस मोर्णा नदींत कोणी नराधमांनीं फेकून दिलेलें सांपडलें. इन्सपेक्टर धोंडजी यांणीं फार शिताफीनें सदर्हू खुनाचा पत्ता लाविला आहे व तीन रंगारी ईसप राहणार नबाबपुरा ( अकोलें ) यास पकडलें असून ते गुन्ह्यासही कबूल आहेत. येथील फर्स्ट क्लास माजिस्त्रेट मि० दांडेकर यांजपुढें चवकशी सुरू आहे.

मे० कुलक साहेब कमिशनर निजाम हैदराबाद येथें व्हाइसरॉय साहेब यांचे मुलाखती करितां गेले होते ते तारीख २२ रोजीं दोन प्रहरचे गाडीनें येथून उमरावतीस परत गले. रेलवे स्टेशनावर मि. हेअर, एव्हस वगैरे सर्व सरकारी कामदार साहेब बहादुरांचे सलामी करितां गेले होते.

पोंच— सापकरांची सन १८९६ इसवी साला करितां उपयक्त माहितीसह व सुबक रीतीनें बांधलेली अशा रोजनिशीची एक प्रत नंबर १ ची आमचे कडेस आली आहे तिचा आह्मी फार आभार पूर्वक स्वीकार करितों.

### आकोला बाजारभाव

| | | | |
|---|---|---|---|
| हुंडी मुंबईची दर्शनी | | | ९९॥=॥। |
| १५ ,, दिवसांच्या मुदतीची | | | ९९॥- |
| सुवर्ण | २८ | रुपें | १०० |
| मीठ | ४ | आळशी | २०२ |
| गहू काठ | ५६। | सर्की | ४॥ |
| तूप | ८॥। | तेल | ६॥ |
| चणे | ५० | तीळ | १०२॥ |
| कपाशी ४७ | गावराणी | रुई | ६१८ |

सट्याचा भाव.

| | |
|---|---|
| जवारी फाल्गुन शुद्ध २५ | ४९= |
| रुई फाल्गुन शुद्ध २५ | ६५॥। |
| आळशी वैशाख शुद्ध २५ | ९८॥।= |
| गहू वैशाख शुद्ध २५ | ६४८= |

### नोटीस

तीाा. गंगाभागिरथी रखमाबाई जवजे विठोबा रंगारी दुकान पेठ बाळापूर यास नोटीस देणार. तुकाराम भवानसा व रोडीसा त्रिंबकसा रंगारी राहणार बाळापूर या उभयताकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुह्मी आमची चुलती असून तुमचे ह्मातारपण झाल्यामुळें व तुह्मास पुत्रसंतान नसल्यामुळें हल्लीं तुह्मास दत्तक घेण्याची इच्छा झाली आहे असें समजते तर आह्मी उभयता जवळचे नातलक असल्या कारणानी आह्मा उभयता पैकीं कोणाचाही मुलगा दत्तक घ्यावा व दत्तक देण्यास आह्मी उभयता तयार आहो. आह्मांखरीज दुसरे कोणाचा ही मुलगा दत्तक घेऊ नये. घेतल्यास तो कोणच्या ही प्रकाराने कायदेशीर होणार नाहीं सबब ज्याहीर होण्यास विनंती केली आहे ह्मणून दिल्ही नोटीस सही ता. २४ माहे नोव्हेंबर सन १८९५ इसवी.

( सही )

तुकाराम भवानसा रंगारी बाळापूरपेठ दस्तुर खुद्द.

रोडीसा त्रिंबकसा रंगारी बाळापूरपेठ दस्तुर खुद्द.

### जाहिरात

सर्वत्र लोकास या जाहिरातीनें तुकाराम वा भवानसा व रोडीसा त्रिंबकसा रंगारी राहणार बाळापूर हे असे जाहीर करितात कीं तीाा. गंगा भागिरथी रखमाबाई जवजे विठोबा रंगारी दुकान पेठ बाळापूर ह्या ह्मातारपणामुळें व पुत्र संतान नसल्यामुळे दत्तक घेण्याच्या विचारांत आहेत असे कळते. तर सर्वांस असे जाहीर आह्मी उभयता करितो कीं आह्मा उभयता शिवाय त्यास जवळचे दुसरे कोणी नाहीं. ह्मणून जर करितां दुसरे कोणी दत्तक वगैरे होईल तर ते कायदेशीर व शास्त्रा प्रमाणें होणार नाहीं. व त्याजबद्दलचे जबाबदार आह्मी उभयता कोणत्याही प्रकारानें नाहीं ह्मणून दिल्ही जाहिरात सही ता० २४ माहे नोव्हेंबर सन १८९५ इसवी.

( सही )

तुकाराम भवानसा रंगारी बाळापूरपेठ दस्तुर खुद्द.

रोडिसा त्रिंबकसा रंगारी बाळापूरपेठ दस्तुर खुद्द.

### नोटीस

मे. सेख इब्राहीम वा सेख महमद अमीर चुनेवाला राहणार अकोलें यांस खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं, तुमचेकडे आमचे घेणें असलेले रुपये तुह्मी ही नोटीस पावल्या पासून दोन दिवसांचे आंत आमचे मुखत्यार वासुदेव जोशी राहणार आकोला याजला देऊन पावती घ्यावी अगर आमचे ह्मसांग दुकानीं आणून द्यावेंत नाहींतर आह्मी तुमचेवर दिवाणींत दावा करूं व मग कोर्ट खर्चाकरितां तुह्मास जबाबदार धरिले जाईल सदर्हू नोटीस खर्च आपल्यास द्यावा लागल कळावें ता० २४।११।९५ इ०

[ सही ]

नारायणराव बाबूराव देशमुख दुकान ह्मसांग मु० वासुदव यशवंत जोशी राहणार अकोले द० खु०


## SAPKAR'S DIARY
FOR 1896
WITH
A CALENDAR FOR 1897

### सापकरांची रोजनिशी, सन १८९६ सालाकरितां.

हींत मराठी तिथी, वार, महिने, सूर्योदयास्त, विशेष उपवास, ग्रहणें, सण, सरकारी आफिसांस व दिवाणी कोर्टास असणाऱ्या सुट्या, मौंजी विवाहांचे मुहूर्त, इंग्रजी व मुसलमानी महिने, तारखा, रेल्वे, तारायंत्र, स्टांप, मनीआर्डरी, पोस्ट, मुंबई ब्यांकेच्या रूढी, सिव्हिल् प्रासिजर, मुदतीचा, विशेष न्यायाचा, दस्तऐवज नोंदण्याचा, जनरल स्ट्यांप, कोर्ट फी, पालिस गॉईड, डिस्ट्रिक्ट आणि गांवचें पोलिस, क्रिमिनल् प्रोसिजर, इत्यादि नहमीं जरूर लागणाऱ्या विषयांची माहिती दिली आहे. व रोजमुरा चुकता करण्याच्या माहितीचें कोष्टकें दिलें आहे. अखेरीस जमाखर्चाच्या सदराचीं व कांहीं कोरीं पृष्ठें जोडिलीं आहेत.

| रोजनिशीची किंमत. | कि. | ट. हां. |
|---|---|---|
| प्रत नंबर १ .... .... | ८।२ | ८२ |
| प्रत नंबर २ .... .... | ८८ | ८१॥ |
| प्रत नंबर ३ .... .... .... | ८७ | ८१॥ |

किंमतीबद्दल रोख पैसे आह्माकडे पाठविले असतां रोजनिशी रवाना करण्यांत येईल.

भाऊ गोविंद सापकर,
ज्ञानचक्षूचा मालक.


## वर्तमानसार.

अखेर पुण्यास दोन राष्ट्रीय सभा भरविण्याचें ठरलें असें दिसतें. अशा दुफळी होणें रास्त नाहीं. आतां तरी हट्टवादी चिमुटभर सुधारक आपला आग्रह सोडून देऊन शांतपणानें लोकमताचे विरुद्ध जाणार नाहींत. राव बहादूर रानडे व भांडारकरा सारखे सुधारक पक्षाचे अग्रणी आहेत; ते खचित आपल्या आग्रही सुधारक बंधूंची या प्रसंगीं चांगलीं कान उघाडणी करतील अशी आशा आहे. नवीन होणाऱ्या राष्ट्रीय सभेचें अध्यक्षस्थान स्वीकारण्याविषयी बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी यांस तारेनें विनंती करण्यांत आली आहे त्यांनीं आपलें पहिलें वचन सुधारक पक्षाकडे गुंतलें आहे असा जबाब दिल्यास कलकत्ता हायकोर्टाचे माजी विद्वान जडज्य सर रोमेशचंद्र मित्र यांस अध्यक्षस्थान स्विकारण्या विषयीं विनंती करण्यांत येईल असें पुण्याच्या ताज्या खबरेवरून कळतें.

यंदाच्या राष्ट्रीय सभेंत पुढील विषय येण्याचें वाटत आहेः—(१) हिंदुस्थान सरकारच्या खर्चाचा विचार करणारें बादशाही कमिशन. (२) हिं. खात्याचे प्रधानाच्या हुकुमाप्रमाणें कायदे कौन्सिलांत मत देणे. (३) कापडावरील जकात. (४) दिवाणी व लष्करी खर्चातील वाढावा. (५) हिंदुस्थानचा महमूल वाढविण्याविषयीं जास्त करावा लागणारा प्रतिबंध. (६) कायदे कौन्सिलांतील प्रश्न व जमाखर्चाच्या अंदाज पत्रकावरील वादविवादासंबंधीं कायद्यांत फेरफार. (७) नव्या पोलीस कायद्यांतील फेरफार व प्रजेचा परतंत्रपणा. (८) जुरीचा कायदा. (९) जमिनीवरील लोकांच्या हक्काचा विचार. (१०) जमिनीच्या मापणीच्या वेळीं त्यावर कर कितपत ठेवता यावा ? (११) जंगल खात्याची सुधारणा (१२) प्रांतीक सनदी नौकऱ्या. (१३) हिं. सरकारच्या मेडिकल खात्यांत सुधारणा. (१४) जाहीर बांधकामांत पौंड किंवा रुपयाच्या नाण्याचे लोन काढावे ? (१५) नाण्याचा कायदा व टांकसाळा बंद करण्याचा प्रश्न. (१६) इंग्रज कामदाराना देण्यांत येणारा वटाव. (१७) अफू व गांजा कमिशनचे रिपोर्ट. (१८) काँग्रेसच्या स्टांडिंग कमेट्यांचा कारभार कसा चालावा ? (१९) कांग्रेसची इंग्लंड मधील कमेटी. (२०) कांग्रेसफंड.

जरूर पडेल तेव्हां इटालीतील लोकांनीं इंग्रजांचें साह्य करावें असें ठरलें.

अमेरिकेंतील कापसाचें पीक यंदा फारच कमी उतरलें आहे. त्यामुळें हिंदुस्थानच्या कापसाला बराच भाव येण्याचीं चिन्हें आहेत.

अमेरिकेंतील जमेका द्वीपांत एक वेल आहे. हिला हवेची, पाण्याची किंवा मातीची जरूर लागत नसून, पाहिजे तितका लहान तुकडा असला तरी ही वेल पुढें वाढतच असते. तापविलेलें लोखंडच !

बंगाल प्रांतांतील ढाका येथील एक युरोपियन कामदाराचें मत असें आहे कीं, ताडाप्रमाणें सुपारीच्या झाडावरही कर ठेवावा ! या कडकडीनें लोक वैतागून गेले आहेत.

बिहार प्रांतांतील मंगेर येथील एका खिस्ताच्या मुलींला एका बैराग्यानें पळविलें दोघांचा पत्ता नाहीं.

रोंग उप्तन्न करण्याऱ्या जंतूंचा शोध करण्यासाठीं आग्रा येथें सरकार एक खातें स्थापन करण्याच्या तयारींत आहे. स. वि.

इटाली, इंग्लंड, रशिया, फ्रांस व आस्ट्रिया यांची अरमारी फौज टर्की प्रकरणाकरतां एकवट होत चालली आहे व त्या प्रमाणें युरोपियन बड्या खिस्तीराजांच्या दरम्यान कांहीं खलबतही सुरू झालें आहे, हा सर्व प्रकार टर्कीला नुसता मोडवण्या पुरताच असावा असें अनुमान आहे.

फ्रेंच आरमारही इंग्लंड व इटाली यांच्या अरमारा प्रमाणें टर्कीच्या दिशेस रवाना झालें.

तुह्मी आपापल्या प्रांतांत जीवापाड श्रम करून शांतता केलीच पाहिजे असा टर्कीच्या सुलतानानें आपल्या पदरच्या सगळ्या गव्हरनरांस सक्त हुकूम केला आहे. फौज व पैसा यांचा मात्र तोटा आहे.

टर्कीच्या राज्यांत जे इंग्रज व अमेरिकन लोक आहेत त्यांच्या रक्षणार्थ इंग्लंड व अमेरिका या दोघांनीं एकत्रपणानें पुढें होऊन उद्योग करावा अशी इंग्रज वकिलानें अमेरिकनसरकारास सूचना केली आहे.

टर्कीच्या राज्यातील जरूसलेमच्या शेजारीं नेबलुस येथील इंग्रज मिशनरी लोंकांवर टर्कीलोकांचा एक मोठा हल्ला झाला मिशनरी बचावले पण त्यांचे चाकर नौकर ठार झाले.

इंग्रजसरकार आपल्या १४०० फौजेची एक स्वारी आशांटीच्या राजावर पाठविण्याची तयारी करीत आहे. कामदार वगैरच्या नेमणुका झाल्या.

हिंदुस्थान सरकार दोन कोट रुपयांच्या नव्या नोटा तयार करण्याच्या विचारांत आहे.

अर्मेनियन प्रकरणाची व्यवस्था लावण्यास सुलतानाने एक पूर्णाधिकारी नवा प्रधान नेमला आहे, पण सुलतानाचें हें करणे बड्या राजांस चकविणारें आहे असें खिस्त्यांचें ह्मणणे आहे.

टर्कीच्या हद्दींत झेटन येथें अर्मेनियन लोकांनी जो दंगा चालविला आहे त्यावर टर्कीच्या फौजेनें हल्ला करून पकडापकडी केली व आतां त्यांचा पिच्छा पुरावेण्याचा क्रम चालू आहे. टा० अ०

पीतवृष्टी—होसूर येथून बंगलोरच्या एका पत्रास एकानें लिहिलें आहे कीं, तिकडे थोड्या दिवसांपूर्वी पिंवळ्या रंगाचा पाऊस पडून त्यानें लोकांच्या आंगावरील धोत्रास हळदीसारखे डाग पडले. मद्रासेंत सन १८९१ च्या दुष्काळाचे आरंभीं अशीच पीतवृष्टि झाली होती. ह्मणून हें अशुभ चिन्ह आहे असें तिकडील लोक समजत आहेत.

आफ्रिकेंत मोझांबिक येथें पाठविण्याकरितां मराठे व मुसलमानांची इकुड भरती करण्यांत येत आहे. ४०० लोक पाहिजे आहेत. त्यांस दरमहा ३० रुपये पगार देण्यांत येईल असें प्रसिद्ध करण्यांत आलें

इंदूर—होळकर महाराजांचे गुण हिंदुस्थान सरकारापावेतों उघळल्यामुळें त्यांच्याच परवानगीमुळें रेसिडेंट यांनीं माहाराजांस आतां इंदूर सोडून बडवाईस रहावें असें शेवटचें सांगणें सांगितलें व त्याप्रमाणें महाराज साहेब हे इंदूर सोडून बडवाईस आले व तेथून पुढें महेश्वरी गेले आहेत. स. शो.

कोरियाच्या राणीचा खून
सविस्तर हकीकत.

ता. ८ आक्टोबर सन १८९१ रोजीं सकाळीं ४ वाजतां जपानी लोकांनीं कवाईत शिकविलेले दोनशें कोरियन शिपाई एकदम सरकारी वाड्यावर चाल करून आले. वाड्याच्या रखवालदारांनीं त्यांचें रक्षण करण्या करितां आपली शिकस्त केली परंतु त्यांचा कांहीं एक उपायोग न होतां बिचारे आपल्या प्राणांस मुकले. बंडवाले राणीच्या दिवाणखान्यांत गेले व तेथें असलेल्या दरोबस्त दासींस त्यांनीं ठार केलें. ह्या वेळीं त्यांनीं तेथें १४ स्त्रियांची कत्तल केली नंतर फार क्रूरतेनें राणीला केंस धरून फरफटत ओढीत आणलें. तिच्या बरोबर आणखीही एक स्त्री होती. त्या दुष्टांनीं ह्या दोन अबलांस तशाच ओढीत ओढीत वाड्यानजीकच एक बाग होता तेथें आणून त्यांचा शिरच्छेद केला.

राणी शिवाय इतर बऱ्याच लोकांचीही त्यांनीं कत्तल केली. त्या सर्वांच्या प्रेतांचा त्यांनीं एक ढीग रचून त्यावर तेल ओतलें व त्यास मशाल लावून दिली बिचाऱ्या राणीच्या आईला असह्य दुःख होऊन त्या आवेशांत तिनें आत्महत्या केली. हें सर्व कृत्य दिवसा ढवळ्या ह्या लोकांनीं केलें असें चायना 'मेल' वरून समजतें.

ताज्या आलेल्या बातमीवरून कळतें कीं लेबनॉन येथें सर्वत्र अस्वस्थता उत्पन्न झाली. आहे. डमास्कस येथील मुसलमान लोक निर्बल तुर्की सरकारावर आणि खिस्ती लोकांवर फारच चवताळले आहेत.

धर्मजाति संबंधाच्या बाबतींत सरकारी कामदाराचें कांहीं चालत नाहीं. आर्मीनिया येथील खिस्ती मंडळी फार भयकारक स्थितींत आहेत.

अर्मेनिया येथील खारपट येथें खिस्त मंडळीची कत्तल उडाली. सुमारें ८०० लोक ठार मारले गेले. आर्मीनियन मिशनगृहें सर्व जाळून टाकलीं. नुकसान सुमारें ५००० पौंड झालें. पाद्री मंडळीनीं आपली कशी तरी सुटका करून घेतली.

अशांटीवरील स्वारी—स्वारीच्या सैन्याबरोबर प्रिन्स खिश्चन व्हिक्टर महाराणी साहेबांच्या वडील चिरंजीवांचे पुत्र हे जाणार आहेत.

असें कळतें कीं, स्वारीवर जाणाऱ्या शिपायांची संख्या सुमारें ६०० आहे.

सर एफ. सी. स्कॉट यांच्या हाताखालीं कर्नल कॅपास्टर यांची नेमणूक करण्यांत आली आहे.

आस्ट्रिया लीव्हांटकडे आपलीं लढाऊ जहाजें रवाना करीत आहे.

युरोपांतील बलाढ्य राष्ट्रें तुर्कस्थान प्रश्नासंबंधानें विचार करीत आहेत. विचार करण्याचें ठिकाण व्हायना हें ठरविलें आहे.

आस्ट्रेलियामध्यें पाऊस पुरेसा न पडल्यामुळें तेथील लोकांच्या निर्वाहापुरतां गहू यंदां उत्पन्न होणार नाहीं.

सेंटपीटर्सबर्ग, रशियाचीं लढाऊं गलबतें लिव्हॅन्टकडे एकदम रवाना होण्या विषयीं हुकूम सुटला आहे.

पुणें येथील शारदासदनामधील १३ शिक्षकिणी येशूच्या कळपांत गेल्याचें जगद्धितेच्छूवरून समजतें.

पुण्यास ता० १८ रोजीं सकाळीं एकंदर सैन्याच्या वार्षिक कवाईतीचा समारंभ चालला असतां एक पेनशनर सुभेदार मजा पहायास आला असतां त्यांस एका शीख शिपायानें ठार मारलें. लेफटेनंट रिडल नांवाचे ऑफिसर त्या वेळेस तेथें होते. त्यांनी त्या शीख शिपायास धरण्याचा यत्न केला परंतु त्या झटपटींत त्यांसही गोळी घालून त्या शिपायानें मारलें व अखेर आपणास मारून घेतलें. लेफटेनंट रिडल चांगलें ऑफिसर होते. नुकतींच सन १८९३ च्या एप्रील महिन्यांत त्यांनीं नोकरी पत्करली होती.

निजाम सरकारानें विलायतेंत जाऊन अभ्यास करणाऱ्या मुसलमान विद्यार्थ्यां करितां १००००० रुपये देण्याबद्दल विचार केला आहे.

टाइम्सनें कॉन्स्टॅन्टिनोपल येथें मुद्दाम पाठविलेल्या बातमीदाराकडून कळतें कीं, लढाईसाठीं जय्यत तयारी तुर्क लोक करीत आहेत.

डार्डेनेल्स येथील पलटनींतील शिपायांची संख्या दुपटीनें वाढविली आहे. डार्डेनेल्स येथें प्रवेश करणाचें पहिलें नाकें नेटेडोज नांवाचें बेट येथें इतर ठिकाणची हालचाल कळावी ह्मणून सारख्या जय्यत तयारीसह पाळतीवर सैन्य ठेविलें आहे. प्र०

कोट्याधीश पत्रकर्ते— न्यूयार्क [ अमेरिका ] मध्यें सात पत्रांचे एडिटर्स कोट्याधीश आहेत.

विंचू चावल्यावर उपाय— विंचू चावलेल्या जागेवर सैंधव गोमुत्रांत वाटून त्याचा लेप द्यावा, अगर गाईचें शेण ऊन करून वर लावावें. किंवा भाभळीचा पाला चिलमींतून ओढावा.

नवीन रेल्वेची अवश्यकता— तुर्कस्थानचे ग्याझेटवरून असें समजतें कीं, ताशकंद रेलवे ही उरल व ग्रेट सायबिरियन रेलवे ह्यांशीं जोडणें अतिशय जरूरीचें आहे कारण त्या वांचून तुर्कस्थान व सैबिरिया मधील व्यापार चांगला चालणार नाहीं.

सिमला-- एक मनुष्य कळवितो कीं, काल व आज स्वास्तिकाच्या रेषेनें सूर्यापासून ३० डिग्रीवर पुढें एक तारा सूर्य प्रकाशांत सुद्धां नुसत्या डोळ्यांनीं दिसतो. हें शेंडें नक्षत्र तर नसेलना ?

नुकतेंच कलकत्यास एक वैद्यकीय विद्वत ज्ञाते मि. आलबर्ट रिचलंड ह्यांनीं कलकत्यांतील मि. जम्सन्टॅट यांचे बरोबर इतर वैद्यांनीं असाध्य व दीर्घ कालिक रोगाचें निदान ठरवून ते औषधोपचारानें बरे करण्या विषयीं पैज लाविल्याचें समजतें पैजेची रक्कम १०,००० रु० पेक्षां कमी नाहीं, व ५०००० रु० पेक्षां जास्ती नाहीं.

चरकॅमेरा— एका फ्रेंच मनुष्यानें चालत्या जहाजांत क्यामेरा टांगून फोटो घेण्याची युक्ती काढली आहे. त्याच्या योगानें कोण त्याही वस्तूचा ताबडतोब फोटो घेता येतो.

पंधरा दिवसांत १॥ लाख रु० ची मिळकत— अमेरिकन सरकारच्या नोटा छापण्या करितां एडी नांवाचा एक मनुष्य एका जातीची शाई तयार करीत असे. त्याच्या मरणानंतर त्याच्या मुलानें तें काम बापाच्या सांगण्या बरहुकूम अगदीं गुप्त रीतीनें चालविलें आहे. सरकारांस लागणारी सर्व शाई हा २ आठवड्यांत तयार करितो व त्या बद्दल सरकार त्यांस सालीनां १॥ लाख रुपये देते.

मुंबई--घोड्याशिवाय चालणाऱ्या गाड्या— " ओटो मोबाईल्स " नांवाच्या यंत्रकलेनें चालणाऱ्या गाड्या ज्यां हल्लीं यूरोपांत चालूं झाल्या आहेत, त्यां पैकीं सुमारें अर्धा डझन गाड्या येथील एका प्रसिद्ध कोच बिल्डरकडून मागाविण्यांत आल्या असून त्या येथें लवकरच येऊन दाखल होतील. ह्या गाड्या पेट्रोलियन तेलाच्या योगानें चालतात. इं. प्र.

रा. सा. सीताराम विश्वनाथ पटवर्धन वऱ्हाडच्या शाळाखात्याचे डायरेक्टर यांची नोकरीची मुदत भरल्यामुळें त्यांस आणखी एक वर्ष मुदत देण्याची शिफारस झाली आहे. स० शो०

☞ हें पत्र अकोलें येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.